वर्ष ४६
अंक ७

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र

वृत्त

|| मराठी तितुका मेळवावा ||

On the Web
www.bmmonline.org

**समस्त मराठीप्रेमींसाठी उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक**

जुलै २०२६
निज ज्येष्ठ/आषाढ
शके १९४८


नमस्कार मंडळी,

१ जुलै – कॅनडाचा स्वातंत्र्यदिन आणि ४ जुलै – अमेरिकेच्या स्वातंत्र्याच्या २५० व्या वर्षाचा ऐतिहासिक सोहळा! या निमित्ताने कॅनडा आणि अमेरिकेत राहणाऱ्या सर्व मराठी बंधू-भगिनींना मनःपूर्वक शुभेच्छा!

अमेरिकेच्या नागरिकांसाठी यंदाचा स्वातंत्र्यदिन विशेष महत्त्वाचा आहे. गेल्या २५० वर्षांत अमेरिका जगातील एक महासत्ता म्हणून उदयास आली आहे. धैर्य, त्याग आणि लोकशाही मूल्यांप्रती असलेल्या निष्ठेमुळे या राष्ट्राने उल्लेखनीय प्रगती साधली आहे. या ऐतिहासिक प्रसंगी सर्व अमेरिकन नागरिकांचे मनःपूर्वक अभिनंदन!



अलीकडेच माझी पत्नी निवी आणि मला बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या माजी विश्वस्त विद्या हर्डीकर-सप्रे, तसेच ज्ञान प्रबोधिनी फाउंडेशनचे अध्यक्ष आकाश चौकसे, त्यांच्या पत्नी कौमुदी यांच्यासोबत एका खाजगी कार्यक्रमात भेटण्याचा योग आला. त्या वेळी आकाश यांनी समाजरंग उपक्रमामार्फत मराठवाडा पूरग्रस्तांसाठी ज्ञान प्रबोधिनी फाउंडेशनला दिलेल्या आर्थिक मदतीबद्दल बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मनःपूर्वक आभार मानले.

पुढील काही दिवसांत समाजरंग तर्फे सुप्रसिद्ध समाजसेवक डॉ. विनोद शहा, यजुर्वेंद्र महाजन, अशोक देशमाने, अनुराधा भोसले आणि डॉ. गिरीश कुलकर्णी यांचा "**दिव्यत्वाची जेथे प्रचिती**" हा प्रेरणादायी अमेरिका दौरा आयोजित करण्यात आला आहे. या दौऱ्याची माहिती या अंकात तसेच बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तुमच्या शहरात हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असेल, तर जरूर उपस्थित राहा. या सर्व मान्यवरांचा एकत्रित "**साधू संत येती घरा**" हा विशेष कार्यक्रम सिएटल अधिवेशनातही आयोजित करण्यात आला आहे. तो अनुभवण्याची संधीही नक्की घ्या.

आता सिएटल अधिवेशन अवघ्या एका महिन्यावर येऊन ठेपले आहे. सिएटल संयोजन समिती, बृहन्महाराष्ट्र मंडळाचे सर्व पदाधिकारी आणि शेकडो स्वयंसेवक अत्यंत समर्पित भावनेने या अधिवेशनाच्या तयारीत गुंतले आहेत. त्यांच्या अथक परिश्रमांचे मी मनापासून कौतुक करतो. अधिवेशनाच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी आणि सर्व स्वयंसेवकांचे वैयक्तिकरित्या आभार मानण्यासाठी मी आणि निवी या महिन्यात सिएटलला भेट देणार आहोत.

मागील काही महिन्यांपासून सुरू असलेली जागतिक आर्थिक मंदी, आंतरराष्ट्रीय घडामोडी, विविध संघर्षजन्य परिस्थिती आणि अमेरिकेत सुरू असलेली नोकरी कपात यांचा अधिवेशनावरही काही प्रमाणात परिणाम होत आहे. त्यामुळे संभाव्य आर्थिक तूट भरून काढण्यासाठी आम्हाला अधिक प्रायोजकांची आवश्यकता आहे. तुमच्या परिचयात एखादी व्यक्ती किंवा उद्योगसंस्था प्रायोजकत्व देण्यास इच्छुक असतील, तर कृपया त्यांचा संपर्क आम्हाला अवश्य कळवा.

जर तुम्ही अद्याप सिएटल अधिवेशनासाठी नोंदणी केली नसेल, तर कृपया ५ जुलैपूर्वीच आपले तिकीट निश्चित करा. त्यानंतर भोजनाचा समावेश असलेल्या नोंदणी बंद करण्यात येणार आहेत. सिएटल कन्व्हेन्शन सेंटरला त्यांच्या अन्ननियोजनासाठी ६ जुलैपर्यंत अंतिम संख्या देणे आवश्यक असल्याने ही मुदत वाढविणे शक्य नाही.

गेल्या दोन वर्षांत बृहन्महाराष्ट्र मंडळाने अनेक नवे उपक्रम सुरू केले. समाजरंग, आरोग्य संपदा, गुरुपीठ, अर्थमंथन, लक्ष्यवेधी, ज्योतिषशास्त्र आणि कीर्तन या सर्व उपक्रमांना आपला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. पुढील कार्यकारिणी हे सर्व नवे आणि दीर्घकालीन चालत आलेले उपक्रम अधिक व्यापक आणि यशस्वी करेल, याची मला खात्री आहे. त्याचबरोबर आपल्या सर्व मंडळांचे अध्यक्ष आणि बृहन्महाराष्ट्र मंडळाचे प्रतिनिधी हे उपक्रम अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी सहकार्य करतील, असा मला विश्वास आहे. या सर्व उपक्रमांचे प्रमुख, त्यांना सहकार्य करणारे स्वयंसेवक आणि सहभागी झालेल्या प्रत्येक सदस्याचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

भारतात प्रवास करणाऱ्या सर्व सदस्यांनी BMM–BVG च्या नव्या उपक्रमाचा अवश्य लाभ घ्यावा. या उपक्रमांतर्गत भारतातील प्रवास, विविध शासकीय व वैयक्तिक कामांसाठी मार्गदर्शन आणि सहाय्य उपलब्ध आहे. तसेच विद्यार्थ्यांना Summer Internship च्या संधीही उपलब्ध करून दिल्या जात आहेत.

सरतेशेवटी, या महिन्यात पंढरपूरची आषाढी वारी सुरू होत आहे. त्या निमित्ताने बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे "वारी २०२६" हा विशेष उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. वीस दिवसांत आपल्या क्षमतेनुसार वारीचे पूर्ण किंवा अंशतः अंतर चालत पूर्ण करून, इच्छेनुसार एखाद्या सामाजिक संस्थेला देणगी देत या उपक्रमात सहभागी व्हावे, असे मी सर्वांना आवाहन करतो. आपणा सर्वांना आषाढी एकादशी आणि गुरुपौर्णिमेच्या हार्दिक शुभेच्छा!

जय जय राम कृष्ण हरी! जय हिंद! जय महाराष्ट्र!

आपला, प्रसाद पानवळकर, अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

**बृहन्महाराष्ट्र वृत्त**
बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र
स्थापना १९८१ (शिकागो)
संस्थापक:- कै. विष्णु वैद्य, कै. शरद गोडबोले, कै. जयश्री हुपरीकर
अंकासाठी साहित्य/मजकूर पाठविण्याचा पत्ता:
ईमेल: vrutta@bmmonline.org
बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय संपर्क :-
**BMM Treasurer - Santosh Salvi**
**4 Azalea Lane, Nashua, NH 03062**
**Ph: 603 438 9279**
**Email: santosh.salvi@bmmonline.org**

**जाहिरातींचे दर:** पूर्ण पान: $ 200 अर्धे पान: $ 125
पाव पान: $ 100 अष्टमांश पान: $ 75
**Send your payments to: zelle@bmmonline.org**

वृत्त दर महिन्याला प्रसिद्ध होते. **आदल्या महिन्याच्या १५ तारखेपर्यंत आलेल्या मजकुरातून निवडक मजकूर नजीकच्या अंकात प्रसिद्ध करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील.** लेखासाठी जास्तीत जास्त १ ते २ पानांचा मजकूर मराठीत लिहून MS word मध्ये पाठवावा. प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतातच असे नाही. लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशन योग्य किरकोळ बदलाचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादकांकडे राहतील.

**बृहन्महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी (२०२४ - २०२६)**
**मताधिकार असलेले सदस्य**
अध्यक्ष: प्रसाद पानवळकर, ऑस्टिन, टेक्सस
सचिव: नरेंद्र कल्याणकर, रॅले, नॉर्थ कॅरोलायना
कोषाध्यक्ष: संतोष साळवी, नाशुवा, न्यू हॅम्पशायर
सदस्य: पुरू ठाकरे, रिचमंड, व्हर्जिनिया
मेधा गोडबोले, क्लिव्हलँड, ओहायो
गौरव पटवर्धन, सॉल्ट लेक सिटी, युटा
राहुल देशमुख, पिट्सबर्ग, पेनसिल्व्हेनिया
आनंद चौथाई, एडिसन, न्यू जर्सी
**नियुक्त सदस्य**
माजी अध्यक्ष: संदीप दीक्षित, क्लिव्हलँड, ओहायो
**विश्वस्त समिती**
अध्यक्ष : नितीन जोशी, शिकागो, इलिनॉय
सदस्य: सुनील सूर्यवंशी, रिजफील्ड, कनेक्टिकट
सदस्य: मंजुषा नाईक, वेस्ट पाम बीच, फ्लोरिडा
प्रकाशक: बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका

**Disclaimer:** The advertised business is a wholly independent entity from Bruhan Maharashtra Mandal (BMM). BMM is neither liable nor responsible for any actions or communications between third parties and the advertised businesses, including parents and subsidiaries of the advertised businesses.

## या अंकात

| | |
|---|---|
| अध्यक्षीय | १ |
| बृ. म. मंडळ कार्यकारिणी व संपादक समिती | २ |
| २०२६ सिॲटल अधिवेशन अहवाल | ३ |
| मराठी तितुका मेळवावा! | ४ |
| बीएमएम २०२६: संवाद - डॉ. माधुरी कानिटकर | ५ |
| बीएमएम २०२६: संवाद - श्रीमती सविता मोरे | ६ |
| बीएमएम २०२६ - नाट्यसृजन एकांकिका स्पर्धा | ८ |
| राशिभविष्य | ९ |
| बीएमएम २०२६ - अधिवेशन संकल्पना गीत | १० |
| रेशीमगाठी २०२६ सिॲटल | ११ |
| बीएमएम २०२६ प्रायोजकांची माहिती | ११ |
| चला बीएमएमला जाऊ, चला सिॲटल पाहू | १३ |
| अभ्यासाव्यतिरिक्त गवसलेली ओळख: अश्मी गायकवाड | १४ |
| कविता: ती व तो | १६ |
| परांजपे एकांकिका करंडक | १७ |
| जाहिरात | १९ |
| अभ्यासाव्यतिरिक्त गवसलेली ओळख: शौनक मार्दे | २० |
| कविता: आपलं घर...! | २१ |
| गुरुपौर्णिमा (कृतज्ञता दिन) | २२ |
| आमचे दादासाहेब | २४ |
| भारतीय - अमेरिकन स्वातंत्र्य दिन - जुलै ४! | २५ |
| चंद्राच्या खंत आणि दंत कथा | २७ |
| आणि पाषाण बोलू लागले ... | २९ |
| वेताळ ४ | ३१ |
| आकाशी झेप घे रे पाखरा | ३२ |
| कविता: योग का योगा? | ३४ |
| वाराणसी | ३५ |
| देवशयनी एकादशी: अंतर्मुखतेचा उत्सव | ३७ |
| दिवाळी अंक आवाहन २०२६ | ३८ |
| जाहिरात | ३९-४९ |
| MANA Paintings | ५० |

## संपादक समिती

अपर्णा कोळेकर
नीता धोपेश्वरकर
विदुला कोल्हटकर
अनिता कांत
कोमल कुलकर्णी
शुभदा सावरगावकर
शीतल रांगणेकर
प्रसाद पानवळकर

हया अंकाबाबत तुमचे मत नक्की कळवा :
Vrutta@Bmmonline.org

## २०२६ सिॲटल अधिवेशन अहवाल

‘बीएमएम वृत्त’च्या सर्व वाचकांना नमस्कार! जुलै महिना म्हणजे मुलांच्या शाळा कॉलेजच्या सुट्ट्यांचा आणि, कुटुंबांसाठी प्रवास, फिरणं, धम्माल करण्याचा आहे. शिवाय फिफा फुटबॉलचा फिवरही क्रीडाप्रेमींना चढलेला आहे. जुलै महिना आलाच आहे उत्साह, भक्ती आणि जागतिक घडामोडींचा सुंदर संगम घेऊन. यंदाच्या जुलै महिन्यात येणारी आषाढी एकादशी ही भक्ती, श्रद्धा आणि विठ्ठलनामाच्या गजराने मनाला प्रसन्न करणारी पवित्र पर्वणी आहे. सर्वांना आषाढी एकादशीच्या हार्दिक शुभेच्छा. शिवाय गुरु पौर्णिमेनिमित्त सर्व गुरुजनांना वंदन!!!

यंदा अमेरिका आपला २५० वा स्वातंत्र्यदिन साजरा करत आहे. गेल्या अडीच शतकांत अमेरिकेने स्वातंत्र्य, समता आणि नाविन्यतेच्या जोरावर जागतिक महासत्ता म्हणून स्थान निर्माण केले आहे. या प्रवासात उत्तर अमेरिकेतील मराठी समाज तंत्रज्ञान, वैद्यकीय, व्यवसाय, कला आणि इतर अनेक क्षेत्रात मोलाचे योगदान देत “American Dream” चा अविभाज्य भाग बनला आहे. या ऐतिहासिक वर्षाच्या पार्श्वभूमीवर आयोजित होणारे बीएमएम२०२६अधिवेशन मराठी अस्मिता आणि संस्कृतीचा गौरव करणारा एक विशेष सोहळा ठरणार आहे.

**🎟️ तिकीटविक्रीबाबत महत्त्वाची माहिती:**

४ जुलै नंतर तिकीट विक्रीचा ३रा टप्पा सुरु होईल.

- भोजनाचे विविध पर्याय असलेली तिकिटे ४ जुलै नंतर बंद होतील.
- भोजन विरहित तिकीटामध्ये वाढ होत असून ४ जुलै नंतर ते $४५० होणार आहे.

ज्यांना अधिवेशनातील भोजनाचा आनंद घायचा आहे त्यांनी आणि ज्यांना सवलतीच्या दरातील भोजन विरहीत तिकीट घायचे आहे **($३५०)** त्यांनी कृपया लवकरात लवकर नोंदणी पूर्ण करा.

**आनंदाची बातमी :** बीएमएम२०२६साठी एक आनंदाची बातमी -‘ऑल द बेस्ट, द फोक आख्यान, संगीत रस-सुरस आणि नाटकामागचे नाटक ह्या सर्व भारतातून येणाऱ्या कार्यक्रमांसाठी व्हिसा मंजूर झाले आहेत. त्यामुळे या दर्जेदार कार्यक्रमांच्या सादरीकरणाची तयारी आता अधिक वेगाने पुढे सरकली आहे.

**काही नवीन कार्यक्रमांची माहिती: नाटकामागचे नाटक**

मराठी रंगभूमीवरील दिग्गज अभिनेते **प्रशांत दामले** आणि लोकप्रिय लेखक-कवी, अभिनेता **संकर्षण कऱ्हाडे** सादर करणार आहेत नाटकामागचे नाटक. दोघेही एकाच रंगमंचावर म्हणजे निखळ मनोरंजनाची हमखास हमी!




**जावळीच्या खोऱ्यातून:** डॅलसमधील स्थानिक कलाकारांचा छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्यगाथेवर आधारित ऐतिहासिक कार्यक्रम

**सुखी माणसाचा सदरा:** न्यू जर्सी येथील कलाकारांनी बसवलेले आजच्या काळातील सामाजिक, आर्थिक आणि राजकीय घडामोडींवर भाष्य करणारे एक धारदार राजकीय प्रहसन. महाराष्ट्राची समृद्ध लोककला असलेल्या 'वगनाट्याचा' आधार घेत, या सादरीकरणात नृत्य, नाट्य आणि संगीताचा एक संगम साधला गेला आहे. गण, गवळण, वग आणि तमाशा अशा पारंपारिक लोककलांच्या चौकटीत बसलेल्या या खुसखुशीत कार्यक्रमात 'शाहीर' सुत्रधाराची भूमिका बजावत कथानक पुढे नेतो.

**पैठणी फॅशन शो - आठवणीतील पैठणी:** पैठणी ही केवळ एक साडी नसून ती एक भावना, एक समृद्ध वारसा आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचे जिवंत प्रतीक आहे. अधिवेशनात सादर होणारा हा कार्यक्रम म्हणजे पैठणीचा इतिहास, तिची विणकाम कला आणि तिचे आजच्या काळातील अढळ स्थान यांचा गौरव करणारा एक अनोखा 'फॅशन शो आणि नाट्यमय अविष्कार' आहे.

**अधिवेशनाचे ॲप - Tugoz Wallet** : सहभागींना अद्ययावत माहिती सहज मिळावी आणि सर्वांना एकमेकांशी सहज संपर्क साधता यावा यासाठी आम्ही अधिवेशनाचे app उपलब्ध करून देत आहोत. हे app ‘Tugoz Wallet’ ह्या नावाने Google Play Store (Android) आणि App Store (iOS) वर डाउनलोडसाठी उपलब्ध आहे. App उघडल्यानंतर आपला नोंदणी क्रमांक टाकून लॉग-इन करणे आवश्यक आहे.

ॲप डाउनलोड करण्यासाठी लिंक्स खालीलप्रमाणे:

**Apple App Store:**

https://apps.apple.com/us/app/tugoz-wallet/id6753093079

**Google Play Store:**

https://play.google.com/store/apps/details?id=com.tugoz.tugoz_events

बीएमएम२०२६ ची तयारी आता अंतिम टप्प्यात आली आहे. १ जुलै पासून ६ ऑगस्ट पर्यंत फक्त ३७ दिवस राहिले आहेत. आपल्या सर्वांच्या सहभागामुळे हा प्रवास अधिक अर्थपूर्ण होत आहे.









१३ जून रोजी स्वयंसेवक सभा आयोजित करण्यात आली होती. स्वादिष्ट भोजनाने सभेची रंगत तर वाढलीच. शिवाय हलक्या फुलक्या वातावरण निर्मितीसाठी तसेच प्रत्येक स्वयंसेवकांची दखल घेत सर्वांना विविध गमतीदार किताब देण्यात आले. बीएमएम२०२६ च्या यशस्वी प्रवासामध्ये स्वयंसेवकांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे.

**आम्हाला आपल्या मदतीची नितांत गरज आहे :** देणगीदार म्हणून योगदान द्या, तिकीट खरेदी करा किंवा स्वयंसेवक म्हणून सहभागी व्हा. आपण सर्व मिळून हे अधिवेशन भव्य, यशस्वी आणि अविस्मरणीय बनवू आमचा हा दृढ विश्वास आहे.

या संस्कृतीच्या महोत्सवात आपला मोलाचा सहभाग नक्की नोंदवा. देणगीसाठी संपर्क : donations@bmmseattle2026.org

आपल्या सततच्या पाठिंबा, विश्वास आणि सहभागाबद्दल आपणा सर्वांचे मनःपूर्वक आभार. भेटूया सिॲटलमध्ये... #Seaya तोवर आमच्या समाज माध्यमांवर भेटत राहू 👇🏽

**संकेतस्थळ:** https://bmmseattle2026.org

**यूट्यूब:** www.youtube.com/@BMM2026SEATTLE

**फेसबुक पेज:** www.facebook.com/bmm2026seattle

फेसबुक ग्रुप: www.facebook.com/groups/bmm2026seattle

**इंस्टाग्राम:** www.instagram.com/bmm2026seattle

**इमेल-पत्ता:** स्नेहसंमेलनासंबंधीच्या सूचना, अभिप्राय आणि प्रश्नांसाठी info@bmmseattle2026.org

आपला विश्वास, आपली साथ - हाच आमचा प्रेरणा स्रोत आहे. चला, जपूया संस्कृती, विणूया नाती !!! 🙏🌸

- **अश्विनी क्षीरसागर,** (बीएमएम २०२६ समिती)

## मराठी तितुका मेळवावा!

**बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मासिक वृत्त**

**सादर करीत आहे एक अनोखा कार्यक्रम: मराठी तितुका मेळवावा!**

बृहन्महाराष्ट्र मंडळ (BMM) — केवळ एक संस्था नाही, तर उत्तर अमेरिकेतील मराठी मनांना जोडणारी एक जिवंत चळवळ आणि परदेशातील आपले हक्काचे कुटुंब!

अधिवेशनाच्या पलीकडे जात, २८ हून अधिक अनोख्या उपक्रमांद्वारे BMM प्रत्येक मराठी बांधवाच्या गरजेला आणि सुख-दुःखात सातत्याने धावून जाते.

चला, या उपक्रमांची रंजक वाटचाल अनुभवूयात...

🎭 **नाटक आणि कथावाचन** 💃 **नृत्य आणि संगीत**

✍️ **कविता आणि कीर्तन** 🧘 **ध्यान आणि बरेच काही!**

या कार्यक्रमाच्या शेवटी BMM च्या सर्व आजी माजी अधिकाऱ्यांना आणि स्वयंसेवकांना रंगमंचावर पाचारण करण्यात येईल. आपल्यापैकी जे कोणी अधिवेशनाला उपस्थित असतील त्यांनी आमच्याशी संपर्क करावा म्हणजे आपल्याला आग्रहाचे आमंत्रण आणि कार्यक्रमाची वेळ/जागा कळवू शकू. vrutta@bmmonline.org



# बीएमएम २०२६: संवाद



**बीएमएम २०२६ - प्रमुख वक्त्या:**

**निवृत्त लेफ्टनंट जनरल डॉ. माधुरी कानिटकर**

बीएमएम २०२६ सिॲटल अधिवेशनाच्या प्रमुख वक्त्या आहेत लेफ्टनंट जनरल **डॉ. माधुरी कानिटकर** (निवृत्त). डॉ. कानिटकर भारतीय सशस्त्र दलातील एक अत्यंत प्रतिष्ठित आणि कर्तबगार अधिकारी आहेत. भारतीय लष्करातील 'लेफ्टनंट जनरल' (Three-star rank) या द्वितीय सर्वोच्च पदावर पोहोचणाऱ्या देशातील तिसऱ्या महिला अधिकारी तर पहिल्या मराठी महिला अधिकारी आहेत. आपल्या वैद्यकीय शिक्षणात 'राष्ट्रपती सुवर्णपदक' पटकावणाऱ्या डॉ. कानिटकर यांनी लष्करात डॉक्टर, प्राध्यापक आणि 'एएफएमसी' (AFMC) कॉलेजच्या डीन अशा विविध पदांवर काम केले आहे. सैन्यदलातील ३९ वर्षांच्या गौरवशाली सेवेनंतर निवृत्त होऊन, सध्या त्या 'महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ' (MUHS), नाशिकच्या कुलगुरू म्हणून कार्यरत आहेत. या पदावर असताना वैद्यकीय अभ्यासक्रमात 'डिजिटल हेल्थ'चा समावेश करण्यात त्यांनी अत्यंत मोलाची भूमिका बजावली आहे. डॉ. कानिटकरांशी अधिवेशनापूर्वी साधलेला हा संवाद.

**नमस्कार, सर्वप्रथम बीएमएम २०२६ सिॲटल अधिवेशनाच्या प्रमुख वक्त्या म्हणून येण्याचे आमंत्रण तुम्ही स्वीकारल्याबद्दल तुमचे खूप आभार. तुम्हाला या अधिवेशनाकडून काय अपेक्षा आहेत?**

मला बोलावल्याबद्दल तुमचेही आभार. गेल्या वर्षी लेस्टर (यूके) मध्ये झालेल्या युरोप अधिवेशनालाही मी वक्ता म्हणून गेले होते. देशापासून इतक्या लांब राहूनही आपले भारतीय, मराठी बांधव एकत्र येतात आणि आपली संस्कृती जपतात हे बघून मला खूप आनंद झाला. अमेरिकेतही असं दृश्य बघायला मिळेल अशी अपेक्षा आहे. बऱ्याच वर्षांपूर्वी जी मंडळी इथे स्थलांतरित झाली, ती कदाचित भारताच्या बदलत्या वेगाशी जोडलेली नसतील. त्यामुळे त्या मंडळींना भेटून मी त्याबद्दल सांगू शकेन तसेच माझे विचार तुमच्यापर्यंत पोहोचवू शकेन.

आज आपण विकसित भारताचे स्वप्न पाहत आहोत. सायन्स, टेक्नॉलॉजी, शिक्षण आणि आरोग्य या क्षेत्रांत भारत खूप पुढे गेला आहे. त्यामुळे या तीन दिवसांत मी अधिवेशन केंद्रात तुमच्यासोबत उपस्थित राहून लोकांशी, विशेषतः तरुणांशी संवाद साधू इच्छिते. त्यांच्या आकांक्षा आणि स्वप्ने काय आहेत, हे जाणून घेण्याची माझी इच्छा आहे. मीही तुमच्याकडून नक्की बरंच काहीतरी शिकू शकेन याची मला खात्री वाटते.

**तुमचं भाषण ऐकण्यासाठी आम्ही उत्सुक आहोतच, पण हा असा संवादही खूप महत्त्वाचा आहे. भाषणे तर यूट्यूब किंवा टीव्हीवरही ऐकता येतात, पण प्रत्यक्ष संवाद साधता येणे जास्त परिणामकारक असते, नाही का?**

नक्कीच. मी 'पंतप्रधान विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोपक्रम सल्लागार परिषद' (PM-STIAC) या उपक्रमाचा भाग आहे, तसेच मी वैद्यकीय विद्यापीठाची कुलगुरू म्हणूनही काम केले आहे. त्यामुळे शिक्षणातील बदल किंवा डिजिटल हेल्थ मोहिमेत माझा सक्रिय सहभाग आहे.

उत्तर अमेरिकेत अनेक बुद्धिमान, कर्तृत्ववान मंडळी आहेत आणि मला या सर्व लोकांना भेटायला आवडेल. नुकताच मी मेयो क्लिनिकसारख्या मोठ्या संस्थेमधील शास्त्रज्ञांशी संवाद साधला. ते भारतात कॅन्सर रिसर्चसाठी काम करू इच्छितात. अशा कल्पनांना पाठिंबा देणे हाच माझा मुख्य उद्देश आहे.

**आता थोडसं तुमच्या करिअरबद्दल. तुम्ही सैन्यदलात जाण्याचं कधी ठरवलं आणि त्यामागची प्रेरणा काय होती?**

सगळ्यात पहिलं कारण म्हणजे, मी अतिशय प्रखर राष्ट्रभक्ती असलेल्या घरात जन्मले आणि वाढले. माझे आजोबा स्वातंत्र्यसैनिक होते. माझ्या आजीने वैद्यकीय शिक्षण घेतले होते. एक अनाथ मुलगी आणि नंतर बालविवाहिता असून सगळ्या परिस्थितीशी लढून वैद्यकीय शिक्षण घेणे हा तिचा प्रवास खूपच कठीण होता. त्यामुळे मला आजी-आजोबांकडून खूप प्रेरणा मिळाली. दुसरं म्हणजे, या सगळ्या कौटुंबिक पार्श्वभूमीवर मी एकदा योगायोगाने एएफएमसीला (AFMC) गेले होते. तिथली एकंदरीत शिस्त, लोकांची हुशारी हे सगळं पाहून मी ठरवलं की मला या सगळ्याचा भाग व्हायचं आहे. आणि तिसरी गोष्ट म्हणजे, बारावीत असताना मी माझ्या भावी पतीला भेटले. ते त्यावेळी नुकतेच एनडीए (NDA) मधला अभ्यासक्रम संपवून बाहेर पडले होते. सैन्यदलाबद्दल सगळ्यांना असतं

तसं कुतूहल, आकर्षण मलाही होतं आणि त्यांच्या भेटीनंतर माझ्या करिअरची आणि आयुष्याची पूर्ण दिशाच बदलून गेली.

**तुम्ही आणि तुमचे पती लेफ्टनंट जनरल राजीव कानिटकर ह्यांना भारतीय लष्करातील पहिले 'थ्री-स्टार जनरल' दाम्पत्य असा मान मिळाला. सैन्यदलातली एवढी मोठी जबाबदारी सांभाळताना तुम्ही घर, नोकरी आणि करिअर यांचा समतोल कसा साधला?**

हा प्रश्न आम्हाला दोघांनाही नेहमी विचारला जातो. कुठल्याही करिअरमध्ये असलेल्या पती आणि पत्नी या दोघांनाही एकमेकांना समजून घेणे खूप महत्त्वाचे असतं. आमच्या बाबतीत बोलायचं तर आम्ही दोघेही लष्करात होतो. आमच्या ३६ वर्षांच्या लग्नाच्या प्रवासात, २४ वर्षे आम्ही एकमेकांपासून लांब होतो. तरीही भारतीय लष्करातील करिअर यशस्वी होऊन पहिले 'थ्री-स्टार जनरल' जोडपे होण्याचा मान आम्हाला मिळाला. सिॲटलच्या अधिवेशनात माझ्या कामाचा आणि वैयक्तिक आयुष्याचा समतोल कसा राखला यावर मी बोलणारच आहे.

**भारतीयांची जी पिढी आज परदेशात राहते, त्यांना तुम्ही काय सल्ला द्याल?**

परदेशात राहत असतानाही घरी आपली मातृभाषा बोलणे खूप गरजेचे आहे. लहान मुलांवर सुरुवातीपासून आपल्या भाषेचे आणि संस्कृतीचे संस्कार झाले, तर त्यांचा आत्मविश्वास वाढतो. याबद्दलचे शास्त्रीय पुरावेही उपलब्ध आहेत. आम्ही लष्करी कामातून शिकलेला मुद्दा म्हणजे शिस्त! तुम्ही देशात असाल किंवा परदेशात, 'स्वयंशिस्त' (Self-discipline) ही प्रत्येकासाठी आवश्यक आहे. त्यामुळे ती प्रत्येकाने पाळायला हवी. शिवाय आपण परदेशात राहूनही आपल्या देशासाठी काय करू शकतो, ही Sense of ownership प्रत्येकामध्ये असणे खूप महत्त्वाचे आहे. याही विषयावर तुमच्याशी मी अधिवेशनात संवाद साधणार आहे.

सैन्यदलातील महिला अधिकारी, डॉक्टर आणि शिक्षिका अशा विविध भूमिका सांभाळणाऱ्या **डॉ. माधुरी कानिटकर** यांचे विचार अधिवेशनात ऐकण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत. तुम्हीही अधिवेशनाला येताय ना?

वेबसाईट: https://bmmseattle2026.org/

मुलाखतकार आणि शब्दांकन: **पराग सहस्रबुद्धे,**
बीएमएम २०२६ मार्गदर्शक समिती / सुकाणू समिती

## बीएमएम २०२६: संवाद



**बीएमएम २०२६: संवाद:**
**सह-संयोजिका**
**(Co-convener)**
**श्रीमती सविता मोरे**

**नमस्कार. बीएमएम २०२६ अधिवेशनाच्या सह-संयोजिका म्हणून जबाबदारी सांभाळताना तुम्हाला कसं वाटतंय? तुमच्या भावना काय आहेत?**

दोन वर्षांपूर्वी जेव्हा मला विचारण्यात आलं की "तू हे करशील का?", तेव्हा ही खूप मोठी जबाबदारी आहे हे मला माहीत होतं. पद मोठं आणि मानाचं आहे, पण या पदी निवड होणं हे काही केवळ वैयक्तिक यश आहे असं मला वाटलं नाही किंवा तशा प्रकारचं अप्रूपही नव्हतं. याआधीही मी सिएटल महाराष्ट्र मंडळात विविध उपक्रमांवर काम केलं आहे. स्वयंसेवा करायची (Volunteering), तर सगळ्यात पहिल्यांदा तुमच्या मनात त्या गोष्टीची आवड असायला हवी. "हे मला करायचंच आहे आणि मी ते करणारच!" असा एक निर्धार असायला हवा. आणि महत्त्वाचं म्हणजे, ते का करायचं आहे, कशासाठी करायचं आहे आणि मग ते कसं करायचं, याविषयी ध्येय स्पष्ट असायला हवं.

ज्या समाजात मी राहते, त्या समाजासाठी आपल्याला काहीतरी चांगलं करायचं आहे; मग त्यासाठी वेळ द्यायचा, अगदी तो रोजच्या रोज द्यावा लागला तरी हरकत नाही, हे मी आधीच ठरवलं होतं आणि मग पुढच्या गोष्टी सोप्या होत गेल्या. गेली दोन वर्षं हे काम करताना खूप मजा आली. यासाठी खूप वेळ द्यावा लागला. आता अधिवेशन जवळ येतंय, तशी 'काय होणार, कसं होणार' अशी एक धाकधूक नक्कीच वाटते आहे. पण आता जवळजवळ ९०% कामं पूर्णत्वास आली आहेत याचा आनंदही होतोय आणि लोकांना, मित्रमंडळींना भेटायला मिळणार याचाही उत्साह आहे.

या अधिवेशनामध्ये पहिल्यांदाच 'स्त्री सन्मान' सोहळा होणार आहे आणि याचा मला खूप अभिमान वाटतो. मी २०२२ साली सिएटल महाराष्ट्र मंडळाची अध्यक्ष होते. माझ्या नंतर सलग चार वर्षं

महिला अध्यक्ष होत्या. मी सिएटल तसेच उत्तर अमेरिकेतल्या महिलांना स्वयंसेवेसाठी पुढे येण्याचं आवाहन करेन. या कामामध्ये खरंच खूप मजा असते आणि एक वेगळंच समाधान मिळतं.

**या अधिवेशनात लहान मुलांपासून ते ज्येष्ठांपर्यंत प्रत्येक वयोगटासाठी काहीतरी खास असणार आहे. या विविध कार्यक्रमांचं नियोजन करताना तुम्ही आणि तुमच्या टीमने काय विचार केला होता?**

हो, या अधिवेशनात बीएमएम इनिशिएटिव्ह्ज (BMM Initiatives) अंतर्गत गुरुवारी म्हणजेच 'डे झिरो'ला (६ ऑगस्ट) विविध कार्यक्रम होणार आहेत. ४ वर्षांपासून ते ८०-८५ वर्षांपर्यंतचे सर्व वयोगट एकत्र यावेत, हा यामागचा मुख्य हेतू आहे. 'बालतरंग' आणि 'किशोरकुंज' अंतर्गत ४ ते ११ आणि १२ ते १८ वयोगटांतील शाळकरी विद्यार्थी सहभागी होत आहेत. व्यावसायिकांसाठी 'बी-कनेक्ट' (B-Connect) आहे. ५५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांसाठी 'उत्तररंग' आहे. डॉक्टरांसाठी 'सीएमई' (CME - Continuing Medical Education) आहे. तसेच 'आर्टिस्ट गॅलरी' (Artists Gallery) आहे, ज्यामध्ये कलाकार आणि चित्रकार भाग घेणार आहेत. १९ ते ३५ वर्षे म्हणजेच ज्याला आपण 'क्रीम वयोगट' म्हणू शकतो, हा ग्रुपसुद्धा युवा कार्यक्रमांच्या माध्यमातून या अधिवेशनात जोडला गेला आहे.

**अमेरिकेत वाढणाऱ्या पुढच्या तरुण पिढीला आपल्या मराठी संस्कृतीशी जोडून ठेवणं, हे बीएमएमचं तसेच या अधिवेशनाचं एक प्रमुख उद्दिष्ट आहे. तर त्यांच्यासाठी या अधिवेशनात काय आकर्षणं आहेत?**

हो, हे अगदी बरोबर आहे. आपली जी छोटी मुलं आणि तरुण पिढी असते, ती बऱ्याचदा अशा कन्व्हेन्शन्सपासून थोडीशी दूर राहते; त्यांना इथे यायला नको असतं. पण आपल्या या अधिवेशनात मुलांसाठी शाळांचे नाटक, गाणी, नृत्य आणि स्टँड-अप कॉमेडी (Stand-up Comedy) असे सर्व वयोगटांना आवडतील असे वैविध्यपूर्ण कार्यक्रम आयोजित केले आहेत.

जी मुलं कॉलेजला आहेत किंवा ज्या तरुण मंडळींनी नुकतंच काम सुरू केलं आहे, ती 'एआय' (AI - Artificial Intelligence) वर्कशॉपमध्ये भाग घेऊ शकतात. डॉ. आनंद देशपांडे यामध्ये प्रमुख व्याख्याते आहेत, त्यामुळे ही एक अतिशय उत्तम संधी आहे. आपल्या अधिवेशनामध्ये इतरही बरेच कार्यक्रम आहेत; जसं की 'द फोक आख्यान' आहे, ज्यामध्ये अनेक तरुण मुलं कलाकार म्हणून सहभागी आहेत. हा खूपच बहारदार कार्यक्रम असणार आहे आणि तो बघायला तरुणांना नक्कीच आवडेल.

**ज्येष्ठ नागरिकांसाठी आयोजित केलेल्या कार्यक्रमांमध्ये कोणती वैशिष्ट्ये पाहायला मिळतील?**

ज्येष्ठ नागरिकांसाठी आपण 'उत्तररंग' आयोजित केल आहे. यामध्ये **डॉक्टर संजय उपाध्ये** यांचं व्याख्यान असेल. मानसिक आरोग्यावर (Mental Health), तसेच ज्येष्ठ मंडळींसाठी प्रवास आणि पर्यटनावर (Travel & Tourism) विशेष चर्चासत्रं (Panel Discussions) होणार आहेत. आणि या मंडळींसाठी सगळ्यात मोठं आकर्षण म्हणजे 'अंताक्षरी'! सर्व ज्येष्ठ मंडळींना अंताक्षरीमध्ये खूप धमाल करता येईल.

**वेगवेगळ्या व्यावसायिक गटांसाठीही कार्यक्रम आयोजित केलेले आहेत का?**

नक्कीच! यामध्ये 'बी-कनेक्ट', 'रिअल इस्टेट एक्स्पो' आणि 'सीएमई'चा (Continuing Medical Education) समावेश आहे. मी आधी म्हटलं तसं, बी-कनेक्टमध्ये 'Persistent'चे संस्थापक **डॉ. आनंद देशपांडे** येणार आहेत. तसेच श्रीमती सोनाली देशपांडे त्यांच्या 'शी शेप' (She Shape) या कंपनीबद्दल बोलणार आहेत. ते करिअरच्या संधी, त्यांचे व्हिजन आणि एआय टेक्नॉलॉजीबद्दल (AI Technology) मार्गदर्शन करतील. मायक्रोसॉफ्टसारख्या कंपन्यांमधूनही उच्चपदस्थ व्यक्ती आपल्याकडे येत आहेत. त्यामुळे व्यावसायिक गटांसाठी 'बी-कनेक्ट' हा अतिशय फायदेशीर उपक्रम ठरेल. शिवाय यात असेही अनेक जण आहेत जे ॲग्रीकल्चरवर काम करतंय, कोणी फार्मिंग करतंय, तर कोणी अमेरिकेत व्यवसाय करतंय. रिअल इस्टेट एक्स्पोमध्ये सर्व रिअल इस्टेट इन्व्हेस्टर्स आणि बिल्डर्स एकत्र येणार आहेत. त्या सर्वांना नेटवर्किंगची उत्तम संधी मिळेल. शिवाय, अधिवेशनातल्या 'बिझनेस एक्स्पो'मध्ये बूथ घेऊन तुम्ही तुमच्या व्यवसायाचा प्रचार आणि प्रसार करू शकता.

**अधिवेशनातल्या सर्व कार्यक्रमांपैकी असा कोणता कार्यक्रम आहे, ज्याची तुम्ही वैयक्तिकरीत्या आतुरतेने वाट पाहत आहात?**

अर्थातच 'शाळा'! मला मुलं खूप आवडतात आणि या उपक्रमात जवळजवळ ७७ मुलं भाग घेत आहेत. त्या सगळ्यांची सध्या जोरदार प्रॅक्टिस सुरू आहे बरं का! पहिल्या दिवशी दीपप्रज्वलनाच्या आधी राष्ट्रगीत गायनातही राष्ट्रगीत गायनामध्ये मुलांचा सहभाग असावा ह्या दृष्टीने आम्ही काम करत आहोत. मुलांसाठी ही खूप छान संधी आहे आणि मी स्वतः याची आतुरतेने वाट पाहत आहे.

**उत्तर अमेरिकेतून तसेच बाहेरूनही अधिवेशनाला येऊ इच्छिणाऱ्या सर्व मराठी बांधवांना तुम्ही काय संदेश देऊ इच्छिता?**

उत्तर अमेरिकेतून जे प्रेक्षक हे अधिवेशन बघायला येत आहेत, आणि भारतातून जे कलाकार किंवा रसिक येत आहेत, त्या सर्वांना आमचं मनापासून आणि आग्रहाचं आमंत्रण! तुम्ही नक्की या. आम्ही गेल्या दोन वर्षांपासून यावर खूप मेहनत घेत आहोत. सिएटलमधले जवळजवळ १५० व्हॉलेंटिअर्स यासाठी रात्र-दिवस काम करत आहेत. आपलं काम, संसार, मुलंबाळं हे सगळं सांभाळून सर्वांनी अधिवेशनासाठी वेळ काढला आहे. या कार्यक्रमात खूप मजा येईल; उत्तम जेवणाची सोय आहे आणि दर्जेदार कार्यक्रम आहेत. संगीताचे कार्यक्रम, नाटकं आणि नृत्याविष्कार आहेत. रंगतदार ओपनिंग सेरेमनी आणि शानदार क्लोजिंग सेरेमनी असणार आहे. गाण्याची स्पर्धा 'स्वरमंच', स्टँड-अप कॉमेडी आणि एकांकिका स्पर्धा रंगणार आहेत. त्यामुळे तुम्हा सर्वांना एक उत्तम आणि अविस्मरणीय अनुभव मिळेल याची आम्हाला खात्री आहे. आम्ही सगळेच तुमची आतुरतेने वाट पाहत आहोत!

वेबसाईट: https://bmmseattle2026.org/

मुलाखतकार आणि शब्दांकन: **पराग सहस्रबुद्धे,**
बीएमएम २०२६ कार्यक्रम समिती

## बीएमएम २०२६ -
## नाट्यसृजन एकांकिका स्पर्धा

बीएमएम अधिवेशन २०२६ अजून रंगतदार होण्यासाठी इतर कार्यक्रमांसोबतच काही स्पर्धाही आयोजित केल्या आहेत. त्यातली एक महत्वाची नाट्यसृजन ही एकांकिका स्पर्धा आहे.

आधीच आपण मराठी लोक नाट्यवेडे!! नाटकाचा कुठलाही प्रकार आपल्याला वर्ज्य नाही. त्यामुळे संगीत नाटक ते पथनाट्य सगळ्यासाठी गुणी कलावंत आणि रसिक प्रेक्षक तयार असतात. त्यातलाच एकांकिका हा अत्यंत महत्त्वाचा प्रकार. गेली कितीतरी वर्ष पुण्यात पुरुषोत्तम आणि मुंबईत आय एन टी ह्यासारख्या एकांकिका स्पर्धा अगदी उत्साहाने आयोजित केल्या जातात आणि अटीतटीने रंगतात. रंगभूमीला अनेक नामवंत कलाकार त्यातून सापडतात.

एकांकिका हे मूर्ती लहान पण कीर्ती महान असंच म्हणावं लागेल. कारण मोजक्या वेळात कसदार लेखन, अभिनय आणि अत्यावश्यक तेच किंवा अगदी कमी नेपथ्य आणि रंगभूषा ह्याच्या साथीने एक उत्तम कलाकृती सादर करायची असते. त्यामुळे ते सर्वांसाठीच एक आव्हान ठरत.

नाट्यसृजन स्पर्धा जाहीर झाल्यावर अतिशय उत्तम प्रतिसाद मिळाला. म्हणजे त्यात सहभागी होण्यासाठी किती कलाकार उत्सुक आहेत ह्याचीच ती पावती होती. २५ पेक्षा अधिक प्रवेशिका आल्या. अमेरिकेतल्या विविध राज्यातून आल्या. क्वचित कुणी दोन सुद्धा पाठवल्या.

प्रवेशिका भरण्यापासून ते व्हिडिओ रेकॉर्डिंग पाठवण्यापर्यंत शक्यतो कुणाला काही अडचण येऊ नये ह्याकडे आमचा कटाक्ष होता. त्यासाठी सर्व संचांसोबत फ़ोन कॉल्स सुद्धा केले. सर्व गोष्टी वेळेवर पूर्ण व्हाव्यात जेणेकरून कुठेच घिसाडघाई होणार नाही अशीही काळजी घेतली.

प्रथम फेरीमध्ये २० एकांकिका आमच्याकडे आल्या. सर्वांनी व्हिडिओ रेकॉर्डिंगच पाठवायचे होते. त्यानंतर त्या २० मधून उपांत्य फेरीसाठी ८ ची निवड झाली. त्या निवडीचे निकष निश्चित ठरवले होते. अगदी कौतुकाची गोष्ट म्हणजे सगळे विषय वैविध्यपूर्ण होते. काही अपवाद वगळता लेखक सुद्धा स्थानिक होते. चाकोरीबद्ध विषय न निवडता सगळ्यांनी सादरीकरणाचे पैलू फार चित्तवेधकपणे साकारले. आता अंतिम फेरीसाठी सर्वांना उत्सुकता आहे. अंतिम फेरीत निवडलेल्या पाच एकांकिका प्रत्यक्ष सादर होणार आहेत. आपल्या उत्तर अमेरिकेतल्या गुणी कलाकारांना बघण्यासाठी सगळेच उत्सुक आहेत.

उत्तम लेखन, अभिनय, दिग्दर्शन, सादरीकरण ह्या सगळ्याची चुरस आहे. त्यासाठी बीएमएम २०२६ सिॲटल' इथे नक्की हजेरी लावा.



**अंतिम फेरीतील ५ एकांकिका:**

1. **The Conscience**: California Arts Association, San Jose, California
2. **प्रतिबिंब**:अभिव्यक्ती, Los Angeles, California
3. **स्टॉकहोमच्या भातुकलीचे हॉस्पिटल**: Basement Theatre of Chicago, Chicago, Illinois
4. **जगप्रवास**: नाट्यरंग, Boston, Massachusetts
5. **ईमान**: अमृत निर्मिती, Washington DC

उपांत्य फेरीसाठी आम्हाला परीक्षक म्हणून **श्री विजय केंकरे** आणि **श्री अरुण नलावडे** ह्यांच्यासारखे ज्येष्ठ आणि अनुभवी रंगकर्मी मिळाले.

**श्री. अरूण नलावडे हयांचे मनोगत:** 'बीएमएम अधिवेशन सिॲटल'च्या निमित्ताने भरवलेल्या नाट्यसृजन एकांकिका स्पर्धेची प्राथमिक फेरी पाहण्याचा योग आला. दोन्ही गोष्टींचा आनंद आहे, एक तर अधिवेशनाला सिॲटलमध्ये होतंय आणि दुसरी गोष्ट एकांकिका स्पर्धांचं आयोजन होतं आहे... म्हणजे आपण आपलं मूळ कधी विसरत नाही, ते तुम्ही जपून ठेवलंय म्हणून तुमचं खरं तर कौतुक.

तर अशा सात ते आठ एकांकिका पाहण्याचा, विजय केंकरे आणि मी याचे दोन परीक्षक होतो आणि दोघांनी चर्चा करून पुढे एकांकिका कुठल्या पाठवायच्या अंतिम फेरीत, त्या ठरल्या. एकांकिका चांगल्या दर्जाच्या होत्या. प्रत्यक्ष रंगमंचावर तो तुम्ही सादर करताना त्याचा परिणाम अधिक येणार आहे. अर्थात यासाठी तुम्हाला तालीमीची अधिक गरज लागणार आहे, ती तुम्ही करालच.

मुळात मला कौतुक एका गोष्टीचं वाटतं की, या सगळ्या तुमच्या कामाच्या गर्दीतून तुम्ही हा वेळ कसा काढता? आपण सगळ्यांनी तो वेळ त्याला दिला, त्याला महत्त्व दिलं, याबद्दलही कौतुक. जी कोणी मंडळी आपली संस्कृती जपण्याचा प्रयत्न करतायत, ते यशस्वी करण्याचा प्रयत्न करतायत, त्यांनी नुसतं 'मम' म्हणायला हात तरी लावा, हे खूप महत्त्वाचं आहे असं मला वाटतं. भरपूर लोकांनी यावं असं अपेक्षित आहे खरं तर. आळस झटका प्रत्येकाने आणि या संमेलनाला उपस्थित राहा."

**श्री. विजय केंकरे ह्यांचे मनोगतः** "'नाट्यसृजन एकांकिका स्पर्धा २०२६'. मी त्याच्या प्राथमिक फेरीचा परीक्षक होतो. मुळात अमेरिकेमध्ये किंवा भारत देशाच्या बाहेर अशा प्रकारचा उपक्रम होतोय, हीच गोष्ट मुळात स्तुती करण्यासारखी आहे. आणि नुसता उपक्रम नाही, तर मला आश्चर्य वाटलं की, इतके वेगवेगळे विषय आणि त्यांचं वेगवेगळ्या पद्धतीचं सादरीकरण. परीक्षण करताना मला खूप मजा आली. माझ्याबरोबर अरुण नलावडे होता. अरुणलाही खूप मजा आली असणार.

अगदी प्रोफेशनल असावं, इतकं काही लोकांनी त्याच्यात चांगलं काम केलं होतं आणि या अशा प्रकारच्या एकांकिका स्पर्धा अमेरिकेमध्ये काय, युरोपमध्ये काय, भारताच्या बाहेर सातत्याने होत राहिला पाहिजे. कारण प्रत्येकाला आपलं म्हणणं नाटकाच्या माध्यमातून मांडायची ही संधी आहे आणि असं म्हणणं प्रत्येकाने मांडलंय आणि तशाच एकांकिका अंतिम फेरीसाठी आम्ही निवडल्या आहेत, त्या सगळ्यांना शुभेच्छा.

मला एक जाणवलेली गोष्ट महत्त्वाची अशी की, तिथे मंडळी लिहितायत. प्रत्येक राज्यामध्ये, जिथून-जिथून एकांकिकेच्या प्रवेशिका आल्या आहेत, तिथे लोकांनी एकांकिका लिहिल्या होत्या. मला असं वाटतं की, एका बाजूला आपण म्हणतो मराठी भाषा, भाषेचं संवर्धन करायला पाहिजे, तर आज आपल्या देशाबाहेर, बीएमएम अधिवेशनाला इतकी वर्ष अमेरिकेत होतंय, युरोपमध्ये अधिवेशनाला होतंय, आता युरोपमध्ये एकांकिका स्पर्धा झाली, तशीच आताही अमेरिकेत एकांकिका स्पर्धा होतेय, खूप-खूप आनंद होतोय, मजा येतेय हे सगळं बघायला.

काही लोकांचं काम किंवा लेखनाचं तंत्र बघून मला असं वाटलं, की कदाचित ही मंडळी इथे असती, तर आम्ही व्यवसायात उतरवू शकलो असतो की नाही माहीत नाही. देशापासून दूर राहूनसुद्धा ही मंडळी चांगलं इतकं काम करतायत. कदाचित त्यामुळेच ते जास्त प्रेमाने हे काम करत असावेत. मला ही स्पर्धा बघायला खूप-खूप मजा आली. "

ह्या सगळ्या एकांकिका तसेच उत्तर अमेरिकेतील कलाकारांचे उत्तामोत्तम कार्यक्रम बघण्यासाठी अधिवेशनाला नक्की उपस्थित रहा.

- **सुखदा देवधर,**
बीएमएम २०२६ नाट्यसृजन एकांकिका समिती

**राशिभविष्य : जुलै २०२६**
**"२६ जुलै पासून वक्री शनि तुमच्या जीवनात आनंदमय घटना घडवेल."**
**अजय तनखीवाले**
https://bmmonline.org/rashi-bhavishya/

## बीएमएम २०२६ -
## अधिवेशन संकल्पना गीत

**दहा दिशांतून जमले सारे,**
**संस्कृतीचे हे सांगाती!**

पाचूनगरी अशी यथार्थ ओळख सांगणाऱ्या सिॲटल या शहरात होऊ घातलेल्या बृहन्महाराष्ट्र मंडळ २०२६ अधिवेशनाचे घोषवाक्य आहे - **'जपूया संस्कृती, विणूया नाती!!'** बीएमएमच्या या २२ व्या अधिवेशनाची तयारी पूर्ण जोमानिशी सुरू आहे आणि त्यासाठी हे घोषवाक्य अत्यंत उचित आहे. बीएमएमच्या स्थापनेपासून, किंबहुना महाराष्ट्राच्या पाऊलखुणा जगभर उमटवणाऱ्या सर्वांनीच, या ना त्या प्रकारे आपली संस्कृती फक्त जपण्याचाच नव्हे, तर ती अभिमानाने सर्वतोपरी जोपासण्याचा आटोकाट प्रयत्न केला आहे. नवी नाती निर्माण केली आहेत आणि जुन्या नात्यांची वीण घट्ट केली आहे. सप्तसागरापलीकडे एका खंडात लावलेल्या इवल्याशा रोपाचा 'वेलू गेला गगनावरी' अशी वस्तुस्थिती आज दिसण्यासाठी अनेक हातांनी अनेक वर्षे त्या रोपाचे जिव्हाळ्याने संगोपन केले आहे.

या परंपरेचा वारसा चालू ठेवताना अधिवेशनाचे यजमानपद सिॲटलकरांनी मोठ्या उत्साहाने स्वीकारले आहे. आणि त्या उत्साहाला साजेसे गीत सुप्रसिद्ध कवी **श्री. संदीप खरे** यांच्या संवेदनशील लेखणीतून साकारले आहे. त्यात जोम आहे, उल्हास आहे, मराठीपणाचा गौरव आणि अधिवेशनाचे अंतरंग आहे. सिॲटलचा निसर्ग अन् विविधता, आशावाद आणि आधुनिकता यालाही कौतुकाची दाद दिली आहे. या गीताला साजेसे संगीत आमचे सिॲटलकर
**श्री. प्रसन्न गणपुले** यांचे आहे. उत्तर अमेरिकेतील विविध शहरांमध्ये मराठी संस्कृती जपण्यासाठी केल्या जाणाऱ्या प्रयत्नांचं, सोहोळ्यांचं प्रतिबिंब तुम्हांला व्हिडीयोत बघायला मिळेल. तुमच्या शहरांमधली चित्रं/दृष्य किंवा ओळखीची मंडळी व्हिडीयोत दिसली, तर नक्की आम्हाला युट्यूबवरील आमच्या बीएमएम २०२६ वाहिनीवर प्रतिक्रिया देऊन कळवा.!

शब्दांतील भाव जाणून घेणारीआणि गीत ऐकल्यासरशी लगेच ओठांवर यावे व गुणगुणत राहावे अशी सुगम पण चैतन्यपूर्ण, जोशपूर्ण चाल आणि संगीतसाज यामुळे हे गीत खूप संस्मरणीय झाले आहे आणि सगळ्यांना आवडेल ह्याची खात्री वाटते.

जगभर गेली साद मराठी,
जगभर घुमतो नाद मराठी!
करावया जयघोष मराठी,
जपावया संस्कार मराठी,
दहा दिशांतून जमले सारे
संस्कृतीचे हे सांगाती!
जपूया संस्कृती... विणूया नाती!!

सुखमय रंगे इथे सोहळा,
आनंदाचा रंग वेगळा;
देश असो परदेश असू दे,
सदा मराठी थाट आगळा!
पुत्र मराठी जेथे जाती,
नक्षत्रांसम लखलखती!!
जपूया संस्कृती... विणूया नाती!

स्वागतास हे उभे सिॲटल,
नाव जयाचे जगात उज्ज्वल!
झिमझिम पाऊस... हवा सावळी,
पाचूनगरी मुक्त मोकळी!
ऐशा जागी जमले अतिथी,
ही तर झाली भाग्ययुती!
जपूया संस्कृती... विणूया नाती!!

विश्व मराठी जमले सारे,
परस्परांशी रमले सारे!
आधुनिकतेचा ठसा तरीही,
वसा मराठी मनामध्ये!!
हाच वारसा जपला आपण,
अन् जपण्याचा निश्चय कायम!
करू मराठी संस्कारांनी,
नव्या पिढीचा पाया भक्कम!!
उजळत राहो दीप मराठी,
हीच असावी फलश्रुती!
जपूया संस्कृती... विणूया नाती!!

**YouTube Link:**
[BMM2026 Sankalpana Geet]

**शब्दांकन- अश्विनी देवधर,** बीएमएम २०२६ स्मरणिका समिती

## रेशीमगाठी २०२६ सिॲटल

नमस्कार मंडळी, सिॲटल येथे बीएमएम २०२६ अंतर्गत रेशीमगाठी कार्यक्रमाचे आयोजन **शनिवार, ८ ऑगस्ट २०२६** रोजी करण्यात येत आहे. नोंदणी फॉर्म भरलेल्या सर्व सहभागी व्यक्तींना आम्ही पुढील माहिती व आवश्यक सूचना लवकरच पाठवू. आम्ही आपले मनःपूर्वक स्वागत करतो. आपल्या सहभागामुळे आम्हाला अत्यंत आनंद होईल.🙏

**नाते मना-मनांचे, असे सप्त जन्मांचे :** बीएमएम सिॲटल २०२६ अंतर्गत आयोजित रेशीमगाठी हा केवळ एक कार्यक्रम नसून, भावी वर-वधू आणि त्यांच्या कुटुंबीयांना एकत्र आणणारा एक अर्थपूर्ण मंच आहे.

**या उपक्रमाचे विशेष वैशिष्ट्य:**

- भावी वर-वधूंचा सुसंवाद मेळावा
- इथे मनांची भेट होते आणि नाती नव्या प्रवासाची सुरुवात करतात
- पालकांमधील संवाद व परिचयासाठी विशेष संधी
- कुटुंबीयांना योग्य जोडीदार शोधण्यासाठी एक सुसंस्कृत आणि सुरक्षित वातावरण

पूर्व-नोंदणी आवश्यक असल्यामुळे कृपया लवकरात लवकर नोंदणी करा. नोंदणीसाठी ह्या लिंकवर क्लिक करा - Reshimgathi Form आपल्या सहभागाची आम्ही आतुरतेने वाट पाहत आहोत.

**- बीएमएम२०२६ रेशीमगाठी सिॲटल समिती**




## बीएमएम २०२६ प्रायोजकांची माहिती

### पर्सिस्टंट

**कार्यक्षमता, उत्पादकता आणि गुणवत्ता अधिक उंचावण्यासाठी पर्सिस्टंट कंपनी AI-सक्षम प्लॅटफॉर्म्सद्वारे सेवा प्रदान करते. अधिक माहितीसाठी persistent.com ला भेट द्या.**




### पीएनजी ज्वेलर्स

**तुमचा आवडता ज्वेलर तुमच्या सेवेत, अगदी सहज. तुमच्या आवडीचे दागिने मिळतील, एका क्लिकवर. दागिने खरेदीचा आनंद, आता घरबसल्या.**



## कोटीभास्कर डेव्हलपर्स:

## A Legacy Built on Trust

**Connecting hearts across miles, building trust across generations.**

**कोटीभास्कर डेव्हलपर्स -आम्ही मनात घर करतो**

Over four decades ago, a vision took root to transform the landscape of real estate with a simple, unyielding promise: "विश्वासाचा पाया, गुणवत्तेचा कळस " (Faith as the Foundation, Quality as the Pinnacle). In 1982, the seeds of this commitment were sown in Sangli. Today, that small beginning has grown into a magnificent, deeprooted banyan tree whose branches flourish proudly across both Sangli and Pune.

Guided by the foundational pillars of development, trust, and deep responsibility, Kotibhaskar Developers has spent the last 43 years proving that we don't just build structures, we live the dreams of our customers alongside them. With a stellar track record of over 43 years of engineering expertise, 120+ successfully delivered projects, 200+ custom luxury bungalows, and 3.2 million square feet of developed area, we have earned the unwavering trust of more than 2,200 happy families.

Today, our extended corporate family consists of a dedicated team of 90+ professionals who work tirelessly to ensure that every client's dream of a premium home becomes a reality. At Kotibhaskar, our expertise spans premium new constructions, custom homes, and standing as an industry leader in the Building Redevelopment sector. We understand that transforming an old family property requires immense sensitivity, absolute transparency, and a customer-first mindset. Redevelopment is not about erasing the past; it is about preserving the beautiful, emotional history attached to your ancestral land while upgrading your lifestyle. We protect the cherished memories embedded in the old walls while giving shape to modern, vibrant aspirations. This commitment is brought to life through our four non-negotiable qualities: thoughtful precision planning, uncompromising material quality from foundation to finish, cutting-edge engineering technology with state-of-the-art amenities, and stunning architectural elevations designed with unique imagination and artistic beauty. We do not merely make promises; we honor every single commitment we make, keeping on-time delivery as our highest professional duty. As a brand that thrives on relationships and shared values, Kotibhaskar Developers is deeply honored to return as a proud sponsor for the second consecutive time at the BMM Convention 2026 in Seattle. For us, supporting the BMM community is not a mere corporate collaboration; it is a profound celebration of our shared Maharashtrian culture, traditions, and identity. This global platform perfectly mirrors our own inner ethos, preserving the rich heritage of our roots, celebrating vibrant community bonds, and creating a safe haven for Maharashtrians across the world. For our global Marathi diaspora, we offer a seamless, deeply secure bridge to reconnect with home. Whether you wish to revitalize an ancestral family property through expert redevelopment or invest in Maharashtra's finest premium locales, you are partnering with an organization that shares your values and understands your heart. We invite you to experience the perfect harmony between modern, high-end living and timeless cultural roots by visiting www.kotibhaskar.com

## वीणा वर्ल्ड

**तुमच्या मनासारखं जग अनुभवा; जेव्हा हवं, जिथे हवं आणि ज्यांच्यासोबत हवं तसा प्रवास करा. तुम्ही फक्त नव्या ठिकाणांचा आनंद घ्या; नियोजन, समन्वय आणि संपूर्ण प्रवासातील मदत या सगळ्याची जबाबदारी आम्ही सांभाळू. तुम्ही तुमच्या जोडीदारासह , कुटुंबासोबत, मित्रमंडळींसोबत प्रवास करत असाल किंवा एखादा खास टप्पा/आनंदसोहळा साजरा करत असाल, तुमच्यासाठी खास, तुमच्या आवडीनुसार नियोजन केलेली सुट्टी साकारण्यात आम्ही तुम्हाला मदत करू.**

**अमेरिकेतील तुमच्या जवळच्या वीणा वर्ल्ड ट्रॅव्हल प्रतिनिधीकडून माहिती घ्या किंवा Veena World USA, Inc. शी संपर्क साधा.**




## चला बीएमएमला जाऊ, चला सिॲटल पाहू

सिॲटलला पाचू नगरी (Emerald City) असं म्हणतात कारण तिथली नैसर्गिक हिरवाई आणि सदाहरित सौंदर्य. हे नाव शहराच्या नैसर्गिक सौंदर्याचं प्रतीक आहे. सिॲटल आणि आसपासचा Pacific Northwest प्रदेश हा दाट सदाहरित जंगलांनी भरलेला आहे. देवदार, फर, पाइन अशी झाडं वर्षभर हिरवीगार राहतात. त्यामुळे संपूर्ण परिसर पाचूच्या हिरव्यागार रंगासारखा दिसतो. इथे पाऊसही बऱ्यापैकी नियमित पडतो, त्यामुळे निसर्ग नेहमी टवटवीत आणि हिरवागार राहतो. याच सुंदर, हिरव्यागार निसर्गामुळे Emerald City" हे नाव लोकप्रिय झालं.

सिॲटल हे शहर निसर्ग आणि आधुनिकतेचा सुंदर संगम आहे, एकीकडे हिरवीगार झाडं, डोंगर आणि फेसाळणारा प्रशांत महासागर तर शहरातील स्पेस नीडल, पाईक प्लेस मार्केट वगैरेचा गीतातील उल्लेख हेच अधोरेखित करतं. आणि बीएमएम २०२६ अधिवेशनामुळे हा अनुभव अधिक खास होणार आहे.

बीएमएम २०२६ च्या प्रमोशनसाठी सिॲटल महाराष्ट्र मंडळातील उत्साही मंडळींनी **'बीएमएम २०२६ची दवंडी'** हे सुंदर पथनाट्य सादर केले होते. मंडळातील स्थानिक सदस्या कवयित्री, लेखिका **सौ. कादंबिनी धारप** यांनी त्यासाठी सुंदर गीत लिहिले. ह्या गीताचं composition गायक **श्री. श्रीराम कोप्पीकर** यांनी केले. या गीतातून सिॲटलचं अत्यंत सुंदर आणि जिवंत चित्र उभं राहतं.

**"चला BMM ला जाऊ, चला सिॲटल पाहू"** या ओळींमधून सर्वांना मनापासून आमंत्रण आहे - बीएमएम २०२६ अधिवेशनाला आवर्जून उपस्थित रहा आणि सिॲटलच्या निसर्गसौंदर्याचा आणि आपल्या मराठमोळ्या गौरवशाली संस्कृतीचा अनोखा संगम अनुभवायला नक्की या.

हे गीत ऐकायला आमच्या युट्युब चॅनेलवर उपलब्ध आहे -

Chala Seattle la Jau

**पथनाट्य लिंक:**

बीएमएम २०२६ ची दवंडी

- **अश्विनी क्षीरसागर,** बीएमएम २०२६ समिती

किती दिवसांची मर्जी माझी राया
चला आता पुरी करू
चला बीएमएमला जाऊ,
चला सिॲटल पाहू || १ ||

स्पेस नीडल चा उंच तो मनोरा
घाली भुरळ पहा मनाला
जोडीजोडीने आपण सारे,
नगर दर्शन घेऊ
चला बीएमएमला जाऊ,
चला सिॲटल पाहू || २ ||

नागमोडी त्या वाटांवरुनी,
उंचउंचशा झाडांमधूनी
साद घालते पाचू नगरी,
सुसाट गाडी मारू,
चला बीएमएमला जाऊ,
चला सिॲटल पाहू || ३ ||

मनमोहक फुलांच्या बागा,
फेसाळती त्या सागर लाटा
आणि पाईक प्लेसच्या मार्केट मधुनी
फेरफटका टाकू
चला बीएमएमला जाऊ,
चला सिॲटल पाहू || ४ ||

मराठमोळ्या अधिवेशनात,
विविध कलांचा मांडला थाट
अभिजात या मायबोलीचा,
जागर सारे घालू
चला बीएमएमला जाऊ
चला सिॲटल पाहू || ५ ||

वडापाव ते पुरणपोळीचा,
घमघमाट भरुन राहिला
चविष्ट आपल्या खाण्यावरती ,
चापून ताव मारू
चला बीएमएमला जाऊ,
चला सिॲटल पाहू || ६ ||

चला BMM ला जाऊ
चला सिॲटल पाहू
चला बीएमएमला जाऊ, चला सिॲटल पाहू || ७ ||

**शब्द: सौ. कादंबिनी धारप**
**संगीत संयोजन आणि गायन: श्री. श्रीराम कोप्पीकर**

## अभ्यासाव्यतिरिक्त गवसलेली ओळख

इयत्ता ९वीतील **"अश्मी गायकवाड"** शालेय शिक्षणाबरोबरच "फेन्सिंग" या खेळामध्ये आवड निर्माण करून तिने राष्ट्रीय स्तरापर्यंत यश मिळवले आहे. कमी प्रचलित आणि तुलनेने कठीण मानल्या जाणाऱ्या खेळामध्ये कौशल्य विकसित करणे हे खरोखरच प्रशंसनीय आहे. तिची निवड आणि व्यक्तिमत्त्व हे दर्शविते की ती धाडसी, आत्मविश्वासी आणि वेगळ्या वाटा निवडण्याची तयारी असलेली आहे. फेन्सिंग हा ऑलिंपिक स्तरावर खेळला जाणारा एक वेगवान आणि तांत्रिक खेळ आहे, ज्यामध्ये तलवारीसारख्या शस्त्रांचा (Foil[1], Épée[2], Sabre[3]) वापर करून अचूकता, चपळता, वेग आणि रणनीती यांच्या आधारे प्रतिस्पर्ध्याला हरवले जाते. हा खेळ शारीरिक क्षमता तसेच मानसिक एकाग्रता आणि निर्णयक्षमता विकसित करतो. फेन्सिंगसारखा आगळावेगळा खेळ निवडणे ही या शाळकरी मुलीची खूपच कौतुकास्पद गोष्ट आहे, जी तिच्या धाडस आणि कौशल्याचे दर्शन घडवते.



**तुझ्याबद्दल आम्हाला सांगशील का? तसेच, तुला फेन्सिंगची ओळख कशी झाली?**

मी अश्मी गायकवाड, टस्टिन, कॅलिफोर्निया येथे राहते आणि Legacy Magnet Academy, 9th Grade मध्ये शिकत आहे. लहानपणापासूनच मला फेन्सिंग या खेळाची विशेष आवड निर्माण झाली, जरी मी बास्केटबॉल, सॉकर असे इतर खेळही खेळत होते. मी प्राथमिक शाळेत असताना माझ्या वडिलांच्या मित्राचा मुलगा फेन्सिंग खेळत असे. त्याला खेळताना पाहून मला या खेळाबद्दल खूप आकर्षण वाटू लागले. त्यानंतर मी घरी काठ्यांबरोबर खेळून फेन्सिंगची नक्कल करत असे. माझी ही आवड आणि उत्साह पाहून माझ्या वडिलांनी मला फेन्सिंगचे प्रशिक्षण घेण्यासाठी एका फेन्सिंग अकॅडमीत प्रवेश मिळवून दिला. तेव्हापासून म्हणजे मी 5th Grade

मध्ये असल्यापासून या खेळात सातत्याने मेहनत घेत आहे . मी “Sabre” प्रकारचे फेन्सिंग करते.

**या खेळाबद्दल तुला काय आवडले आणि तो खेळ पुढेही सुरू ठेवावा असे तुला का वाटले?**

फेन्सिंग हा इतर खेळांपेक्षा वेगळा खेळ आहे, कारण हा खेळ खेळताना केवळ शारीरिक कौशल्यच नव्हे तर विचारशक्तीचाही वापर करावा लागतो. मला पूर्वीपासूनच बुद्धिबळाची आवड होती, त्यामुळे मी या खेळाकडे आकर्षित झाले. मला नेहमी वाटते की फेन्सिंग हा एक प्रकारचा मानसिक खेळ (Mind Game) आहे, ज्यामध्ये पुढचा विचार करणे, प्रतिस्पर्ध्याच्या चालींचा अंदाज घेणे आणि योग्य रणनीती आखणे हे अधिक महत्त्वाचे असते. म्हणूनच फेन्सिंगला अनेकदा "शारीरिक बुद्धिबळ" (Physical Chess) असे म्हटले जाते. कारण या खेळात केवळ शारीरिक कौशल्य नव्हे तर बुद्धिमत्ता, एकाग्रता आणि रणनीतिक विचारसरणी यांनाही तितकेच महत्व असते. कालांतराने या खेळाविषयीची माझी आवड अधिक वाढतच गेली आणि फेन्सिंगमध्ये प्राविण्य मिळवायला पाहिजे असे वाटायला लागले. त्यामुळेच मग मी नियमित सराव करायला लागले आणि स्वतःला अधिक चांगले बनवण्यासाठी नेहमी प्रेरित करत राहते.

**तू अभ्यास, ट्रेनिंग आणि स्पर्धा एकत्र कशा प्रकारे सांभाळतेस? तुझा रोजचा दिवस कसा असतो?**

अभ्यास, फेन्सिंगचे प्रशिक्षण आणि विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेणे या सर्व गोष्टींचा समतोल राखणे खूप आव्हानात्मक असते. मी पाचवी इयत्तेपासून हे सर्व सांभाळत आहे. आता मी नववीत आहे, म्हणजेच गेली चार-पाच वर्षे मी हा समतोल यशस्वीपणे राखत आहे.

माझा सकाळचा वेळ शाळा आणि अभ्यासासाठी असतो, तर संध्याकाळचा वेळ फेन्सिंगच्या सरावासाठी राखून ठेवलेला असतो. माझी शाळा सकाळी ८:३० वाजता सुरू होते, त्यामुळे मी साधारणपणे सकाळी ६:३० ते ७:०० वाजण्याच्या दरम्यान उठते. शाळेतून परत आल्यानंतर मी एक तास जिममध्ये व्यायाम करते. त्यानंतर फेन्सिंगचा सराव करते. सराव आटोपून घरी परतल्यावर शाळेचा गृहपाठ आणि इतर अभ्यासासाठी वेळ देते. अश्या प्रकारे माझा संपूर्ण दिवस अभ्यास, प्रशिक्षण आणि इतर कामांमध्ये व्यस्त जातो. या व्यस्त दिनचर्येमुळे मला वेळेचे व्यवस्थापन, शिस्त आणि मेहनतीचे महत्त्व शिकायला मिळाले आहे.

**फेन्सिंगमुळे तुला अभ्यासात किंवा मित्र-मैत्रिणींसोबत वेळ घालवण्यात काही त्याग करावे लागले का?**

मी जेव्हा शाळेच्या नाटकात भाग घेतला होता, तेव्हा माझ्या फेन्सिंगच्या सरावामुळे आणि स्पर्धांमुळे मला नाटकाच्या सरावाला नियमित जाता आले नाही. फेन्सिंगच्या विविध स्पर्धांमुळे काही दिवस मला शाळेतही गैरहजर राहावे लागले. पण त्याच वेळी मला माझा अभ्यासही सांभाळावा लागतो आणि शाळेची सगळी कामे वेळेवर पूर्ण करून द्यावी लागतात. यामुळे जर मला मित्रमैत्रिणिंबरोबर काही करायचे असेल, तर आधी माझा अभ्यास आणि शाळेची सर्व कामे पूर्ण करावी लागतात. त्यानंतरच मी बाहेर जाऊ शकते किंवा इतर गोष्टी करू शकते, जसे की मित्रमैत्रिणिंबरोबर चित्रपट पाहायला जाणे. म्हणजेच माझ्याकडे इतर मुलांसारखा खूप मोकळा वेळ नसतो, त्यामुळे मला प्रत्येक गोष्ट नीट नियोजन करून वेळेत पूर्ण करावी लागते.

**तू स्वतःला नीट ऑर्गनायझ आणि फोकस ठेवण्यासाठी काय करतेस?**

माझ्याकडे नेहमी माझी “To Do” List असते. स्पर्धेमुळे जेव्हा मला ऑनलाइन वर्गांना उपस्थित राहायचे असते, तेव्हा मी त्याचे तपशील आधीच तपासते आणि ते माझ्या To do यादीत लिहीते. जेव्हा मला कळते की मी शाळेचे वर्ग अटेंड करू शकणार नाही, तेव्हा मी माझ्या शिक्षकांना कळवते आणि ते मला करावयाच्या कामांची यादी पाठवतात. मी ते तपशीलही माझ्या “To do” यादीत लिहीते. अशी यादी मला माझ्या कामांना प्रायॉरिटीझशन करण्यास मदत करते. माझ्या शालेय कामाप्रमाणेच मी माझ्या फेन्सिंगच्या कामासाठीही असेच प्रायॉरिटीझशन करते.

**तुला तुझ्या कोणत्या यशाचा सर्वात जास्त अभिमान आहे?**

माझ्या स्पर्धांदरम्यान मी कसा विचार करते, मी कसे खेळते आणि फेन्सिंग खेळताना विविध moves कश्या करते यावर माझे लक्ष असते. तेच मला जास्त आवडते. मी माझ्या खेळात सतत variety of moves चा वापर करण्याचा प्रयत्न करते. मी २ सुवर्णपदके जिंकली आहेत आणि राष्ट्रीय स्तरावर ७ वा क्रमांक मिळवला आहे. तसेच मी टेक्सास, सॅन डिएगो (कॅलिफोर्निया), क्लीव्हलँड (ओहायो), व्हर्जिनिया आणि ओंटारियो अशा विविध ठिकाणांहून पदके आणि Ranking मिळवले आहे.

माझ्या स्पर्धांदरम्यान मी कसा विचार करते, मी कसे खेळते आणि फेन्सिंग खेळताना विविध moves कश्या करते यावर माझे लक्ष असते. तेच मला जास्त आवडते. मी माझ्या खेळात सतत variety of moves चा वापर करण्याचा प्रयत्न करते. मी २ सुवर्णपदके जिंकली आहेत आणि राष्ट्रीय स्तरावर ७ वा क्रमांक मिळवला आहे. तसेच मी टेक्सास, सॅन डिएगो (कॅलिफोर्निया),

क्लीव्हलँड (ओहायो), व्हर्जिनिया आणि ओंटारियो अशा विविध ठिकाणांहून पदके आणि Ranking मिळवले आहे.

- National Standing: Earned an impressive 7th place finish in Youth-14 (Y-14) Women's Sabre at the March 2026 North American Cup (NAC)
- Recent Gold Medals: Dominated the March 2026 Fortune RYC/RJCC tournament Sweeping 1st place in both the Cadet (U17) and Junior (U20) Women's Sabre events
- A-Rated Fencer: Holds the highly coveted 'A26' classification rating from USA Fencing

and several other medals...




**या खेळाबद्दल थोडं सांग ना, त्यासाठी कोणते गुण लागतात, तुला त्यातून काय शिकायला मिळालं आणि या खेळाने तुला काय शिकवलं?**

फेन्सिंग हा एक तांत्रिक आणि वेगवान खेळ आहे ज्यासाठी आत्मविश्वास, धैर्य आणि जलद निर्णयक्षमता आवश्यक असते. या खेळात प्रतिस्पर्ध्याच्या हालचाली "वाचणे" आणि त्यानुसार योग्य प्रत्युत्तर देणे महत्त्वाचे असते. उत्तम फेन्सर न चिडता किंवा निराश न होता शांत आणि केंद्रित राहतात. अतिजलद प्रतिक्रिया, वेगवान पायांची हालचाल आणि उत्कृष्ट हात-डोळा समन्वय आवश्यक असतो. तसेच, योग्य अंतराची जाणीव ठेवणे महत्त्वाचे असते, जेणेकरून कधी आक्रमण करायचे आणि कधी बचाव करायचा हे अचूक ठरवता येते. फेन्सिंग तुम्हाला शांत आणि एकाग्र राहण्यास मदत करते.

**तू फेन्सिंगचं वर्णन तीन शब्दांत कसं करशील?**

MindGame, Agile, Confident (in other word-Precision, Speed, Strategy)

**तुला पुढच्या काळात काय साध्य करायचं आहे?**

मला माझे रँकिंग सुधारायचे आहे आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धा/टूर्नामेंटमध्ये सहभाग घ्यायचा आहे.

**तुझ्याबद्दल वाचणाऱ्यांना तू काय सांगू इच्छितेस?**

तुम्ही जे काही करत असाल -गणित असो, फुटबॉल असो किंवा इतर कोणताही विषय - तुम्हाला मेहनत करावीच लागते. मेहनत ही प्रतिभेपेक्षा महत्त्वाची असते आणि संयम ठेवणेही गरजेचे आहे. वेळ हा खूप महत्त्वाचा असतो. मेहनत, संयम आणि योग्य वेळ दिल्यास तुम्ही नक्कीच तुमचे ध्येय साध्य करू शकता.

[1]***Foil**-The foil is a light, thrust-only weapon derived from historical court swords*

[2]***Épée**-The épée is the heaviest weapon and the closest to an actual historical dueling sword*

[3]***Sabre**-The sabre is a slashing and thrusting weapon adapted from cavalry swords.*

\- **शब्दांकन: उत्तरा भालेराव,** टँपा, फ्लोरिडा

## ती व तो

ती व तो, मनांचे नाते,
ती व तो, गुंफलेली मने
ती व तो, संसार नेटाचा,
ती व तो, आसरा पाखरांचा
ती व तो, 'ती'चे रुसवे फुगवे
ती व तो, हेकेखोर 'तो' फिरुनि मनवे
ती व तो, सुगरण मायेची
ती व तो, ऊब पंखांची
ती व तो, साथ दोन जीवांची
ती व तो, तुळा प्रपंचाची
ती व तो, दोघांची मर्जी
ती व तो, कसबी दर्जी
ती व तो, सांभाळून तोल
ती व तो, अग्राशी सुईच्या पृथ्वीचा गोल
ती व तो, 'ती' आई 'तो' बाप
ती व तो, दायित्व सृष्टिचे, पाठी जगताचा व्याप

\- **चैत्राली काटे-यादव,** बॉस्टन, मॅसॅच्युसेट्स

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## परांजपे एकांकिका करंडक

**कॅनडात प्रथमच रंगला "परांजपे एकांकिका करंडक" — मराठी रंगभूमीचा उत्साही सोहळा**

व्हँकुव्हरच्या मराठी सांस्कृतिक विश्वात ७ जून २०२६ हा दिवस विशेष ठरला. मराठी सोसायटी ऑफ ब्रिटिश कोलंबिया (MSBC) तर्फे, बृहन्महाराष्ट्र मंडळ (BMM) च्या सहकार्याने आणि BMM च्या North America Programming या उपक्रमांतर्गत कॅनडामध्ये प्रथमच **"परांजपे एकांकिका करंडक"** स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. व्हँकुव्हर, व्हिक्टोरिया, एडमंटन आणि कॅलगरी या चार शहरांतील कलाकारांना एका व्यासपीठावर आणणारा हा उपक्रम खऱ्या अर्थाने "५ एकांकिका, ४ शहरे आणि १ सशक्त रंगमंच" असा ठरला.




Port Moody येथील Inlet Theatre मध्ये रंगलेल्या या स्पर्धेत **आगंतुक, आम्ही सौजन्यात आहोत, आरण्यक, जर तर** आणि **पळसाची पाने** या पाच एकांकिका सादर झाल्या. प्रत्येक सादरीकरणामागे कलाकारांची निष्ठा, दिग्दर्शकांची दृष्टी, नेपथ्याची मेहनत, प्रकाश-ध्वनीची अचूकता आणि पडद्यामागील स्वयंसेवकांचे योगदान स्पष्ट जाणवत होते. महाराष्ट्रातील पारंपरिक एकांकिका स्पर्धांची चुणूक परदेशात अनुभवायला मिळावी, असा हा प्रयत्न होता. या उपक्रमाला BMM तर्फे विशेष उपस्थिती लाभली. BMM सचिव आणि North America Programming Lead **नरेंद्र कल्याणकर**, BMM खजिनदार **संतोष साळवी**, तसेच BMM Seattle Convention Convener **मोहित चिटणीस** यांनी उपस्थित राहून स्थानिक कलाकार, आयोजक आणि सहभागी मंडळांना प्रोत्साहन दिले. अशा उपक्रमांमुळे उत्तर अमेरिकेतील मराठी कलाकारांना भारतातून येणाऱ्या कार्यक्रमांवर अवलंबून न राहता स्वतःचे दर्जेदार व्यासपीठ मिळू शकते, ही BMM च्या North America Programming उपक्रमाची महत्त्वपूर्ण दिशा या कार्यक्रमातून अधोरेखित झाली.

स्पर्धेचे परीक्षण **शैलेश शेट्ये, अभय धर्माधिकारी** आणि **विद्युल्लेखा अकलूजकर** यांनी केले. परीक्षकांनी दिलेला वेळ, निरीक्षण आणि कलात्मक दृष्टी यामुळे स्पर्धेला अधिक विश्वासार्हता आणि गांभीर्य प्राप्त झाले. सूत्रसंचालनाची जबाबदारी **अदिती गोखले** यांनी समर्थपणे सांभाळली. अशा दीर्घ आणि विविधरंगी कार्यक्रमात प्रेक्षक, कलाकार, परीक्षक आणि वेळ यांचा समतोल राखणे हे स्वतंत्र कौशल्य असते, त्यासाठी त्यांचे विशेष अभिनंदन करावे लागेल.




निकालात उत्कृष्ट एकांकिका म्हणून **आगंतुक** प्रथम, तर **आरण्यक** द्वितीय ठरली. उत्कृष्ट दिग्दर्शन पुरस्कार आरण्यकसाठी **अभिषेक रांगणेकर** यांना, तर आगंतुक साठी **अमेय सप्रे** यांना मिळाला. उत्कृष्ट अभिनय स्त्री विभागात आगंतुक मधील "नेहा" भूमिकेसाठी **शर्वरी कोमजवार** आणि आरण्यक मधील "सौदामिनी" भूमिकेसाठी **ऐश्वर्या सोहोनी** यांचा गौरव झाला. उत्कृष्ट अभिनय पुरुष विभागात आरण्यक मधील "अविनाश" भूमिकेसाठी **भूषण पाटील**, तर आगंतुक मधील "तरुण" भूमिकेसाठी **ओंकार राणे** यांना सन्मानित करण्यात आले. उत्कृष्ट संगीत पुरस्कार आरण्यकसाठी

**निलेश अग्निहोत्री** यांना मिळाला. तसेच **ऋत्वी म्हात्रे** “नंदू” (जर तर), **शर्वरी कुलकर्णी-राजे** “शांती” (पळसाची पाने), **मृणाल भुस्कुटे** “आनंदी” (पळसाची पाने) आणि **अमेय सप्रे** “स्वानंद” (आगंतुक) यांना उत्तेजनार्थ गौरवण्यात आले.

या संपूर्ण यशामागे MSBC कार्यकारिणी, स्वयंसेवक, तांत्रिक टीम, प्रायोजक आणि सहभागी मंडळांची एकत्रित मेहनत उभी होती. विशेषतः MSBC अध्यक्ष **प्रशांत जोशी** यांच्या नेतृत्वाखाली तसेच **जयदीप जोशी, अनिकेत अंबवाकर, अदिती गोखले, सुचित्रा बर्वे, नीरज इंगळे, प्रशांत बाउसकर, शैलेश अरोरा,** आणि **स्वानंद कलुस्कर** अशी सक्षम टीम त्यांच्या सोबत कार्यरत आहे. अशी स्पर्धा उभी करणारे नियोजन म्हणजे बैठका, फोनकॉल, प्रायोजक, तांत्रिक व्यवस्था, पाहुणचार, वेळेचे व्यवस्थापन आणि तितक्याच प्रेमाने सगळ्यांची काळजी घेणे या सर्वांची एकत्रित किमया असते म्हणूनच या स्पर्धेमागची स्वयंसेवी ऊर्जा विशेष दाद मिळवते. आसपासच्या मंडळांना जोडून असा प्रादेशिक सांस्कृतिक सेतू उभारणे हे कौतुकास्पद आणि अनुकरणीय आहे.

“परांजपे एकांकिका करंडक” ही केवळ स्पर्धा नव्हती, ती परदेशातील मराठी रंगभूमीचा आत्मविश्वास वाढवणारी सुरुवात होती. कलाकारांनी सहभाग घ्यावा, रसिकांनी तिकीट काढून उपस्थित राहावे आणि स्वयंसेवकांनी अशा उपक्रमांना हातभार लावावा, कारण अशाच कार्यक्रमांमुळे मराठी भाषा, नाट्यसंस्कृती, अशा स्पर्धांच परंपरा जिवंत ठेवतात, आणि आपली कलापरंपरा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचते, नवी पिढी घडवते आणि परदेशातही मराठी रंगभूमीचा दिवा तेवत ठेवते. **“परांजपे एकांकिका करंडक”** ने पेटवलेली ही वात पुढची अनेक वर्षे तेजाने प्रज्वलित राहो, हीच शुभेच्छा.



- **North America Programming समिती**




BMM
बृहन्महाराष्ट्र मंडळ
FILM CLUB
BMM2026
BMM FILM CLUB
मराठी फिल्ममेकर्सचे, हक्काचे व्यासपीठ
SHORT FILM
Competition
TELL YOUR STORY. INSPIRE THE WORLD.
An opportunity for creators to showcase their talent, share powerful stories, and make an impact.
COMPETITION RULES
Short film can be up to 10–15 mins.
It must be made in North America
It was made in last 24 months max.
PRIZES
1ST PRIZE
2ND PRIZE
3RD PRIZE
DEADLINE TO SUBMIT ENTRIES
15th July 2026
All winning entries will be shown in
BMM Convention 2026
to a larger audience.
BMM FILM CLUB
SHORT FILM
COMPETITION
SPECIAL ATTRACTION
MARATHI WEB SERIES
PREMIER EVENT
INTERACTION WITH
OTHER FILM MAKERS
LEARN TRICKS ABOUT FILM MAKING
FROM FELLOW FILM MAKERS
INTERVIEW WITH
WEBSERIES MAKERS
AND MUCH MORE...
TO SUBMIT YOUR ENTRIES
PLEASE VISIT
https://forms.gle/NbeaKiX5kXNqGy5E9
FOR QUERIES EMAIL:
narendra.kalyankar@bmmonline.org
BE CREATIVE. BE BOLD. BE HEARD.
JOIN THE BMM FILM CLUB SHORT FILM COMPETITION TODAY!

## अभ्यासाव्यतिरिक्त गवसलेली ओळख

**शौनक मार्दे** हा प्रत्येक क्षेत्रात आपली छाप पाडणारा अष्टपैलू व्यक्तिमत्वाचा आहे. शैक्षणिक क्षेत्रात जितका उजवा, तितकाच क्रीडा क्षेत्रातही त्याने आपली छाप पाडली आहे. विश्लेषणात्मक विचारसरणीमुळे त्याने बुद्धिबळातही उल्लेखनीय प्राविण्य मिळवले. मात्र, इथेही त्याची विचारांची परिपक्वता दिसून येते. स्पर्धांच्या ताणतणावात अडकण्यापेक्षा, स्वतःच्या आनंदासाठी आणि समाधानासाठी खेळणे त्याने अधिक महत्त्वाचे मानले. चला, अश्या ह्या समंजस आणि संतुलित विचारसरणी असलेल्या शौनकला जाणून घेऊ या.



**आम्हाला तुझी ओळख करून देशील का?**

मी **शौनक मार्दे,** सॅन रमान, कॅलिफोर्निया येथील आहे. मी Dougherty Valley High School मधून १२वी उत्तीर्ण पदवी प्राप्त केली आहे. आता मी कॅनडातील व्हॅंकुव्हर येथील University of British Columbia येथे पुढील शिक्षणासाठी जाणार आहे. मी Computer Science आणि Business Analytics मध्ये अभ्यास करणार आहे. त्यांच्या इंटर्नशिप प्रोग्रॅम आणि माझ्या आवडीच्या अभ्यासक्रमामुळे मी हे विद्यापीठ निवडले आहे.

**बुद्धिबळाशी तुझी पहिली गट्टी कशी जमली?**

मी ६वीत असताना माझ्या मोठ्या भावासोबत स्पर्धात्मक पद्धतीने बुद्धिबळ खेळायला सुरुवात केली. त्या वेळेपर्यंत दादा स्वतः YouTube वरून हा खेळ शिकला होता. आम्ही दोघे प्रत्येक बाबतीत स्पर्धा करतो. त्यामुळे मला त्याच्यासोबत स्पर्धात्मक खेळायची इच्छा झाली. सुरुवातीला नेहमी तोच जिंकायचा. त्यामुळे मला त्याला हरवण्याची इच्छा होती. म्हणून मी पण Youtube चे videos बघुन त्यातील ओपनिंग्ज, विविध तंत्रे आणि कौशल्ये शिकलो आणि नंतर मी जिंकलो. त्यानंतर मी ऑनलाइन खेळायला सुरुवात केली आणि सतत जिंकत गेल्यामुळे माझ्या आईने मला प्रशिक्षणासाठी क्लासमध्ये घातले. तेव्हापासून मी मागील ५ वर्षे बुद्धिबळ खेळत आहे.

**तुझा बुद्धिबळाच्या प्रवासाबद्दल आणि तो कसा विकसित होत गेला याबद्दल तू आम्हाला सांगशिल का?**

आधी सांगितल्याप्रमाणे, मी ६ वीच्या शेवटी असताना माझ्या मोठ्या भावासोबत बुद्धिबळ खेळायला सुरुवात केली होती. त्यानंतर COVID-19 pandemic परिस्थिती आली, त्यामुळे बुद्धिबळ स्पर्धा होत नव्हत्या, म्हणून आम्ही घरुनच online खेळत राहिलो. त्याच काळात मला Berkeley Chess School बद्दल माहिती मिळाली, जिथे टॉप ५० खेळाडू शिकले आहेत आणि या शाळेने काही ग्रँडमास्टरही तयार केले आहेत. मी आधी त्यांच्या ग्रुप क्लासला प्रवेश घेतला आणि नंतर माझे वैयक्तिक कोचिंग सुरू केले. माझे शिक्षक जोशिया स्टियरमन होते, जे कॅलिफोर्नियातील मार्टिनेज येथील इंटरनॅशनल मास्टर आहेत. माझ्या पहिल्या स्पर्धेत मी ५ पैकी २.५ गुण मिळवले, मी त्या वेळी अनरेटेड असूनही त्या अनुभवाने मला खूप प्रेरणा मिळाली. ८वीत मी "Friday Night Chess Program" मध्ये सहभागी झालो, जिथे ८ आठवड्यांसाठी दर आठवड्याला एक गेम खेळावा लागतो. मी दोन स्पर्धांमध्ये भाग घेतला आणि दुसरा क्रमांक मिळवला, ज्यामुळे माझी या खेळाबद्दलची आवड अजून वाढली. ९वी आणि १०वीत मी शाळेच्या कामांमध्ये व्यस्त झालो, पण नंतर पुन्हा रीजनल स्पर्धांमध्ये सहभागी झालो. या स्पर्धांमध्ये विजय मिळवणे हा माझ्या आयुष्यातला सर्वात चांगला अनुभव होता आणि त्यामुळे मला पुन्हा खूप प्रेरणा मिळाली. १०वीत मी शाळेच्या chess club चा officer झालो आणि त्यासोबत मी स्थानिक डे-केअरमधील मुलांसाठी outreach program चालू केला. हा खेळ जास्तीत जास्त मुलांपर्यंत पोचावा हि माझी मनापासूनची इच्छा होती. मी Coyote Creek Elementary School मधील after school care (Kids County) मध्ये बुद्धिबळ शिकवायला सुरुवात केली. या शिकवण्याच्या अनुभवामुळे मला खेळाबद्दल नवीन दृष्टीकोन मिळाला आणि माझे बुद्धिबळाशी नाते अजून मजबूत झाले. त्याच वेळी मी स्पर्धात्मक खेळातही होतो, पण मला शिकवणे जास्त आवडायला लागले, म्हणून मी त्यावर लक्ष केंद्रित करायचे ठरवले. तेव्हापासून मागील २ वर्षे मी सतत शिकवणे आणि खेळणे हे दोन्ही करत आहे.

**बुद्धिबळामुळे तुझ्या विचार करण्याच्या, शिकण्याच्या आणि समस्या सोडवण्याच्या पद्धतीत काही बदल झाला का? तसेच बुद्धिबळाबरोबर तू इतर कोणते खेळ खेळतोस का आणि**

**तुझ्या बुद्धिबळ खेळाचा पुढे कॉलेजच्या प्रवेशासाठी कसा उपयोग झाला?**

बुद्धिबळ खेळामुळे गंभीर विचार करण्याची क्षमता विकसित होते, कारण यात खेळाडूला प्रतिस्पर्ध्याच्या हालचालींचा आधीच अंदाज घ्यावा लागतो, अनेक शक्यतांचा विचार करावा लागतो आणि प्रत्येक चालीनंतर येणाऱ्या परिणामांची जबाबदारी स्वीकारावी लागते. हा खेळ प्रतिक्रिया देण्याऐवजी निरीक्षणावर आधारित विचारपूर्वक आणि तर्कशुद्ध निर्णय घेण्यास शिकवतो. यामुळे critical thinking विकसित होते आणि भावना बाजूला ठेवून लक्ष केंद्रित ठेवण्यास मदत होते. विशेषतः शाळेत बराच वेळ अभ्यास करताना एकाग्रता वाढविण्यास हा उपयोगी ठरतो. बुद्धिबळासोबतच मी शाळेच्या संघात १० वर्षे फुटबॉल, व्हॉलीबॉल आणि बास्केटबॉल खेळलो आहे. तसेच मी लांब पल्ल्याच्या (10K) आणि लहान अंतराच्या धावण्यामध्येही भाग घेतला आहे. मी मजेसाठी कोडिंग करतो, ज्यामुळे माझ्या कॉम्प्युटर सायन्स या मुख्य विषयाच्या कॉलेज अभ्यासाला मदत होईल. या बुद्धिबळ खेळाने माझ्या कॉलेज प्रवेशामध्येही मदत केली. मी बुद्धिबळाच्या माध्यमातून केलेल्या समुदाय निधी संकलन कार्यक्रमातून माझी नेतृत्व क्षमता दाखवू शकलो. माझी आवड, नाविन्यपूर्णता आणि बुद्धिबळावरील प्रेम यांचा यात समावेश आहे. मी असे म्हणू शकतो की मी बुद्धिबळाचा आनंद घेतो आणि त्याच वेळी समाजासाठीही योगदान देतो.

**बुद्धिबळाच्या प्रवासात आजवरचा असा कोणता क्षण आहे, ज्याचा तुला सर्वाधिक अभिमान वाटतो?**

जेव्हा माझ्या विद्यार्थ्यांनी स्पर्धांमध्ये खेळण्याची आवड दाखवली, तो माझ्यासाठी अत्यंत अभिमानाचा क्षण होता. त्याच वेळी, माझा पहिला विजय हा देखील माझ्यासाठी तितकाच अभिमानाचा क्षण आहे.

**तुला कोणत्या आव्हानांना सामोरे जावे लागले आणि त्यावर तू कशी मात केली?**

"आव्हान", त्यावर मी असे म्हणेन की कोणत्याही अपयशामुळे खचून जायचे नसते. आपण प्रत्येक परिस्थितीतून काहीतरी शिकू शकतो. आपल्याला त्या अनुभवांसह पुढे जायचे असते पण मी असेही सांगीन की पूर्वीच्या खेळाच्या परिस्थितीत मी थोडा खचलेलो असताना माझ्या शिक्षकांनी मला मदत केली आणि प्रोत्साहन दिले.

**तु शिक्षण, वैयक्तिक आयुष्य आणि बुद्धिबळ यांचा समतोल कसा साधतोस?**

बुद्धिबळ सध्याच्या क्षणावर लक्ष केंद्रित ठेवायला शिकवतो, त्यामुळे तो तुम्हाला विनम्रता आणि एकाग्रता राखण्यास मदत करतो. आम्ही १२ तासांचे बुद्धिबळ खेळतो ज्यात ४ राउंड्स असतात, जे संयमित राहायला, नम्र राहायला आणि वर्तमानावर लक्ष ठेवायला मदत करतो. आता माझे प्राधान्य अभ्यासाला आहे, तरीही मी बुद्धिबळाचे काही सेशन्स ठेवणार आहे जेणेकरून अभ्यास आणि बुद्धिबळ यांच्यात संतुलन राखता येईल. नेहमीच ब्रेकमध्ये मी बुद्धिबळ खेळण्याचा प्रयत्न करतो. आता कॉलेजमध्येही मी बुद्धिबळ शिकवणे सुरू ठेवण्याचा प्रयत्न करणार आहे. बुद्धिबळ, अभ्यास आणि आयुष्य यांचा समतोल राखण्यासाठी संयम, विनम्रता, एकाग्रता हे गरजेचे आहे.

**तुझे पुढे काय करायचा विचार आहे?**

मी फक्त मजेसाठी आणि कोणताही ताण न घेता स्पर्धांमध्ये भाग घेईन. त्याच वेळी, मला शिकवायला खूप आवडते, त्यामुळे मी शिकवण्याचे काम पुढेही सुरू ठेवेन.

**तुला बाकीच्यांना काय सांगावेसे वाटते?**

मी असे म्हणेन की तुम्ही जे काही करता त्यावर कधीही दबाव घेऊ नका, तर जे करता ते मनापासून आवडीने करा. त्याचा आनंद घेण्यावर लक्ष केंद्रित करा.

- **शब्दांकन: उत्तरा भालेराव**, टॅंपा, फ्लोरिडा

## आपलं घर...!

घर तयार होतं जरी अनेक भिंती उभारून,
घरपण येतं घरात राहणारी नाती जपून;
नात्यातील आपलेपणा असतो घराचा आधार,
घर सावरतात मनावरील चांगले संस्कार...!
आपल्या मनाचा आरसा म्हणजे आपलं घर,
मनातील आवडनिवड प्रतिबिंबित होते त्यावर;
प्रत्येक वस्तूमध्ये दडलेली असते एक आठवण,
आठवणीत गुंफलेले असतात आनंदाचे कित्येक क्षण..!
घर सजवता येतं अनेकविध कलाकृती वापरून,
मनाची श्रीमंती देते घराची खरी सुंदरता खुलवून;
सण-समारंभात घर आप्तेष्टांच्या गर्दीने जाते फुलून,
रिकामं घर देते हाक आपल्याला बंद दारा आडून..!
घरातील प्रत्येक जागा सांगत असते एक कहाणी,
काही असतात सुखाच्या अन् काहींना झालर दुःखाची;
जगभर कितीही फिरलं तरी घराची ओढ संपत नाही,
आपल्या घराशिवाय कुठेही मन फार काळ रमत नाही..!

- **शुभदा जोशी- पारखी**, कोलंबिया, मेरीलॅंड

## गुरुपौर्णिमा (कृतज्ञता दिन)

**गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः ।**
**गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ॥**

माणसाच्या जीवनात गुरूंचे महत्त्व अपरंपार आहे. आईवडील आपल्याला जन्म देतात, पालन-पोषण करतात, आपले जीवन घडवितात. परंतु गुरु आपल्याला ज्ञान, संस्कार, विवेक देत जीवनाचे खरे सार समजावून सांगतात.



"गु" म्हणजे अंधकार आणि "रु" म्हणजे अज्ञानाचा नाश करणारे ज्ञान. शिष्यातील अज्ञानरूपी अंध:काराला दूर करून ज्ञानाचा प्रकाश देतात त्यांना 'गुरु' असे म्हणतात. प्रत्येक माणसामध्ये निसर्गनिर्मित अमर्याद क्षमता असते, परंतु स्वतःकडे ही क्षमता आहे याची जाणीव मात्र प्रत्येकाला असतेच असे नाही. आपल्या शिष्याला याची जाणीव गुरू ज्ञान आणि मार्गदर्शनातून करून देतात. शिष्याच्या आयुष्यातील प्रश्न, संभ्रम, संकटे आणि आव्हाने यावर मात करण्याची प्रेरणा देतात.

जगभरात एकूण १४ विद्या आणि ६४ कला आहेत. विद्या बुद्धीला प्रगल्भ करते तर कला माणसाचे जीवन सुंदर बनवते. कोणतीही विद्या किंवा कला आत्मसात करण्यासाठी त्यामधील तज्ज्ञ गुरूच्या मार्गदर्शनाची गरज असते. वास्तविक समाजात विविध विषयातील अनेक तज्ज्ञ असतात पण ते सर्व गुरु असताच असे नाही. कारण एखाद्याकडे ज्ञान असू शकते पण ते ज्ञान इतरांच्या जीवनात उतरविण्याची तळमळ असेलच असे नाही. एखादा हुशार विद्यार्थी त्याच्या वैयक्तिक जीवनात खूप प्रगती करतो पण तो एक उत्तम शिक्षक होऊ शकेलच असे नाही.

गुरू या विषयाबाबत आजही समाजात अनेक समज आणि गैरसमज आहेत. गुरुशिवाय माणसाच्या जीवनाला गती मिळत नसली तरी यासाठी कोणालाही गुरू करणे योग्य नाही. योग्य व्यक्तीलाच जीवनात गुरूचे स्थान द्यायला हवे. काही लोकांचा असाही समज असतो की एकदा गुरू केला की पुन्हा गुरू करणे म्हणजे पाप होय. अशा खुळचट कल्पनेच्या नादी लागून काही लोक आयुष्यभर अज्ञानी गुरूशी एकनिष्ठ राहतात आणि खऱ्या ज्ञानाला मुकतात.

राजविद्या राजगुह्यं पवित्रमिदमुत्तमम् ।
प्रत्यक्षावगमं धर्म्यं सुसुखं कर्तुमव्ययम् ॥ भ.गी. ९.२ ॥

अध्यात्मविद्या ही तर सर्व विद्यांचा (राजविद्या) आणि सर्व गुह्यांचा राजा (राजगुह्य) आहे. अपार सुख देणारी, अत्यंत पवित्र, अतिशय उत्तम, केवळ काल्पनिक नसून प्रत्यक्ष अनुभवता येण्यासारखी, धर्मयुक्त, आचरणास सोपी आणि अविनाशी आहे असे भगवंतांनी भगवतगीतेत म्हटले आहे. जर इतर विद्या आणि कला शिकण्यासाठी त्यातील तज्ज्ञ गुरूशिवाय तरणोपाय नाही तर अध्यात्म विद्येसारखी दिव्य आणि सूक्ष्म विद्या कोणाकडूनही शिकणे कसे शक्य आहे? ही परमपवित्र अध्यात्मविद्या शिकविण्याचे सामर्थ्य ज्यांच्याकडे असते त्यांनाच 'सद्गुरू' असे म्हणतात.

आज अध्यात्माच्या नावाखाली चाललेल्या गोष्टी पाहून अनेकांचा अध्यात्मावरील विश्वास उडत चालला आहे. यामागचे खरे कारण काही लोकांनी अध्यात्माच्या नावाखाली सुरू केलेला व्यवसाय-धंदा आहे. संसारामध्ये काही अडीअडचणी आल्या, आपत्ती-विपत्ती आल्या की लोक अशा भोंदू बुवाबाबांच्या सहज नादी लागतात. या बुवाबाबांच्या बाह्य पोषाख आणि हातचलाखीच्या चमत्कारांना हे लोक भुलतात आणि स्वतःचा कपाळमोक्ष करून घेतात. या भोंदू बुवाबाबांमुळे लोक खऱ्या अध्यात्मापासून पारखे होतात. थोडक्यात कोणालाही गुरु किंवा सद्गुरु समजल्यामुळे लोकांची दिशाभूल होते. यासाठीच प्रत्येकाला जीवनात खरे सद्गुरु कसे ओळखावे हे माहीत असायला हवे.

१. खरे सद्गुरू निरपेक्ष असतात.
२. खरे सद्गुरू आत्मज्ञानी असतात.
३. साधकांचा उद्धार करण्याची त्यांच्याकडे तीव्र तळमळ असते.
४. साधकांचा उद्धार करण्यासाठी ते सदैव आपला देह चंदनासारखा झिजवितात.
५. साधकांना दिव्यबोध आणि दिव्यसाधना शिकविण्याचे त्यांच्याजवळ अतुल सामर्थ्य असते.

साहजिकच असे सदगुरू भेटणे ही काही सर्वसामान्य गोष्ट नाही. 'शाब्दे परेचि निष्णात' सदगुरूंनी दिलेले ज्ञान जेव्हा शिष्य जीवनात आचरणात आणू लागतो तेव्हा त्याच्या जीवनाचा अक्षरशः कायापालट होऊ लागतो. कारण सदगुरूंनी अतिशय खडतर कष्ट, अभ्यास, साधना आणि तपश्चर्येने जीवनात आत्मज्ञान प्राप्त केलेले असते. शिष्यांना मात्र सदगुरूंकडून ज्ञान व पुण्याईचा सहज लाभ होतो. जेव्हा शिष्य सद्गुरूंकडून अनुग्रह घेतो तेव्हा त्याचे गुरू-शिष्य हे नाते प्रस्थापित होते. गुरू-शिष्य नाते निर्माण झाल्यावर सद्गुरुंकडून ज्ञानाचा प्रवाह अखंड सुरू होतो. स्वतःचा उद्धार करून घेण्याची तीव्र तळमळ असलेले साधक अशा आत्मज्ञानी सद्गुरुंच्या ज्ञानप्रवाहाच्या

सानिध्यात राहून स्वरुपचंद्राची प्राप्ती (आत्मसाक्षात्कार) करून घेऊ शकतात.

आमचे भाग्य थोर की आम्हाला सद्गुरु श्री वामनराव पै यांच्यासारखे आत्मज्ञानी सद्गुरु आणि पिता लाभले. सद्गुरूंनी शिष्यांना केवळ आत्मज्ञानाचेच धडे दिले नाहीत तर जीवन जगण्याची कलादेखील शिकविली. ऋषीमुनींचे तत्वज्ञान, संताची शिकवण, त्यावर स्वतः केलेले सखोल चिंतन, जीवनात स्वतःला आलेले अनुभव आणि त्यांचे सदगुरु श्री नारायण महाराज यांच्या कृपाप्रसादातून त्यांनी 'जीवनविद्या तत्वज्ञान' निर्माण केले. "Jeevanvidya is Science of Life and Art of Harmonious Living" हे तत्त्वज्ञान पारंपरिक तत्त्वज्ञानापेक्षा अत्यंत आगळे आणि वेगळे आहे. ज्यामध्ये सद्गुरुंनी नाविण्यपूर्ण असे अनेक सिद्धांत मांडले आहेत. हे तत्त्वज्ञान धर्मातीत, शाश्वत (Eternal) आणि वैश्विक (Universal) आहे.


सदगुरूंचे वेगळेपण हे की सदगुरूंनी स्वतःचा संसार सुखाचा करीत परमार्थ सिद्ध केला. सदगुरू आदरणीय, वंदनीय तर आहेतच पण आचरणीयदेखील आहेत. त्यांनी सांगितलेल्या जीवनविद्या तत्वज्ञानामुळे आज अनेकांच्या जीवनात आमुलाग्र बदल झालेला आहे. या तत्वज्ञानाचा मूलमंत्र असलेल्या "तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार" या क्रांतीकारक सिद्धांतांमुळे आज लाखो लोकांचे जीवनशिल्प घडले. कारण हे तत्त्वज्ञान माणसाचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोनच बदलून टाकते. जीवनविद्या तत्त्वज्ञानात माणसाचा उत्कर्ष म्हणजे आधिभौतिक प्रगती (Material development) आणि उन्नती म्हणजे मानसिक-आध्यात्मिक प्रगती (Psychospiritual development) करण्याचे सामर्थ्य आहे. आपले मूळ स्वरूप असलेले सच्चिदानंद स्वरूप म्हणजे नेमके काय आणि ते कसे प्राप्त करून घ्यायचे याचेही अचूक मार्गदर्शन सद्गुरूंनी केलेले आहे.

माझ्यामते जीवनविद्येचे आगळे वेगळे ज्ञान देणारे सद्गुरू 'एकमेव' आहेत. त्यांनी संसार आणि परमार्थ वेगवेगळे नसून एकमेकांना पूरक आणि पोषक असल्याची शिकवण जगाला दिली. परमेश्वर, धर्म, संस्कृती, पाप-पुण्य, विचारांचे महत्त्व, मनाचे सामर्थ्य अशा अनेक कठीण विषयांवर विविध ग्रंथांची निर्मिती केली. प्रवचने, मार्गदर्शने, व्याख्यानांतून लाखो लोकांना प्रबोधने केली. जीवनविद्या तत्त्वज्ञान पुढच्या पिढ्यांनाही मिळत राहावे यासाठी महाराष्ट्रातील कर्जत येथे 'जीवनविद्या ज्ञानपीठ' निर्माण केले. या ज्ञानपीठातून आज विविध कोर्सेसच्या माध्यमातून जीवनविद्या तत्त्वज्ञान लोकांना दिले जाते. विशेष म्हणजे या ज्ञानपीठात सदगुरुमुखातून दिव्यबोध आणि दिव्यसाधना मिळण्याची देखील सोय करण्यात आलेली आहे.

आज जिथे जगभरात अनेक गंडेदोरे देणारे, मंत्र सांगणारे तथाकथित गुरु शिष्याकडून सेवा करुन घेण्यासाठी गुरुपौर्णिमा साजरी करीत असतात. तिथे सद्गुरुंनी मात्र आपल्या शिष्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी गुरूपौर्णिमेदिवशी 'कृतज्ञता दिन' सुरू केला. सद्गुरूंच्या मते या दिवशी केवळ शिष्यांनेच सद्गुरूंप्रती कृतज्ञ असावे असे नाही तर सद्गुरूंनीही शिष्याप्रती कृतज्ञ असायला हवे. अशी आगळीवेगळी शिकवण देणारे सद्गुरू म्हणजे कृतज्ञतेची जणू साक्षात् दिव्य मूर्ती...वास्तविक गुरूपौर्णिमा म्हणजे साधकाच्या जीवनातील आनंदाची दिवाळी. साधकाने जीवनात सुखाची पौर्णिमा साधण्यासाठीच गुरूपौर्णिमा साजरी करायची असते. गुरु म्हणजे आपल्या हृदयातील गुप्त रूप. या गुप्त रूपाची जेव्हा ओळख पटते तेव्हा जीवनातील दुःख गुप्त होते आणि सुख प्रगट होते. चिन्मय अशा आत्मस्वरूपाशी तन्मय होऊन अंती अनंत स्वरूप होऊन कसे राहावयाचे, ते शिकवितात त्यांनाच 'सद्गुरू' असे म्हणतात. श्रीसदगुरू कृपेने प्रत्येकाला त्याच्या जीवनात स्वरूपचंद्राचे दर्शन घडावे आणि त्यांच्या जीवनात सुखाची पौर्णिमा साजरी व्हावी हीच ईश्वर चरणी प्रार्थना.

- **प्रल्हाद वामनराव पै,** आजीव विश्वस्त, जीवनविद्या मिशन

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका



## आमचे दादासाहेब

आमचे दादासाहेब म्हणजे **सुरेश तेंडुलकर.** नुकतंच तीन महिन्यांपूर्वी वयाच्या ९३ व्या वर्षी त्यांच्या मूरपार्क, कॅलिफोर्निया येथील राहत्या घरी त्यांना देवाज्ञा झाली.



त्यांच्या निधनाच्या आदल्या दिवशीच त्यांना भारत सोडून ७१ वर्षे पूर्ण झाली होती. हा ७१ वर्षाचा त्यांचा हा प्रवास म्हणजे एक जिद्दीने केलेली जीवन यात्रा म्हणावे लागेल. त्या निमित्ताने त्यांना ही आदरांजली.

फेब्रुवारी, १९५५ मध्ये मुंबई विद्यापीठातून बी. एस्सी, ची पदवी घेतल्यावर त्यांनी नोकरीच्या निमित्ताने घर सोडलं आणि एडन (सध्याचे येमेन) येथील ब्रिटिश पेट्रोलियम रिफायनरीत केमिस्ट म्हणून नोकरीची सुरुवात केली. नोकरीच्या मुलाखतीला जाण्यासाठी त्याला, त्याच्या मित्राच्या भावाचा कोट आणि टाय मागावा लागला. नोकरी मिळाल्याचे पत्र हातात पडल्यावर मग त्यांनी घरी सांगितलं की त्याला एडनला नोकरी मिळाली. घरून परदेशी जायला कदाचित विरोध झाला असता. १९५५ ते १९५८ ही तीन वर्षे त्याच्या आयुष्यातील चांगली मजेत गेली. कारण कंपनीकडून राहायची जागा, जेवण आणि वर चांगला पगार दिला जात होता. कंपनीच्या नियमानुसार सगळ्यांना दोन वर्षानंतर दोन महिने भरपगारी सुट्टी दिली जात होती. तेव्हा १९५७ च्या मे महिन्यात दादासाहेब भरपूर सामान घेऊन बोटीने मुंबईला आईवडिलांना भेटायला आले.

१९५८ साली Metallurgy Engineering मधील पदवी घेण्याच्या उद्देशाने दादासाहेबांनी एडनची नोकरी सोडून लंडनला जाण्याचे ठरवले. एडन ते लंडन हा प्रवास त्यांनी इटली, फ्रान्स मार्गे बोटीने केला. लंडनला स्थायिक होण्याकरता त्यांच्या मित्राच्या लंडन मधील ओळखीच्या एका डॉक्टरने हमीपत्र दिले होते, पण राहण्याची वगैरे सोय त्याने करावी असं सांगितलं. दादासाहेबांच्या मुंबईतील मित्राचा एक मित्र लंडनला उच्च शिक्षणासाठी गेला होता, त्याचा पत्ता शोधून, त्याला विनंती करून नोकरी मिळेपर्यंत काही दिवस त्याच्याबरोबर राहिले. कोणाच्या तरी ओळखीने त्याला हातगाडीवर अगरबत्त्या विकायचे काम मिळाले. दोन महिने ते काम केल्यावर दुसरे पूर्णवेळ काम मिळाले. मग त्यांनी लंडन युनिव्हर्सिटीत संध्याकाळच्या कॉलेजमध्ये Metallurgy Engineering च्या सहा वर्षाच्या पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला. पूर्णवेळ काम आणि संध्याकाळी कॉलेज असा दिनक्रम सुरु झाला. त्यांच्या मुंबई विद्यापीठाच्या पदवीत गणित विषय नसल्यामुळे त्यांना एक वर्ष संपूर्ण वेळ कॉलेजमध्ये जावं लागलं, त्यावेळी त्यांनी संध्याकाळचे काम पत्करले. लंडन विद्यापीठाची इंजिनीरिंगची पदवी मिळवण्यासाठी त्यांना एकूण सात वर्षे लागली.

१९६६ साली ९ वर्षांनी दादासाहेब मुंबईला आईवडिलांना भेटायला आले. त्यांनी मनाशी ठरवलेच होते की लंडन विद्यापीठाची इंजिनीरिंगची पदवी घेतल्याशिवाय आईवडिलांना तोंड दाखवायचे नाही. त्यांच्यापेक्षा ३ वर्षांनी मोठा असलेल्या इंजिनीअर मामेभावाने दादासाहेबांना साधा बी.एस्सी झाल्यावर हिणवलं होतं, तेव्हाच त्यांनी आयुष्यात इंजिनीअर होऊन दाखवायचे ठरवले होते.

इंजिनिअरिंगची पदवी मिळाल्यावर मात्र त्यांना केम्ब्रिज येथील ब्रिटिश वेल्डिंग रिसर्च असोसिएशन संस्थेत Scientific Officer म्हणून चांगली नोकरी मिळाली. १९६६ साली ते मुंबईला सुटीवर आले असताना लग्नाचे पाहत होते, पण योग जुळून आला नव्हता. ते इंग्लंडला परत गेल्यावर ६ महिन्यांनी नात्यातील उच्च शिक्षित मुलगी सांगून आली. मुंबईच्या रुईया कॉलेजमध्ये वहिनी केमिस्ट्रीच्या डेमॉन्स्ट्रेटर होत्या. दादासाहेब सहा महिन्यात परत येऊ शकत नसल्यामुळे वहिनीच १९६६ च्या डिसेंबरमध्ये एकट्या इंग्लंडला गेल्या आणि केम्ब्रिजला रजिस्टर्ड पद्धतीने दादासाहेबांनी वयाच्या ३३ व्या वर्षी लग्न केलं. वहिनींनाही त्याच संस्थेत Scientific ऑफिसर म्हणून नोकरी मिळाली.

१९६९ साली वहिनींची अमेरिकेतील कॅन्सस सिटी, मिसौरी येथील युनिव्हर्सिटीत पीएचडी साठी निवड झाल्यामुळे दादासाहेब आणि वहिनी अमेरिकेत आले. येथे आल्यावर युनिव्हर्सिटीने वहिनींना असिस्टंटशिप मिळणार नाही असं सांगितल्यावर आणि दादासाहेबांना नोकरी नसल्याने वहिनींना पीएचडी चा बेत रद्द करावा लागला. येथे त्यांना कॅन्सस युनिव्हर्सिटीत राव नावाचे जेष्ठ प्रोफेसर भेटले. त्यांनी व त्यांच्या पत्नीने दादासाहेबांना आणि वहिनींना त्यांच्या घरी काही महिने आसरा दिला. कॅन्ससमध्ये इंजिनिअर्सना त्यावेळी नोकऱ्या उपलब्ध नसल्याने त्यांनी क्लीव्हलँड, ओहायो येथे स्थलांतर केले. तेथे देखील कमनशिबाने इंजिनिअरची नोकरी न मिळाल्यामुळे एक वर्ष लहान सहान कामे करून पैसे साठवले. नंतर उटाह स्टेटमधील लोगन

युनिव्हर्सिटीत दादासाहेबांना एम एस ला प्रवेश आणि तेथेच अर्धवेळ नोकरी मिळाली. विंचवाचं बिऱ्हाड पाठीवर घेऊन ते लोगनला पोहोचले.

दोन वर्षे लोगनला काढल्यावर दादासाहेबांना पिट्सबर्ग, पेन्सिल्वेनिया येथे एका मोठ्या कंपनीत चांगली नोकरी मिळाली आणि त्यांचे चांगले दिवस सुरु झाले. इंग्लंडच्या केम्ब्रिज येथील वहिनींच्या ब्रिटिश मैत्रिणीचा डग ग्रॅंगेर नावाचा कोणी नातेवाईक पिट्सबर्ग येथे राहत होता. त्याने या दोघांना स्वत:चे घर होईपर्यंत काही महिने त्याच्या घरातील एक खोली तात्पुरती राहायला दिली. मोठे प्रशस्त घर घेतल्यावर १९७४ साली त्यांनी आई-वडिलांना कायम राहण्याच्या दृष्टीने अमेरिकेत आणलं, पण ते ४ महिन्यांनी परत भारतात आले. १९८८ साली मलाही त्यांनी येथे अमेरिकेत ग्रीन कार्डवर आणले. त्यांच्या नशिबाने त्यांना प्रत्येक ठिकाणी देवदूतासारखी माणसे मदतीला उभी राहिली.

१९९० च्या उत्तरार्धापासून कॉम्प्युटर आणि माहिती तंत्रज्ञान (IT ) क्षेत्रात संपूर्ण जगात नोकऱ्यांचे दालन खुले झाल्याने बऱ्याच तरुणांचा अमेरिकेत ओघ सुरु झाला. भरमसाठ पगाराच्या नोकऱ्या डायरेक्ट भारतातूनच घेऊन ते येथे आले. थोड्या वर्षात त्यांना भारतीय पदार्थ, उपाहारगृहे वगैरेंच्या सगळ्या सोयी उपलब्ध झाल्या. १९६०-७० च्या काळात आलेल्या लोकांना नोकऱ्यांपासून ते खाण्याच्या पदार्थांचा जो थोडाफार त्रास झाला, जे असेल ते, मिळेल ते खाऊन दिवस काढावे लागले..तो संघर्ष या नवीन पिढीतल्या लोकांना करावा लागला नाही.

पिट्सबर्गच्या बर्फात दादासाहेबांच्या गाडीचा दोनदा अपघात झाल्याने त्यांनी कॅलिफोर्नियात नोकरी शोधायचे प्रयत्न सुरु केले आणि ६ वर्षांनी १९८० साली त्यांना लॉस एंजलिस जवळील पसादेना येथे चांगल्या मोठया कंपनीत इंजिनीअरची चांगल्या पगाराची नोकरी मिळाली. तत्पूर्वी १९७३ साली ७ वर्षांनी ते दोन लहान मुलींसह भारतात येऊन गेले. परत चांगले दिवस आले. दोन मुली, नातवंडे यांच्या सोबत त्यांची शेवटची वर्षे आनंदात गेली. १९८४ साली दादासाहेबांनी आणि वहिनींनी लॉस एंजलिस येथे झालेल्या ऑलिम्पिक खेळाच्या ठिकाणी एक फूड स्टॉल टाकला होता. त्यानंतरही दोनदा रेस्टोरंटसच्या धंद्यात जम बसवायचा प्रयत्न केला, पण यश आले नाही.

- **प्रमोद तेंडुलकर,** फ्रेमॉण्ट, कॅलिफोर्निया

## भारतीय - अमेरिकन स्वातंत्र्य दिन - जुलै ४!

यंदा अमेरिकन स्वातंत्र्य दिनाला २५० वर्षं पूर्ण होत आहेत. ह्या दिनाचं अमेरिकेत राजकीय, सांस्कृतिक, सामाजिक महत्व अनन्यसाधारण आहे पण माझ्यासारख्या परदेशातून अमेरिकेत स्थलांतरित झालेल्या नागरिकाला त्याचं काय महत्व किंवा त्याची काय किंमत आहे? अमेरिकन कॉँग्रेसने १७७६ साली 'डिक्लरेशन ऑफ इंडिपेन्डन्स' अंगिकारली ह्या घटनेमध्ये माझी भावनिक गुंतवणूक कितपत आहे? हे प्रश्न कठीण आहेत. उत्तर सुचत नाही असं काही झालं की मन जन्मभूमीकडे धाव घेतं.

त्यावेळी माझ्यालेखी पंधरा ऑगस्ट महत्व किती आहे बरं असा एक प्रश्न माझ्या मनात येतो. पंधरा ऑगस्ट ह्या दिनाचं महत्व शाळेमुळे मनात ठसलेलं होतं. त्या दिवशी भल्या पहाटे उठून, कडक इस्त्री केलेला स्वच्छ गणवेश घालून, झेंडा वंदनासाठी शाळेत जाणं सक्तीचं होतं. मग "आज आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून 'क्ष' वर्षं झाली. ह्या 'क्ष' वर्षांत आपल्या देशाने प्रचंड प्रगती केलेली आहे..." ह्या थाटात चालू होणारं कुणाचं तरी भयंकर कंटाळवाणं भाषण - पाय दुखायला लागले तरी - पटांगणात उभं राहून ऐकायला लागायचं. रिमझिम पाऊस पडायला लागला तरी रांगेतली जागा सोडायची नाही ह्या कडक शिस्तीचं पालन करावं लागायचं! ती सगळी भाषणबाजी संपली की त्यानंतर एकदाचा तो एक पेढा मिळायचा आणि मग साई सुट्ट्यो! पंधरा ऑगस्टला शाळेला सुट्टी मिळणं हीच त्यातली सगळ्यात महत्वाची बाब! सुट्टीचा हा भारतीय वारसा लक्षात घेतला तर अमेरिकेतसुद्धा जुलै ४ला सुट्टी मिळते ही महत्वाची गोष्ट आहे! पंधरा ऑगस्टला भारतात जसं घरी गोडा-धोडाचं करतात तसंच अमेरिकेतही काही खास अमेरिकन पदार्थ करण्याची प्रथा आहे उदा. हॉट डॉग, बार्बेक्यू वगैरे. कुठल्याही सणाचा खाण्याशी संबंध ठेवणे हा दोन्ही संस्कृतीत असलेला धागा समान आहे ही किती आनंदाची गोष्ट! भारतात पावसाचं अवधान सांभाळून निसरड्या पटांगणात क्रिकेट खेळणे ही सुद्धा एक प्रथा होती. आज अमेरिकेत तीच प्रथा पार पाडण्याचा प्रयत्न गावोगावी देशबांधव करीत आहेत - आणि तो ही जास्तच उत्साहात कारण इथे चार जुलैला मस्त उन्हाळा असतो!

आमच्या वैयक्तिक आयुष्यात तर चार जुलैला एक अशी महत्वाची घटना घडली आहे की जिथे अमेरिकन आणि भारतीय संस्कृतींची जबरदस्त टक्कर झाली! सुदैवाने त्या घटनेची निष्पत्ती

चांगलीच झाली. झालं असं की आमचा मोठा मुलगा तन्मय त्याच्या अमेरिकीन मैत्रिणीच्या घरी तिच्या आई-वडिलांना भेटायला पहिल्यांदा गेला तो चार जुलैला! चार जुलैच्या प्रथेप्रमाणे आता झालेल्या आमच्या सुनबाईच्या वडिलांनी बार्बेक्यूची तयारी केली होती. तन्मयने दार वाजवताच त्यांनी दार उघडलं ते स्वतः हाफ पॅण्ट - टी शर्ट आणि बेसबॉल कॅपच्या अशा वेशात तर तन्मय मात्र भावी सासू-सासऱ्यांवर चांगली छाप पडावी म्हणून कडकडीत पिन-स्ट्राइप सूट घालून गेला होता! दोघे थक्क होऊन एकमेकांकडे बघत राहिले आणि मग हसायला लागले! आमचे व्याही नंतर म्हणाले तन्मयला बघितल्यावर मला माझा वॉर्डरोब बदलायला हवा आहे ह्याची प्रकर्षाने जाणीव झाली!

वैयक्तिक पातळीवर अजूनही खोलात जाऊन विचारता येईल की चार जुलैचा अमेरिकन स्वातंत्र्य दिन मी कसा अनुभवतो? त्या पातळीवर विचार करताना मला असं जाणवतं की भारतीय आणि अमेरिकन स्वातंत्र्याच्या लढ्याची नाळ फार खोलवर जुळलेली आहे. त्यांच्यामध्ये अनेक साम्यं आहेत! १७७६ साली लिहिलेल्या 'डिक्लरेशन ऑफ इंडिपेंडन्स' मध्ये थॉमस जेफरसन म्हणतात: "We hold these truths to be self-evident, that all men are created equal, that they are endowed by their Creator with certain unalienable Rights, that among these are Life, Liberty and the pursuit of Happiness. King of England has refused his Assent to Laws, the most wholesome and necessary for the public good. He has obstructed the Administration of Justice. He has made Judges dependent on his Will alone. He has imposed Taxes on us without our Consent. He has plundered our seas, ravaged our Coasts, burnt our towns, and destroyed the lives of our people. We, therefore, solemnly publish and declare, That these United Colonies are, and of Right ought to be Free and Independent States..." असं ठामपणे सांगून ब्रिटिशांच्या विरुद्ध उभी राहिलेली अमेरिकन जनता हे आमचे सख्खे भाऊबंदच आहेत! कारण त्याच्याही आधी १३० वर्षं म्हणजे १६४६ साली शिवाजी महाराजांनी परकीय आक्रमणांनी गांजलेल्या मराठी जनतेला उद्देशून म्हटलं होतं: "परकीय सत्तांचा आमच्या नागरिकांवर अंदाधुंद अत्याचार होत आहे त्याला आळा घातला पाहिजे. परकीयांचे अत्याचार थांबवण्यासाठी इतर लोकांच्या गुलामगिरीतून बाहेर पडून आपण स्वराज्य स्थापन केले पाहिजे. ह्यांच्या राज्यात आम्हाला न्याय मिळत नाही. ह्यांच्या राज्यात आमच्यावर कर लादले जातात. ह्यांच्या राज्यात आमच्यावर मनमानी केली जाते. ह्यांच्या राज्यात आमची मुस्कटदाबी होते. आमच्या गावांची, घरादाराची, शेतशिवारांची राखरांगोळी केली जाते. हे स्वराज्य व्हावे हे तो श्रींची इच्छा!" अगदी शब्दाला शब्द, विचारांशी विचार, अनुभवांशी अनुभव, आणि भावनांशी भावना नेमक्या जुळवून घ्याव्यात! भारत-अमेरिका ह्यांच्या स्वातंत्र्य संग्रामांत अजूनही काही समान बळकट धागे आहेत. अनिर्बंध वाढत चाललेल्या राजकीय शक्तीला काबूत आणण्यासाठी 'नागरी असहकार' (civil disobedience) ह्या प्रणालीचा शोध हेन्री डेव्हिड थोरो ह्या अमेरिकन तत्वज्ञ / विचारवंताने लावला आणि ह्याच प्रणालीचा उपयोग पुढे महात्मा गांधी ह्यांनी ब्रिटिशांविरुद्ध असहकार चळवळ उभी करण्यासाठी केला. त्याचबरोबर महात्मा गांधींनी चालू केलेल्या अहिंसा चळवळीचा वापर सुप्रसिद्ध अमेरिकन नेते मार्टिन ल्युथर किंग ह्यांनी आफ्रिकन अमेरिकन लोकांना नागरी हक्क मिळवून देण्यासाठी केला हे ही सर्वज्ञात आहे. त्यामुळे अमेरिका असो की भारत असो स्वातंत्र्य दिनाचं महत्व तितकंच दूरगामी आणि समाजाच्या हितासाठी मूलभूत आहे.

परकीय सत्तेपासून अमेरिकेला आणि भारताला स्वातंत्र्य मिळालं असलं तरी अजूनही अनेक सामाजिक विसंगतींपासून पूर्ण सुटका मिळालेली नाही. सगळ्यांना समभावाने वागणूक मिळत नाही आणि संधी उपलब्ध होत नाहीत. आपपरभाव गेलेला नाही. स्त्री-पुरुष, वंश, धर्म, राजकारण, विचार ह्या साऱ्या गोष्टींमध्ये समानता, स्वातंत्र्य आणि सलोखा निर्माण होण्याची गरज आहे. समाजचक्राचा गाडा हळूहळू पुढे जात असतो पण तो पुढे नेत राहण्याचं कार्य आपल्याला सगळ्यांना सतत करायचं आहे - मग तुम्ही अमेरिकेत राहा किंवा भारतात राहा! आत्मपरीक्षण करून ह्या जबाबदारीची नीट जाणीव ठेवणे हे माझ्या मताने चार जुलैचं खरं महत्व आहे!

- **डॉ. प्रियदर्शन मनोहर,** पिट्सबर्ग, पेनसिल्व्हेनिया

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका



## चंद्राच्या खंत आणि दंत कथा

"आजचा दुर्मिळ सुपर ब्लू ब्लड मून चुकवू नका!" अशा अर्थाचा एक व्हाट्सऍप संदेश एका मित्राने काही दिवसांपूर्वी फॉरवर्ड केला. खाली चंद्राचा इतका मोठा फोटो की जणू तो पृथ्वीवर कोसळणारच होता. नक्कीच कोणत्यातरी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या ॲपने बनवलेला. रंग असा की एखाद्या भयपटाच्या पोस्टरवर शोभेल, आणि अर्थातच शेवटी तीन लाल उद्गारचिन्हे. असे संदेश पाहून किती जण खिडकीकडे धाव घेत असतील? मित्राने खाली एकच प्रश्न विचारला होता: "हे खरं आहे का?"

खगोलशास्त्रज्ञाला असे प्रश्न अधूनमधून येत असतात. कधी ग्रहणाबद्दल, कधी उल्कावर्षावाबद्दल, कधी एखादा ग्रह पृथ्वीच्या फार जवळ येणार असल्याबद्दल, आणि अलीकडे बऱ्याचदा चंद्राच्या या नव्या नावांबद्दल. सुपरमून, ब्लूमून, ब्लड मून, मायक्रोमून: गेल्या काही वर्षांत चंद्राच्या नावांची यादी इतकी वाढली आहे की कधी कधी वाटते, आकाशात एकच चंद्र आहे की अनेक? मी मित्राला देलेल्या उत्तरात एक प्रतिप्रश्न होता: "खऱ्याची फोडणी दिलेली ही एक अतिरंजित कथा आहे. मी उकलून सांगण्याआधी काय खरे आहे हे शोधायचा प्रयत्न करणार?"

चंद्र तोच असतो; बदलते ती आपली भाषा. कधी बातम्यांची, कधी पंचांगाची, कधी कवींची, कधी भीतीची. पण  काही साधे प्रश्न विचारून खरे काय आणि खोटे काय हे कोणीही ओळखू शकेल.

**सुपरमून, ब्लूमून, ब्लड मून: विज्ञान की टिआरपी?**

सुपरमून पूर्णपणे खोटा प्रकार नाही. चंद्र पृथ्वीभोवती अगदी गोल कक्षेत फिरत नाही. त्याची कक्षा लंबवर्तुळाकार आहे. पौर्णिमेचा चंद्र पृथ्वीच्या जवळ असताना दिसला, तर त्याला "सुपरमून" म्हणतात. जवळ आणि दूर असतानाच्या पौर्णिमेतील चंद्राच्या व्यासातील फरक साधारण १४ टक्के असतो, तर परावर्तित प्रकाशात ३० टक्के फरक असू शकतो. मात्र आकाशात एकुलत्या एका चंद्राकडे पाहताना हा फरक सहज लक्षात येत नाही; दोन्ही पौर्णिमांच्या वेळी घेतलेली छायाचित्रे एकमेकाशेजारी ठेवली तरच तो फरक प्रकर्षाने जाणवतो. सुपरमून खोटा नाही, पण त्या व्हाट्सऍप फोटोइतका अवाढव्य मुळीच नाही.

"ब्लूमून" हा आणखी गमतीदार प्रकार. नावावरून वाटते की चंद्र निळा दिसणार, पण तो सहसा निळा नसतो. एका इंग्रजी कॅलेंडर महिन्यात दोन पौर्णिमा आल्या, तर दुसऱ्या पौर्णिमेला ब्लू मून म्हणतात. असे क्वचितच होते म्हणून सहसा न घडणाऱ्या गोष्टींना ‘वन्स इन अ ब्लू मून’ असे म्हणतात. हा मुख्यतः कॅलेंडरचा खेळ आहे, रंगाचा नाही. ३१ दिवस असणाऱ्या महिन्यांमध्ये याची शक्यता जास्त. चैत्र, वैशाख आदि भारतीय महिने चांद्रमास असल्यामुळे साहजिकच एकच पौर्णिमा त्यात येते.

चंद्र खरोखर निळसर दिसू शकतो का? फार अपवादात्मक परिस्थितीत हो. वातावरणात धूर, धूळ, ज्वालामुखीमुळे आलेले कण यांच्यामुळे प्रकाशाचे विखुरणे बदलले, तर चंद्राचा रंग विचित्र दिसू शकतो. पण व्हॉट्सऍपवर येणारा ब्लू मून सहसा निळा नसतो. तो फक्त महिन्यात दुसऱ्यांदा आलेला असतो.

"ब्लड मून" हे नाव सर्वांत नाट्यमय. प्रत्यक्षात याचा संबंध खग्रास चंद्रग्रहणाशी आहे. पृथ्वीच्या वातावरणातून गेलेला सूर्यप्रकाश वक्र होत चंद्रापर्यंत पोहोचतो. या प्रवासात निळा प्रकाश जास्त पांगतो; लालसर प्रकाश मात्र चंद्रावर पडतो. म्हणून खग्रास चंद्रग्रहणात चंद्र तांबूस, केशरी, कधी गडद लालसर दिसतो. नावात रक्त आहे, पण वैज्ञानिक कारण पाहता वातावरण, सावली आणि प्रकाशाचे विखुरणे आहे.

चंद्रग्रहणे बरेचदा होत असतात. ऑगस्ट २०२६ मध्ये आंशिक चंद्रग्रहण आहे. पूर्ण लालसर “ब्लड मून”साठी मात्र २०२८ डिसेंबर पर्यंत थांबावे लागेल. पूर्वी ग्रहणांना भीती, अपशकुन, दैवी राग यांच्याशी जोडले जात. पण आज ग्रहण कधी लागेल, कुठून दिसेल, किती वेळ राहील हे अचूक सांगता येते. भीती वाटण्याऐवजी याकडे पृथ्वी-सूर्य-चंद्र यांच्या भूमितीचा सुंदर प्रयोग म्हणून पाहिले पाहिजे. ग्रहणाच्या वेळचे पाणी फेकून देणे, किंवा चंद्राकडे पाहिल्याने काही अनिष्ट होईल असे मानणे हे अर्थातच अवैज्ञानिक आहे, शाळेत शिकलेल्या ज्ञानाला कवडीमोल करणारे आहे.

**भारतीय परंपरा आणि चंद्राची आणखी नावे**

भारतात चंद्राच्या वेगवेगळ्या नावांची परंपरा व्हॉट्सऍपच्या खूप आधीपासूनची आहे. आषाढ पौर्णिमा म्हणजे गुरुपौर्णिमा. श्रावण पौर्णिमा म्हणजे राखी, नारळी पौर्णिमा. आश्विन पौर्णिमा म्हणजे कोजागिरी: चांदण्यात बसणे, दूध, जागरण, आणि कदाचित कवितांचा आस्वाद घेणे. फाल्गुन पौर्णिमा म्हणजे होळी; वैशाख पौर्णिमा म्हणजे बुद्ध पौर्णिमा वगैरे.

या नावांत चंद्राचा रंग बदलत नाही, पण आपला अनुभव बदलतो. कोजागिरीच्या चंद्रात एक वेगळे सौंदर्य आहे. गुरुपौर्णिमेच्या चंद्रात स्मरण आहे. होळी पौर्णिमेच्या चंद्रात ऋतू बदलण्याची चाहूल आहे.

लहानपणी एकदा कुणीतरी सांगितले होते, “आज चंद्राकडे बघू नकोस.” कारण तो चतुर्थीचा चंद्र होता. “भाद्रपद शुद्ध चतुर्थीला चंद्र पाहू नये; पाहिला तर खोटा आळ येतो,” अशी समजूत अनेक ठिकाणी आहे. तिच्यामागे गणपती आणि चंद्राची कथा सांगितली जाते. कथा म्हणून ती रंजक आहे. पण कारण-परिणाम म्हणून पाहिले, तर चंद्र पाहिल्याने खोटा आरोप होतो याची सुतराम शक्यता नाही. चतुर्थीचा चंद्र हा सूर्याच्या जवळ दिसणारा कोवळा, अर्धवट उजळलेला चंद्र असतो. त्याच्यात अपशकुन नाही; निरीक्षणाची संधी आहे.

याच्या अगदी उलट ईदेचा चंद्र. रमजान संपत आल्यावर लोक आकाशात कोवळा चंद्र शोधतात. "चाँद दिखा?" हा प्रश्न फक्त खगोलशास्त्राचा नसतो. हिंदी-उर्दूतील "ईद का चाँद" हा वाक्प्रचारही आला, थोडाफार ब्लू मून सारखा, फार क्वचित दिसणाऱ्या व्यक्तीसाठी.

चंद्र तोच; बदलतात आपल्या कथा.

**कवींचा चंद्र आणि विज्ञानाची वास्तवता**

भारतीय भाषांमध्ये चंद्र हा सौंदर्याचा, शांततेचा, विरहाचा, प्रेमाचा फार जुना प्रतीक आहे. मराठीत, हिंदीत, उर्दूमध्ये, संस्कृतमध्ये, एवढेच नाही तर जगभरच्या भाषांमधील कवितांमध्ये चंद्राने प्रेमपत्रे उजळवली आहेत. पण खगोलशास्त्राचे भिंग (किंवा खरे तर दुर्बीण) लावून पाहिले तर थोडी गंमत होते. चंद्राचा चेहरा ‘निर्दोष’ नाही, तर छोट्या मोठ्या विवरांनी आणि त्यात असलेल्या डोंगरांनी भरलेला आहे. रूढी, परंपरा आपण सहजी बदलत नाही हेच खरे.



चंद्राची प्रतीके फक्त कवितेत नाहीत; ती झेंड्यांवरही येतात. अनेक देशांच्या झेंड्यांवर चंद्रकोरीच्या दोन टोकांमध्ये किंवा तिच्या जवळ तारा दाखवलेला असतो. पाकिस्तान आणि सिंगापूर सकट अनेक देश त्यात येतात. असे काही पाहिले की खगोलशास्त्रज्ञाच्या डोक्यात लगेच प्रश्न येतो: असे खरेच दिसू शकेल का? चंद्रकोरीचा काळा भाग म्हणजे चंद्राचा न उजळलेला भाग. त्याच्या “मागे” तारा दिसत असेल, तर तो तारा चंद्राने झाकला गेला पाहिजे. म्हणजे झेंड्यावरचा तारा हा अनेकदा अशक्यप्राय असतो. काही दशकांपूर्वी टर्कीने आपल्या झेंड्यातला तारा थोडा बाहेर सरकवला पण अजूनही पूर्णपणे नाही. झेंडा हा आकाशाचा फोटो नाही पण तरी अशा साध्या गोष्टी झेंड्यासारख्या महत्त्वाच्या प्रतीकांवर येण्याआधी तपासायला हव्या.

**दृष्टीभ्रम आणि जाणीवेचा चंद्र**

कधी कधी चंद्र क्षितिजाजवळ असताना फार मोठा भासतो. झाडांच्या फांद्यांमधून, इमारतींच्या मागून किंवा डोंगराच्या कडेला उगवणारा चंद्र जणू अवाढव्य वाटतो. त्या वेळी त्याचा प्रकाश आपल्यापर्यंत येताना वातावरणाच्या अधिक जाड थरातून येत असतो; त्यामुळे चंद्र लालसर किंवा पिवळसर दिसू शकतो, आणि परावर्तनामुळे त्याची प्रतिमा किंचित चपटी किंवा हललेली दिसू शकते. पण तो मोठा दिसण्याचे मुख्य कारण हे नाही.

मोठेपणाचा हा अनुभव बहुधा आपल्या दृष्टीचा भ्रम आहे. क्षितिजाजवळ चंद्राच्या आसपास झाडे, घरे, डोंगर असे संदर्भ असतात; त्यांच्यामुळे चंद्र मोठा भासतो. वर गेल्यावर तो रिकाम्या पार्श्वभूमीवर दिसतो आणि छोटा वाटतो. साधा प्रयोग करून पाहता येतो: चंद्र क्षितिजाजवळ असताना एक फोटो घ्या, आणि काही तासांनी तो आकाशात वर गेल्यावर पुन्हा फोटो घ्या. एकाच झूम सेटींगवर दोन्ही फोटो काढले तर त्याचा आकार जवळजवळ सारखाच दिसेल. चंद्राने आपला आकार बदललेला नसतो; वातावरणाने त्याला मोठा केलेला नसतो; आपली जाणीव बदललेली असते.

**चंद्राकडे पाहण्याची नजर**

त्या व्हॉट्सॲप संदेशातील चंद्र प्रत्यक्षात तितका मोठा नव्हता, तितका लाल नव्हता. पण त्याने एक काम केले: अनेकांना पुन्हा एकदा आकाशाकडे बघायला उद्युक्त केले. काही दशकांपूर्वी मानवाने चंद्रावर पाऊल ठेवले. आता आर्टेमिससारख्या मोहिमा माणसाला पुन्हा चंद्राकडे नेण्याची तयारी करत आहेत. चंद्र आता फक्त पाहण्याची गोष्ट राहिला नसून आपल्या पुढील अवकाशप्रवासाची पायरी बनला आहे.

- **आशिष महाबळ**, पॅसडीना, कॅलिफोर्निया

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका



## आणि पाषाण बोलू लागले ...

दरवर्षी प्रमाणे मी माझ्या कुटुंबियांना भेटायला भारतात गेले होते. यावेळी माझी भाचे मंडळी आपण रोड ट्रीपला जाऊ म्हणून मागेच लागली होती. रोड ट्रीप नेहमीच उत्साहवर्धक असते. प्रवासातल्या वाटेतल्या वेगवेगळ्या जागा, माणसे बघायला मिळतात. कधी कधी तर जे योजले नसते ते पण अनुभवायला मिळते. आमच्या या रोड ट्रीपमध्ये तसेच झाले. आम्हाला आमच्या घराच्या काही कामासाठी आमच्या गावी जायचे होते. गाव तसे महाराष्ट्रातल्या मराठवाडयातले. पूर्वी या मार्गातल्या रस्त्यांची अवस्था अत्यंत बिकट होती. नुसते खड्डे, खडबडीत रस्ता त्यामुळे एस.टीने जाताना पण अंगातील हाडे खिळखिळी व्हावी. घरातली सगळेजण म्हणाले आता रस्त्यांची परिस्थिती खुपच छान आहे. पूर्वी जिथे ७-८ तास लागले असते तिथे आपण सहज ४ तासात जाऊ शकतो. मग काय आमच्याच कारने जाण्याचे निश्चित झाले.

वाटेत कुठे कुठे थांबायचे, कुठे खायचे, आताच्या हाय-वे वर अजून काय काय आहे. याची चर्चा सुरू झाली. दुसऱ्या दिवशी आम्ही पहाटेच निघालो. अगदी ब्रेकफास्टच्या वेळेसच दोन तासाच्या अंतरावर एक साऊथ इंडियन रेस्टॉरंट होते, तिथे थांबलो. सगळ्यांनी आपापल्या आवडीच्या पदार्थांची ऑर्डर दिली. साऊथ इंडियन रेस्टॉरंट म्हटले की माझी रवा मसाल्याची ऑर्डर ठरलेलीच असते. आमचे आपापसात बोलणे चालले होते की इथे थांबलोच आहोत तर बघू इथे आजूबाजूला काय आहे ते. माझा एक भाचा म्हणाला की मावशी आपल्याला बरेच काही बघायचे आहे त्याला उशीर होईल. त्यावर मी म्हणाले, ते होईलच पण असे impromptu गोष्टी करण्यात पण एक मजा असते. असे आमचे बोलणे चालले होते तेवढ्यात रवा मसाला घेऊन रेस्टॉरंट मधला माणूस आला. त्याने आमचे बोलणे तसे उडत उडत ऐकले असणार कारण खाण्याची प्लेट टेबलावर ठेवता ठेवता म्हणाला की अजून एक फर्लांग भर अंतरानंतर उजव्या बाजूला वळले की थोडयाच अंतरावर एक जुने शिव मंदिर आहे. तसे आता ते एकाकी असल्यासारखे आहे. पण जेव्हा केव्हा मंदिर बांधले असेल तेव्हा फारच छान दिसत असणार. त्यात खुप शिल्पे आहेत. मी कधी कधी निवांतपणा पाहिजे असला की त्या देवळाच्या आवारात जाऊन बसतो. भारतीय देवळे, त्याचे शिल्पकाम म्हणजे माझा अगदी आवडीचा विषय हे सगळ्यांनाच माहिती होते. त्यामुळे कोणी काहीच बोलले नाही. जणू काही आता खाणे झाल्यावर तिथेच जायचे आहे हे समजून सगळे आपापली ऑर्डर केलेले खायला लागले.

मी मनाने त्या न बघितलेल्या देवळापाशी जाऊन कधीच पोहोचले होते. त्यामुळे आम्ही कधी त्या देवालयासमोर आलो ते कळलेच नाही. ते पाहताक्षणी शांता शेळकेंची कविता "भग्न शिवालय परिसर निर्जन, पळस तरुंचे दाट पुढे बन, तरुवेली करतील गर्द झुला" मी नकळत गुणगुणायला लागले.

सगळे जण माझ्याबरोबर निमुटपणे चालत होते. त्यांना माहिती होते की आता काहीतरी गोष्ट ऐकायला मिळणार.

आम्ही देवळाच्या दाराजवळ आलो. दरवाजाच्या चौकटीतून आत पाऊल टाकताच एक विलक्षण स्पंदन जाणवले. क्षणभर वाटले, जणू त्या हेमाडपंथी मंदिरातील प्रत्येक पाषाण जिवंत झाला आहे. शतकानुशतके उन्हात-पावसात उभ्या असलेल्या त्या दगडांना काहीतरी सांगायचे होते. त्यांच्या शांत अस्तित्वामागे दडलेल्या असंख्य कथा, त्यांनी पाहिलेले काळाचे बदलते प्रवाह, भक्तांची अखंड श्रद्धा आणि इतिहासाचे साक्षीदार म्हणून अनुभवलेले क्षण ते माझ्याशी बोलू लागले होते. प्रत्येक दगड जणू आपली व्यथा, आपला अभिमान आणि आपल्या स्मृतींचा ठेवा हळुवारपणे कुजबुजत होता. नकळत माझे आणि त्या पाषाणांचे एक अदृश्य नाते जुळत होते. जणू त्यांच्या बरोबर एक दुवा निर्माण होत होता.



दारात आत पाऊल ठेवताक्षणी मंदिराची भव्यता आणि जुने असले तरी त्याची स्वच्छता जाणवली. शिवालयाची भव्यता बघून हे त्याच्या काळातले अतिशय भव्य आणि सुंदर देऊळ असणार हे कळत होते. मुख्य द्वाराने आत नंदीमंडपात येताच भव्य नंदीचे दर्शन झाले. नंदीशिल्प अखंड दगडातले असून त्याच्या गळ्यात घुंगरूमाळ, कंठमाला, अंगावर झालर फार सुंदरपणे कोरलेली होती. या देवळाचे

आवार भव्य आणि स्वच्छ होते. बाजूला छोटी देवालये होती. हे देऊळ पंचायतन प्रकारचे होते. म्हणजे मध्यभागी मुख्य देवताचे मंदिर आणि आजुबाजुला इतर देवतांची छोटी मंदिरे. गणेश, विष्णु, सूर्य आणि शक्ती म्हणजे दुर्गा व पार्वती. पंच (पाच) + आयतन (आवास) असे पंचायतन - पाच मंदिराचा समूह परीसर. मंदिराची रचना पारंपरिक हेमाडपंथी स्थापत्यशैलीनुसार दिसून येत होती. सर्वप्रथम नंदीमंडप, त्यानंतर अर्धमंडप, पुढे मुख्य मंडप आणि त्यापुढे अंतराळ गर्भगृह , गर्भगृहावर शिखर हे मुख्यतः नागर शैलीत दिसून येते. मंदिराच्या या क्रमबद्ध मांडणीतून भक्ताला बाह्य जगातून अंतर्मुखतेकडे आणि अखेरीस देवत्वाच्या सान्निध्यात नेण्याचा स्थापत्यकारांचा सूक्ष्म विचार जाणवतो. मंदिराकडे मी जायला लागले तर आमच्या घरातील सगळेजण माझ्या मागे मागे म्हणत आले की आम्हालाही सांग तू काय पाहते आहेस ते. मी सगळ्यांकडे पाहत म्हणाले, जरा शांतपणे या मंदिराकडे पहा त्यातल्या एकेका पाषाणाकडे पहा. तुम्हालाही जाणवेल की प्रत्येक पाषाण काही तरी सांगू पाहात आहे. त्यांनी काय पाहिले, काय अनुभवले. आता हे मंदिर पहा, हेमाडपंथी मंदिरांची बांधणी चुना किंवा सिमेंट न वापरता, अचूक घडवलेल्या काळ्या दगडांना एकमेकांत घट्ट बसवून (Interlocking Technique) केली जात असे. या पद्धतीमुळे मंदिरे अत्यंत मजबूत, टिकाऊ आणि शेकडो वर्षे टिकून राहिली आहेत. यादवकालीन ही वैशिष्ट्यपूर्ण दगडी स्थापत्यशैली १२व्या–१३व्या शतकात विकसित झाली. किती गोष्टी या मंदिराने पाहिल्या असतील. किती पूजा, किती समारंभ या मंदिर प्रांगणात झाले असतील. मंदिराच्या अर्धमंडप, मंडप या भागात किती सांस्कृतिक कार्यक्रम झाले असतील, गर्भगृहाभोवती किती लोकांनी देवाचे नाव घेत प्रदक्षिणा घातल्या असतील. मंडपातल्या खांबावरील कोरीव काम पाहिले का? किती कलाकुसर आहे पहा. जणू तो पाषाण त्या कारागिराचे कौतुक करत आहे. सगळ्यात मजा म्हणजे मंदिराचे शिखर पाहिले का? शिखराचा दगड जणू काही सांगत आहे, मी इथे कसा आलो माहिती आहे का? खरचं त्या काळी क्रेन मशीन नव्हत्या की वस्तु उचलून त्या उंची वर ठेवतील. मंदिर जसे बांधले जायचे तसे, त्याच्या बाजूने मातीचा वा वाळूचा ढिगारा रचला जायचा. मग त्या वरून एकेक पाषाण वर ढकलत न्यायचे हे ऐकून भाचे मंडळी अवाक झाली होती. त्यात माझ्या भाचीने विचारले की आपण नेहमी मंदिर म्हटले की काही ठराविकच रचना बघतो. मंदिराबाहेर काही प्रकारची शिल्पे वेगळी, मंदिराच्या आत वेगळी - हे सगळे कोण ठरवते. छानच प्रश्न होता. हे काही एका दिवसात घडले नव्हते. युगे लोटली असतील या स्थापत्यकले मधली प्रगती व्हायला. साध्या शब्दात सांगायचे झाले तर मंदिराच्या बाहेरच्या प्रांगणात सांसारिक जगातील शिल्पे असतात ती तुम्हाला ओळखीच्या गोष्टींची, जगाची ओळख देतात. देवालयाच्या आत प्रांगणात, मंडपात देवळाच्या मुख्य देवता आणि त्या अनुशंगाने पुराणातील गोष्टी यांचे चित्रण दिसते. ज्यामुळे तुम्हाला आपण देवाच्या सहवासात आहोत, त्याच्या जवळ जात आहोत असे वाटायला लागते. ज्यावेळी तुम्ही अंतराळापर्यंत जाता, (जो मंडप आणि गर्भगृह -जिथे देवतेची मूर्ती असते - यांना जोडणारा भाग, गर्भगृहाच्या दिशेने जाणारा प्रवेश कक्ष) त्यावेळी स्वतःला विसरून नतमस्तक होऊन देवासमोर जायला पाहिजे आणि जेव्हा तुम्ही गर्भगृहाच्या प्रवेशद्वारापाशी असता त्यावेळी (आतला देव हा माझा आहे, मी म्हणजे तो, तो म्हणजे मी, अहं ब्रम्हास्मि - मी आणि परमसत्य वेगळे नाहीत- असे जेव्हा वाटायला लागते तेव्हाच तुम्हाला देवतेची महती कळली असे होते) आतला देव हा माझा आहे. ही भावना व्हायला लागते. नकळत तुम्ही नतमस्तक होता. भारतीय मंदिर हे फक्त देवाची मूर्ती ठेवण्याचे स्थान नाही तर ते माणसाच्या अंतर्मनाच्या प्रवासाचे प्रतीक आहे.

किती छान समजावून सांगत आहेस, भाचे मंडळी असे म्हणत असतानाच देवळातले पूजारी बाहेर आले. आम्हालाही आश्चर्य वाटले की देवळात अजून जाग आहे. पुजा अर्चा होत आहे. पुजारीही म्हणाले की मी मगापासून ऐकत आहे. छान समजावून सांगितले अशीच आस्था असू देते.

देवळाची अवस्था तशी पूर्वीसारखी राहिली नाही तरी पण आमचे वंशज देवळाच्या पूजेची जबाबदारी घेत होते तसेच आज आम्हीही ती जबाबदारी तितक्याच निष्ठेने पार पाडत आहोत. आता देवळाच्या बाहेरच्या बाजूला थोडी पडछड झाली आहे. पण गावातली लोक नेहमीप्रमाणे मदत करायला येणार आहेत. त्यामुळे इतकी वर्षे झाली तरी हे मंदिर त्याचा इतिहास सांगत तसे अबाधित आहे. आता कळले जुने मंदिर असून तसे व्यवस्थित स्वच्छ कसे होते. पुजाऱ्यांना नमस्कार करून आम्ही देवाचे दर्शन घेतले आणि निघालो. मी आज वेगळ्याच धुंदीत होते. बऱ्याच दिवसांनी आवडत्या गोष्टी बघायला मिळाल्या होत्या, अनुभवायला मिळाल्या होत्या. मंदिराच्या दारातून पाऊल बाहेर ठेवताना मन जड झाले होते. मंदिराच्या दगडी भिंतींवरून हात फिरवताना त्यांचे अस्तित्व जाणवत होते. परत भेटायला या असेच जणू म्हणत होते. बाकी सगळे जण पुढच्या प्रवासासाठी उत्सुक होते. शेवटी निघावे लागलेच, पण या क्षणानंतर माझी रोड ट्रिप खऱ्या अर्थाने पूर्ण झाली होती.

- **उत्तरा भालेराव**, टॅम्पा, फ्लोरिडा

## वेताळ ४

विक्रमादित्य पुन्हा त्या झाडाकडे निघाला. अमावास्येची रात्र. डोळ्यात बोट घातले तरी दिसणार नाही असा अंधार आणि त्याच्या जोडीला स्मशान शांतता - विक्रमादित्याच्या मनात विचार आला आणि त्याचे त्यालाच हसू आले. कारण तो स्मशानातच होता. डोळ्यात बोट घातले तर दिसणार कसे - नाही म्हणजे बोट डोळ्याच्या जवळ आले तरी दिसणार नाही -असे म्हणायला काय होते? त्याने विचार केला. त्याने त्या झाडाकडे कूच केले. त्या झाडाशी पोहचताच त्याची नजर वर गेली. त्या अंधारातही त्याला ते प्रेत दिसले. झाडावर चढून त्याने दोर कापला आणि ते प्रेत खाली पडले. विक्रमादित्य खाली उतरला. त्याने ते प्रेत खांद्यावर घेतले आणि त्याने चालायला सुरुवात केली. मागच्या अनेक वेळासारखेच वेताळ त्याला प्रश्न विचारणार अशी त्याची अपेक्षा होती. पण क्षणभर ती भयाण शांतता चालूच होती. आणि मग वेताळाने बोलायला सुरुवात केली.

वेताळ म्हणाला "अरे मला वाटले तू निराश झालास आणि मला विसरून गेलास का काय? नाही म्हणजे चांदोबा मासिक बंद झाले आणि तू यायचे बंद झाले. आणि माझी दर अमावास्येला तुला गोष्ट सांगायची सवय गेली. मला वाटले तू काही आता परत येणार नाहीस, पण तू नेटाने परत आलास - काय बरा आहेस ना? आणि काय रे इतकी वर्षे झाली पण तुझ्यात काहीच कसा फरक पडलेला नाही. केस रंगवतोस का बोटॉक्स - का पूर्ण फेस लिफ्ट". विक्रमादित्य काहीच बोलला नाही. मग वेताळच पुन्हा बोलू लागला, "अरे हो, मीच नाही का तुला सांगितले होते कि तू जर बोललास तर मी परत त्या झाडावर जाईन म्हणून - ठीक आहे मग मला आता पूर्वीसारखी तुला एक गोष्ट सांगू दे आणि हो -ज्या प्रमाणे त्या मिशन इम्पॉसिबलच्या प्रत्येक एपिसोडमध्ये किंवा चित्रपटात असते त्याप्रमाणे -If you decide to accept it—and at the end -हि टेप जळून जाईल वगैरे -तसेच माझे पण म्हणणे तेच आहे. मी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर तुला माहित असून तू जर दिले नाहीस तर तुझ्या डोक्याची हजार शकले होतील आणि तुझ्याच पायावर पडतील - आणि हो जगातला कुठलाही प्लास्टिक सर्जन त्यांना पुन्हा एकत्र करू शकणार नाही!" आणि वेताळाने गोष्ट सांगायला सुरुवात केली.

अडव्हेंट हेल्थच्या ३ मजली इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरच्या ऑफिसात अविनाश बसला होता. त्याच्या पुढे ३ जणं बसलेले होते. म्हटले तर साधीच केस होती आणि म्हणले तर अवघड. आजच्या काळात अशी केस काही नवी नव्हती. समोर बसलेली पेशंट ८५ वर्षांची होती. पोटात दुखत होते म्हणून मग प्रायमरी केअर डॉक्टरने CT स्कॅन केले आणि त्यात गर्भाशय मध्ये ऍबनॉर्मलिटी दिसली. मग त्याने तिला अविनाशकडे पाठवले. अविनाश गायनॅकचा कॅन्सर स्पेशालिस्ट होता. अश्या केसेस त्याने अनेक वेळा पहिली होत्या. त्याने PET ऑर्डर केले होते आणि आता ती पेशंट आणि तिचा मुलगा आणि मुलगी त्याला भेटायला आले होते. PET स्कॅनमध्ये गर्भाशयाचा कर्करोग झाल्याचे दिसत होते आणि काही लिम्फ नोड्स पण वाढले होते आणि त्यात वाढलेली मेटाबॉलिक ऍक्टिव्हिटी पण दिसत होती. म्हणजे गर्भाशयाचा कर्करोग झाला असून तो थोडा पसरलेला दिसत होता. म्हणजे सर्जरी तर करावी लागणारच, पण मग किमो पण द्यायला लागणार, अविनाशने विचार केला. पेशंटचे वय ८५ आणि वजन ८५ पाऊंड, थोडी जास्त रिस्क होती, पण अविनाशने अश्या शस्त्रक्रिया अनेक वेळा केल्या होत्या आणि हल्ली छोटे इन्सिजन करून अश्या शस्त्रक्रिया करण्यात तो पटाईत होता. आता हे सर्व त्यांना समजावून सांगायचे आणि सेक्रेटरीला शस्त्रक्रिया स्केड्यूल करायला सांगायचे. पेशंट चायनीज होती आणि फक्त मँडरिन बोलत असे, म्हणून त्याने स्टॅण्डवर असलेला इंटरप्रिटर स्वतः जवळ ओढला. तो त्यावरून इंटरप्रिटरला कॉल करणार तेवढ्यात तिचा मुलगा बोलला, "डॉक्टर काय निदान असेल ते आम्हाला सांगा, आम्ही तिला आमच्या भाषेत समजावून सांगू."

त्याने त्या मुलाला आणि मुलीला PET स्कॅन दाखवले आणि आपला प्लॅन सांगितला.

म्हणजे ऑपरेशन करायला लागणार आणि मग किमो द्यावी लागेल तर -मुलीने प्रश्न विचारला'.

"Yes, that is the best option for her disease."

"पण आम्हाला तिने ऑपरेशन करावे असे वाटत नाही. तिचे वय आणि वजन पाहता ती ते सहन करू शकणार नाही ."

"ठीक आहे आपण तिलाच विचारू, की तिला काय वाटते आहे ते - नाही म्हणजे तुमचे मत नक्कीच महत्वाचे, पण तिला काय वाटते ते अधिक महत्वाचे आहे -Her decision is the final-"

"नाही नाही, आम्हाला दोघांना हे निदान तिला कळावे असे वाटत नाही. तिला जर हे निदान कळले तर, ती आशा सोडून देईल आणि हे जग सोडून निघून जाईल."

"पण मला माझे निदान तिला सांगणे जरुरीचे वाटते - आणि तिनेच काय ट्रीटमेंट घायची का नाकारायची हे ठरवायचे आहे -"

मुलगा म्हणाला, “पण आमच्या कल्चरमध्ये आई -वडिलांची काळजी आम्हीच घेतो आणि त्यांची मेडिकल डिसिजन आम्हीच घेतो. तिला जर कॅन्सरचे निदान सांगितले तर ती हाय खाऊन लगेचच मरेल, त्यामुळे तिला कॅन्सरचे निदान सांगू नका. आणि ह्या वयात आणि हिच्या ह्या तोळामासा प्रकृतीत सर्जरी आणि किमो शक्यच नाही.”

“तर राजा”, वेताळ म्हणाला, अविनाशने काय उत्तर दिले असेल? तुला जर हे उत्तर माहित असून तू दिले नाहीस तर तुझ्या डोक्याची हजार शकले होतील आणि मेयो क्लिनिक पण त्यावर काहीही ट्रीटमेंट देऊ शकणार नाही.”

वेताळाने गोष्ट पुरी केली होती.

विक्रमाने विचार केला. उत्तर देणे भाग होते. पुढची अमावस्या वीकेंडला येत होती - तो विकेंड गेला - त्याने विचार केला.

'अमेरिकेत पेशंटला स्वतः निर्णय घेण्याचा अधिकार असतो, मेडिकल सरोगेट डिसिजन घेऊ शकतो पण ते जेव्हा पेशंट स्वतः डिसिजन घेण्याच्या परिस्थितीत नसतो तेव्हा. म्हणजे तो बेशुद्ध असतो किंवा विस्मृती झालेला असतो. पण पेशंट जातो आणि मुले बाळे मागे राहतात. त्यांना अपसेट करण्यात काहीच अर्थ नाही. त्यामुळे अविनाशने ट्रान्स्लेटरच्या मार्फत मोघम माहिती देऊन पेशंटला मुलांच्या निर्णयाची माहिती द्यावी आणि रेकॉर्ड्समध्ये दोघांच्या निर्णयाची नोंद करावी. सर्जरी आणि किमो देऊनही ही ८५ वर्षाची बाई फार जगेल असे वाटत नाही आणि सर्जरीत काही झाले तर-त्यामुळे हाच निर्णय मला योग्य वाटतो. '

विक्रमादित्याचाचे बोलणे ऐकून वेताळ हसला आणि पुन्हा हताश होऊन सुटून झाडावर लटकू लागला - पुढच्या अमावाश्येची वाट पाहत.

- **डॉक्टर शिरीष कीर्तने**, लॉंगवूड फ्लोरिडा

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका




## आकाशी झेप घे रे पाखरा

**आई :** अग वसुधा काय झालं ? मोहन का रडतो आहे?

**वसुधा:** आई अहो चपलेवर पाय अडखळून पडला तो. खोच पडली आहे गुढघ्याला.

**आई:** अरे बापरे. विद्याधर, अरे स्पिरिट आणि कापूस घेऊन ये आधी. माझं छोटू बाळ ते. खूप दुखते आहे का मनूला आमच्या?

**मोहन :** आजी ...

**वसुधा :** आई मी फर्स्ट एड किट आणते. तुम्ही ह्याला कडेवर घ्या. घाबरला आहे.

**विद्याधर:** मनू अरे ते बघ आलामंतर कोलामंतर छू ...

आई, बाबा व आजीच्या गोड़ पाप्यांनी त्या गुडघ्याच्या जखमेवर कोमल असे प्रेमाचे मलम लावले. तेवढ्यात शेजारची मीनू आली मोहनला शोधात आणि ते दोघे खेळायला पळून गेले.

**आई:** शिस्तीचे शास्त्र अवगत नसावे त्यांना.

**विद्याधर:** आई शिस्तीचे काय आले शास्त्र? Discipline is Discipline. Follow करता आलं की झालं. कॉम्प्लेक्स काय आहे त्यात? आम्ही नाही follow केले का नियम?

**आई :** बरोबर आहे. तू आम्ही लावलेले नियम पावलो पावली follow केलेस. वसुधाने पण तिच्या घरचे नियम follow केले म्हणून तर तुम्हाला दोघांना सांगावे लागले नाही की पायताण सुरक्षित जागी काढावी.

**विद्याधर:** सुनबाई, तू आणि तुझ्या सासूबाई ते शास्त्र डिसकस करा, मला कामावर जायला उशीर होईल. डब्बा देतेस ना?

**आई:** वसुधा अगं गेला का विद्याधर? वासू काका आठवण काढत होते.

**वसुधा:** मी नमस्कार करून येते त्यांना.

आमची वरात निघाली घरातल्या घरात. सगळे आम्ही एक एक करून वासू काकांना नमस्कार केला. मुलं बागेत खेळायला गेली. आम्ही काका व बाबांबरोबर चहा घ्यायला बसलो. इकडची तिकडची काही चर्चा झाली मग काका मूळ मुद्द्यावर उतरले. त्यांचा मुलगा नोकरीला लागला होता आता प्रपंच मार्गास लागावे असे त्यांचे मत काही केल्या त्याला मान्य नाही. काहीही बोलले तरी तो विरोध भावाने घेत असल्याचे समजले. काकांचे डोळे पाणावले होते. आम्ही कुठे

चुकलो हा प्रश्न त्यांना भंडावून सोडत होता. तुम्ही विद्याधरला कसं प्रपंचात शिरण्यास प्रवृत्त केलत?

**बाबा:** अरे वासू, मी नाही का ते शक्य केलं. तू तर विद्याधरला लहानपणापासून ओळखतॊस. कोणाच्या कहाण्या त्याला मान्य नाहीत. स्वतः करणार तेव्हाच मान्य करणार नाही तर धारेवर धरणार आम्हाला.

**वासू:** कला ताई, अगं कसं समजावू मी विनीतला. काहीही बोललो आम्ही तरी - I will think about it. असं उत्तर देतो आणि पुढे काही ऐकत नाही.

**आई:** या वयात Logical Mind बरोबर झुंझ सुरु असते. जो पर्यंत तो धागा धरता येत नाही तो पर्यंत पुढे जाता येत नाही.Interference आणि Interjection यातला भेद कळला की आपला मुद्दा अटकेपार सहज नेता येतो.

**वासू:** ताई मला समजावून सांग कसा ओळखायचा तो भेद.

**बाबा:** माया ताई.... राणी तुम्ही सगळे आत जाऊन खेळा. ढग आले आहेत. पाऊस येईल. परत घरात चिखल नको.

**आई:** शिस्तीचं शास्त्र असे आहे. मानव देह जन्मतः उपजत ज्ञान घेऊन जन्माला आहे. अर्थात भूक लागली की रुदन, भूक भागवण्यासाठी दुग्ध प्राशन, पचलेल्या अन्नाचा त्याग केल्यावर स्व संवर्धनासाठी केलेले रुदन अश्या अनेक क्रिया या उपजत असतात. प्रत्येक बाळ जगाच्या पाठीवर कुठे ही जन्मले तरी हे ज्ञान घेऊन जन्मते. हळूहळू इतर गोष्टी ते बाळ अवगत करते. अर्थात अमुक एक क्रिया त्याचे मन मान्य करते आणि त्या मान्यते नंतर बाळ पण ती क्रिया करू लागते. उदाहरणार्थ दूध पिणे ही क्रिया आई च्या स्तनातून ग्रहण करणे हे उपजत ज्ञान तर बाटलीतून ग्रहण करणे हे आकलनीय ज्ञान. पहिल्यांदा बाटली दिली तर ते बाळ धुडकावून लावते. मग आपण वेगे वेगळे प्रयत्न करून बाळाला त्यात दूध आहे हे ज्ञात करून देतो. त्याच्या मते ते ग्रहण करणे मान्य होते मगच ते बाळ दूध बाटलीतून पिते. अर्थात मनाची मान्यता अतिशय महत्वाची.

**वासू:** अस का?

**बाबा:** वासू अरे आपलं हीत साधता येणं म्हणजे संवर्धन करणे हे उपजत कर्म. जीव हा नेहमी स्वतः ला जपतो. पण तू आमच्या घरच्या scientist मॅडम कडून तपासून घे तत्त्व.

**आई:** वासू नको लक्ष देऊ त्यांच्या नकट्या गप्पा. त्यांना व्यवस्थित माहित आहे. एक चान्स सोडत नाहीत. जरी विद्याधरचा पिच्छा मी पुरवला तरी मूळ तत्त्वबोध ह्यांनीच मला समजावला होता. प्रथम मी तो अमान्य केला होता. काही कालांतराने मला तो मान्य झाला आणि मी पण त्याच मार्गाने पुढे गेले.

बाबांच्या चेहऱ्यावर विजयी स्मित हास्य उमटले.

**वासू:** ताई तू म्हणाली Interference आणि Interjection यात भेद आहे. तो कसा ओळखायचा?

**आई:** तुम्ही सांगता का मी सांगू?

**बाबा:** वासू तत्त्व अर्थात Principle अर्थात जे सिद्ध आहे - Proven. म्हणजे ते योग्य रित्या केल्यास हवे तसे परिणाम मिळवता येतो. आपले आयुष्य ४ भागात विभागता येते. बालावस्था - ball park around जन्मापासून ८-१० वर्ष - ह्या अवस्थेत आई वडील हे जे काही शिकवतात ते सहज मान्य होते. कारण बालक पण शिकत असते. सर्व काही पहिल्यांदा अनुभवत असते. तू जसा चालतोस तसे ते पण चालते. आजोबा अडखळत चालतात तर बाळ पण त्यांच्या सारखे चालून पहाते. काही काळाने बाळ ठरवते की आजोबा जे चालतात त्या पेक्षा बाबा चालतात ते efficient आहे आणि दोन्ही चालीत ते भेद करते आणि त्याला जी योग्य वाटते ती चाल पकडते. मग येते कुमारावस्था - इथे आपले बोध पूर्वी प्रमाणे सहज मान्य होत नाहीत पण आपण थोडा जोर लावला तर ते मान्य करवता येतात. या नंतर यौवन किंवा युवा अवस्था - इथे आपण काहीही म्हणालो तरी त्याची पारख केल्या शिवाय मान्यता नाही. इथे Interference हा प्राधान्याने दिसतो. आई तू मला सांगू नकोस. मी माझे काय ते करेन. झुंज असते स्वतः शी. आपली conclusions त्यांना नको असतात. त्यांना स्वतः ते conclusion पर्यंत पोहोचायचे असते. फार महत्वाची आहे हि स्थिती. त्यांना प्रयत्न आणि चुका करू द्याव्यात. ते आपापले शिकतात, स्वतः चे संवर्धन करणे. You have to let them fly...

**आई:** माया.. विनू ... मनू ... मीनू ... अरे इकडे या सगळे. पाऊस आला. घरात या आधी.

सर एकदम जोरात अली. मुलं भिजली. विनूच्या तोंडावर आणि कपड्यांवर चिखलाचे गोळे आणि मनूच्या डोक्यावर! देवा! १० मिनिटे नजरेआड झाली की काहीतरी उद्योग करतात दोघे. मी व आई पटकन त्यांना घेऊन आत गेलो.

**बाबा:** Inference हा प्रौढावस्थेत बलवत्तर असतो. वसुधा ला हे माहित होत की पाऊस पडणार आहे आणि मुलं ती मुलं. त्यांना वेळेत आत आणले नाही तर काम वाढणार आहे. खरं तर आपल्या गप्पांमध्ये तिचा काही सहभाग नाही. उठून मुलांना आत नेता आले असते. मी

तसा मार्ग निदर्शनास आणला होता. तिने तो दुर्लक्षित केला. अर्थात माझे conclusion तिला मान्य नव्हते. आता जेव्हा पाऊस पडला आणि मुलं चिखलात लोळून घरात आली आणि तिला जास्तीचे काम पडले तेव्हा तिने स्वतः तेच conclusion draw केले जे मी अनुभवाने प्रथमदर्शी सांगितले होते. Inference. तो कसा ते समजावतो. येऊ दे वसुधाला.

दहा पंधरा मिनिट मुलांच्या आवरा आवरीत गेले. मी चहाचे कप न्यायला आले

**बाबा:** वसुधा अगं झाली का मुलांची second आंघोळ?

**वसुधा:** हो बाबा. विनू कठीण आहे. मनू ला मूर्ती करतो असे म्हणून त्याला बसवून कुंडीतली माती काढून त्याच्या डोक्यावर टाकत बसला होता. सगळी मोरी धुवावी लागली त्यांच्या आंघोळीनंतर.

**बाबा:** बरं. असो. आता पुढच्या वेळी त्यांना आधीच आत घेऊन जा. उगाच तुझा पण कामाचा व्याप वाढणार नाही.

**वसुधा:** हो बाबा. तुम्ही हाक मारली तेव्हाच मला त्यांना आत आणायला हवं होत. आता पुढच्या वेळेस मी लक्षात ठेवेन.

**बाबा:** Interjection. ते घटना घडल्यानंतर retrospective approach ने द्यायचे म्हणजे ते त्वरित मान्य होते. विनीत ला Interference नको असेल. त्याला Interjection मान्य होईल कदाचित. कला ने विद्याधर ला प्रसंगानुरूप आम्ही नवरा बायको एकमेकांना कशी साथ दिली, आनंदाचे क्षण, विरहाचे क्षण, प्रेमाचे क्षण, समर्थनाचे क्षण, असे विविधरंगी आयुष्याचे पाडाव आपल्या सांगाती बरोबर कसे अनुभवले हे अलगदपणे दर्शवत गेलो आणि शेवटी विद्याधर च्या मनात वसुधा रूपी जीवन संगिनीने कायमचे घर केले.

*हा लेख श्री माधवनाथ महाराजांच्या श्री माधवनाथ दीपप्रकाश मधील तत्त्वबोधावर आधारित आहे. ह्या अध्ययनातून तुमच्या अंतरंगात काही प्रश्न निर्माण झाल्यास मी ते ऐकण्यास उत्सुक असेन.*

**मूळ तत्त्वबोध - श्री बाबा उर्फ श्री मंगलनाथ महाराज - मिटमिटा छत्रपती संभाजीनगर**

- **सौ. सुलक्षणा कुलकर्णी,** शिकागो, इलिनॉय

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## योग का योगा?

ह्यांच्यासारखं उच्चारलं नाही तर नाकं मुरडणं भोगा
पण ह्यांना कोणी अधिकार दिला "योग"चं करण्या योगा?
योग म्हणजे coincidence म्हणे असं यांना वाटायचं
Confusion टाळण्यासाठी "योगा"च केलं कायमचं
Treadmill तर ना केली त्याची, हे आणखी समर्थनाचं
गुलाबाचं नाही का शेक्सपियरचं, असं वर पुष्टीचं
आपण म्हणतो जाऊ द्या कुठे वाद घाला
टाळायची वादावादी तर तोंडी लागणं सोडा
सकारात्मक सदा होऊन त्याप्रमाणे चाला
मान्यता मिळतीय जगभर तर कशाला घाला खोडा
नावे छोटी करणे मुरले यांच्या रक्तात
शब्द असतील विदेशी तर पिळले याच चर्कात
गावी नसे यांच्या असंतोष पसरला भक्तांत
समजूतदार आपण बघतो संगती दोन्ही तर्कात
उठसूठ, टीकास्त्र पुरातनावर कावलं
आरोग्याचं शास्त्र होतं चंद्रासारखं भागलं
क्रेडिट आम्हाला दिलंत यातच सगळं पावलं
तुम्ही सुरु केलंत आणि लोण स्वदेशी लागलं

- **रवि गाडगीळ,** नॉर्थ एडिसन, न्यू जर्सी



# वाराणसी

आम्ही युनायटेड स्टेट्सच्या उत्तर-पूर्व (North-East) भागात राहतो. इथल्या कडक हिवाळ्यामुळे गरम हवेच्या प्रदेशात --फ्लोरिडा, कॅलिफोर्निया, किंवा भारतात राहणे पसंत करतो. सन २०२५ च्या हिवाळ्यात आमच्या नातीच्या --मेघनाच्या इच्छेनुसार आम्ही भारतात जाण्याचे ठरविले. तिथे गेल्यावर इंदूर व वाराणसी शहराला भेट देण्याचे योजले. आमची मुलगी मोना व मेघना ह्या फक्त दोन आठवड्यांसाठी तर आम्ही दोघे तीन आठवड्यासाठी !

इंदोर वरून वाराणसीला जाण्यासाठी नवी दिल्ली वरून जावे लागते --डायरेक्ट flight नाही! नवी दिल्लीच्या विमानतळावर ऐरो-ब्रिज न मिळाल्यामुळे बसने टर्मिनल बिल्डिंग गाठावी लागली. त्या बसमध्ये हॉंगकॉंग, चीनचे दोन तरुण भेटले. एकाचे नाव होते रिचर्ड तर दुसऱ्याचे होते ब्रायन! ते काठमांडू, नेपाळहुन भारतात येत होते. त्यांना मी दक्षिण आशियातील गैरशिस्तीबद्दल विचारले. तेव्हा त्यांनी उत्तर दिले, "त्याकडे दुर्लक्ष करायचे त्या वातावरणाशी जुळवून घ्यायचे!" मला त्यांचे म्हणणे पटले. मी पण त्याप्रमाणे वागायचे ठरवले, त्यामुळे मला तिथल्या गर्दीचा त्रास जाणवला नाही!



वाराणसी हे जगातील सर्वात जुन्या शहरापैकी एक आहे. जवळच्या सारनाथमध्ये गौतम बुद्धाने आपले पहिले प्रवचन दिले --जवळ जवळ ५०० वर्षे ख्रिस्त जन्माअगोदर ! आठव्या शतकांत आदी शंकराचार्य यांनी शिवाची भक्ती ह्या शहरात स्थापन केली. पुढे सिल्क विणकाम, कारपेट बनवणे, असे उद्योग विकसित झाले. इथे नंतर भारत हेवी इलेक्ट्रिकल्स तसेच बनारस लोकोमोटिव्ह वर्क्स असे नवीन उद्योग स्थापन झाले.

वाराणसी हे नाव गंगेच्या दोन उपनद्या -वरुणा व अस्सी -ह्यामध्ये वसलेले म्हणून वाराणसी पडले. महाभारतात ह्या शहराचा उल्लेख काशी म्हणून केलेला आहे. संस्कृतमध्ये कास म्हणजे चकाकणे! हे चकाकणारे शहर विद्येचे माहेरघर म्हणून गौतम बुद्धाच्या काळापासून प्रख्यात आहे. पूर्वीपासून हे शहर तीर्थकर काशी म्हणून ओळखतात वाराणसीमधील शिवमंदिर भारतभर विख्यात आहे. तिथले गंगेचे निरनिराळे घाट प्रसिद्ध आहेत. त्यात मोडतात दशाश्वमेध घाट, पंचगंगा घाट, मणिकर्णिका घाट व हरिश्चंद्र घाट. त्यातील शेवटचे दोन मर्तिकांसाठी ओळखले जातात.

बनारस शहर फार पूर्वीपासून शैक्षणिक तसेच संगीताचे केंद्र म्हणून प्रसिद्ध आहे. हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतातील बनारस घराणा इथलेच! प्रसिद्ध उर्दू/हिंदी लेखक मुन्शी प्रेमचंद तसेच प्रसिद्ध शहनाई वादक बिस्मिल्ला खान हे पण ह्या शहरातील! जोनाथन डंकन ह्यांनी १७९१ मध्ये स्थापन केलेले भारतातील सर्वात जुने संस्कृत विद्यापीठ --बनारस संस्कृत कॉलेज याच शहरात आहे. आनी बेसनन्ट (Annie Beasant ) यांनी सन १८९८ मध्ये सेंट्रल हिंदू कॉलेज स्थापन केले. त्यानंतर तिने व पंडित मदन मोहन मालवीय यांनी 'बनारस हिंदू युनिव्हर्सिटी' ची स्थापना सन १९१८ मध्ये केली. महात्मा गांधींच्या असहकार तत्वानुसार काशी विद्यापीठ सन १९२१ मध्ये स्थापन झाले. पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री त्या विद्यपीठाचे पदवीधर होते .

भारतीय पुराणानुसार वाराणसी स्थापन केली शिवाने! शिवा खेरीज ब्रह्मा व विष्णू हे हिंदू देवतांपैकी प्रमुख देव आहेत. शिव व ब्रम्हा ह्यांच्या युद्धांत शिवाने ब्रह्मदेवाचे मुंडके, त्यावेळच्या प्रथेनुसार, आपल्या हातात घेतले. वाराणसीला आल्यावर शिवाच्या हातून ते मुंडके निसटले व खाली पडून नाहीसे झाले. त्यामुळे वाराणसी हे अतिशय पवित्र स्थान बनले.

सन २०१४च्या उत्खननात ख्रिस्तपूर्व ८०० वर्षातील गोष्टी आढळल्या. आणखी काही वर्षांनी रामनगर येथे झालेल्या उत्खननात जवळ जवळ १८०० ख्रिस्तपूर्व काळातील वस्तू आढळून आल्या. त्यानुसार शहर त्याच्याही आधीच्या काळापासून अस्तित्वात असावे असा अंदाज आहे. चिनी पर्यटक- हुएन त्सिंग (Hiuen Tsing ) हा इसवी सन पूर्वी ८३५ मध्ये इथे येऊन गेला. त्याच्या मते शहरात ३० मंदिरे होती.

सन १०३३ मध्ये पहिले इस्लामी आक्रमण मोहंमद गझनीच्या सरदाराने केले. त्याच्या सैनिकांनी शहरात लुटालुट करून शिव मंदिराचा थोडा विध्वंस केला. त्यानंतरच्या वर्षात मलिक अफझल अलावीने हल्ला केला. त्यात त्याचा पराभव झाला. परंतु काही मुस्लिम सैनिक आसपासच्या खेड्यात स्थायिक झाले. आजचे विणकर हे त्यांचे वंशज होत! सन ११९४ मध्ये मोहंमद घोरीने ह्या शहरावर हल्ला करून ते बेचिराख केले. नंतरच्या काळात अकबर आणि औरंगझेब ह्यांनी हल्ले करून मंदिराचा विनाश केला. परंतु १८व्या शतकात मराठा व भूमिहार सरदारांनी मंदिराचे पुनर्निर्माण केले. इथे नमूद करावेसे वाटते की पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या तीन संसदीय निवडणुकांत वाराणसी मतदारसंघातून निवडून आलेले आहेत!


आमच्या guide ने आम्हांला एका कपड्याच्या दुकानात बसवले-- तिथल्या मंदिराच्या पुजाऱ्याची वाट बघत ! तिथे जवळचे सेलफोन, wallet वगैरे काढून एका लॉकरमध्ये ठेवले त्यामुळे मंदिराचे फोटो काढता आले नाहीत. त्या पुजाऱ्याने /पंड्याने आम्हाला VIP दर्शन घडविले.

जवळची ज्ञानवापी मशिद कोर्टाच्या कचाट्यात अडकल्यामुळे मंदिराभोवती पोलीस बंदोबस्त कडक होता. त्यातून वाट काढून आम्ही काशी विश्वेश्वर मंदिरातील शंकराच्या पिंडीचे दर्शन घेतले. अर्थात, काशीच्या पंड्याला चांगलीच दक्षिणा द्यावी लागली. आमच्या मुलीने--मोनानेही त्याला भरपूर दक्षिणा दिली!

बनारस शहरांत आम्ही तीन दिवस (४ रात्री) राहण्याचे ठरवले, कारण तिथून अयोध्या काही तासाच्या अंतरावर आहे असे ऐकिवात होते. परंतु तिथे गेल्यावर उलगडा झाला की तिथे जायला चार तास लागतात .

तसेच परत येताना दाट धुकेही असते. परतीच्या प्रवासात अपघाताचा धोका टाळण्यासाठी पत्नीने --शीलाने विरोध केला. हॉटेलचे ड्राइवर सांगत होते की नेहमीचाच रस्ता आहे, अपघात होत नाहीत. तिला नाराज करून जाण्यात आम्हाला रस नव्हता. त्यामुळे अयोध्येला जाण्याऐवजी ऐवजी सारनाथला जाण्याचे ठरवले .

सारनाथ वाराणसी शहरापासून उत्तर-पूर्व दिशेला काही मैल अंतरावर आहे. तेथे गौतम बुद्धाने, स्वतःला ज्ञान प्राप्त झाल्यावर, इथे पहिले प्रवचन दिले. ते साल होते इसवी सनापूर्वी ५२८! त्यावेळेस हरणांची संख्या बरीच होती. आता तर औषधाला बघायला मिळत नाहीत ! इथून पुढे बुद्धाने आपल्या धर्माचा प्रचार करायला सुरुवात केली. प्रख्यात अशोक स्तंभ इथलाच. हा स्तंभ भारताच्या Supreme Court तसेच राष्ट्रीय ध्वजावर बघायला मिळतो.



वाराणसीला यायचे आणि गंगा आरती बघायचे नाही म्हणजे काय? एका सायंकाळी त्यासाठी दशाश्वमेध घाटावर जाण्याचे ठरवले. नदीतील नौकाविहारासाठी आमच्या चौघांसाठी एक लहान बोट ठरवली. पुढे ती एक चूक ठरली. गंगा आरती बघण्यासाठी मोठ्या बोटीवर नंतर जावे लागले. तिथे वरच्या मजल्यावर बसण्यासाठी खुर्च्या ठेवलेल्या होत्या. एकंदर सात ब्राह्मण हातात तबक घेऊन आरती करताना दिसले. हे दृश्य शब्दात वर्णन करणे कठीण आहे, ते प्रत्यक्ष बघणे आवश्यक आहे! आरतीची चाल 'जय जगदीश हरे.... ...'सारखी मला वाटली. आयुष्यात ही गंगा आरती, एकदा तरी बघायला जायला पाहिजे!

गंगेच्या अनेक घाटांपैकी मणिकर्णिका हा मर्तिकांसाठी फार प्रसिद्ध घाट आहे. तिथे प्रेताला अग्नी दिल्यावर मृतात्म्याला मोक्ष मिळतो अशी समजूत असल्यामुळे अनेक आजारी माणसे मृत्यूची वाट बघत घाटावर बसतात. हा प्रत्येकाचा श्रद्धेचा विषय आहे.

बनारसला जायचे आणि हिंदू युनिव्हर्सिटीला भेट द्यायचे नाही म्हणजे काय? विश्वविद्यालयाचे स्वतःचे शंकराचे मंदिर आहे असे कळले. श्री विश्वनाथ मंदिर युनिव्हर्सिटीच्या मध्यभागी होते. त्याची स्थापना मार्च १९३१ मध्ये झाली. ह्या विश्वविद्यालयाचे वैशिष्ट्य म्हणजे



हे राहते (Residential ) असल्यामुळे इथे १८००० विध्यार्थ्यांसाठी ६५ हॉस्टेल्स आहेत -- ! एकंदर विद्यार्थी ३००००.. ही आशियातील सर्वात मोठी राहती युनिव्हर्सिटी आहे!

पुढच्या वेळेस प्रथम अयोध्येला जाऊन, तिथे मुक्काम करून, श्रीराम मंदिर बघून, मग वाराणसी यायचे असा विचार करून मुंबईचे विमान पकडले!

**- सुधीर शं. कुलकर्णी**




## देवशयनी एकादशी: अंतर्मुखतेचा उत्सव

चांद्रमासातील शुक्ल आणि कृष्ण पक्षातील अकरावी तिथी म्हणजे 'एकादशी'. वैदिक कालगणनेनुसार आणि खगोलशास्त्रीय दृष्टिकोनातून विचार केल्यास, या दिवशी पृथ्वी आणि सौरमालेत एक विशिष्ट celestial alignment घडून येत असते. या संदर्भात सद्गुरू जग्गी वासुदेव सांगतात की, या विशिष्ट खगोलीय बदलांमुळे मानवी शरीरातील ऊर्जा आणि चेतना नैसर्गिकरीत्या ऊर्ध्वगामी (वरच्या दिशेने) होतात. या काळात मानवाची ग्रहणक्षमता उच्चतम पातळीवर असल्याने, या दिवशी केलेला उपवास आणि ध्यान हे केवळ धार्मिक कर्मकांड राहत नाहीत; तर ती शरीराची जैविक लय वैश्विक लयीशी जोडणारी एक श्रेष्ठ वैज्ञानिक साधना ठरते. आपल्या भौतिक इंद्रियांना आवरून अंतःकरणाला आत्मस्वरूपाकडे वळवणे, हाच या व्रताचा खरा हेतू आहे.

हाच इंद्रिय निग्रह नेमका कसा असावा, याचे मार्गदर्शन करताना संत ज्ञानेश्वर माऊलींनी 'ज्ञानेश्वरी'मध्ये उपवासाचे अत्यंत सुंदर दार्शनिक मर्म सांगितले आहे. चैतन्य महाराज देगलूरकर माऊलींच्या या विचारांवर प्रकाश टाकताना स्पष्ट करतात की, ज्याप्रमाणे एकादशीच्या दिवशी एखादा निष्ठावान व्रती अन्नाचा विचारही मनात आणत नाही आणि आपली बुद्धी पूर्णपणे ईश्वराच्या ठिकाणी लीन ठेवतो, अगदी त्याचप्रमाणे साधकाने सांसारिक विकार आणि वासनांचा त्याग करून आपली बुद्धी केवळ परमात्म्याकडे स्थिर करायला हवी. एकादशी व्रत म्हणजे केवळ शरीराने अन्न सोडणे नसून, मनाला विषयांतून काढून परमार्थाकडे नेणे हा आहे. व्रत करणारा साधक जसा अत्यंत निग्रहाने आणि ओठाला पाण्याचा थेंबही न लावता आपला नियम पाळतो, तसाच विठ्ठलचरणी आपला भक्तीचा आणि आत्मसंयमाचा भाव दृढ असायला हवा, हेच या व्रताचे मुख्य उद्दिष्ट आहे.

वर्षभरातील चोवीस एकादशींमध्ये आषाढ महिन्यातील शुक्ल पक्षातील एकादशीला 'महाएकादशी' किंवा 'देवशयनी एकादशी' म्हणून जे अनन्यसाधारण महत्त्व आहे, त्यामागे हेच आत्मसंयमाचे विज्ञान आहे. या पवित्र दिवसापासून सृष्टीचे पालनकर्ते भगवान श्रीहरी विष्णू चार महिन्यांसाठी 'योगनिद्रेत' जातात, ज्याला आपण 'चातुर्मास' म्हणतो. डॉक्टर शंकर अभ्यंकर यांच्या व्याख्यानानुसार, आषाढ महिना हा खऱ्या अर्थाने या आंतरिक भक्तीचा पाया रचणारा काळ आहे. या काळात सृष्टीतील बाह्य धावपळ किंवा व्यावहारिक प्रपंचाला काही काळ विराम देऊन, मानवाने स्वतःच्या आंतरिक सत्याचा शोध घ्यावा आणि परमात्म्याकडे वळावे असा हा निसर्गाचाच संकेत आहे. ऋतूचक्राच्या दृष्टीनेही आषाढ महिना नवनिर्मितीचा आणि मुसळधार पावसाचा असतो. पावसाच्या या सरी जशा सुकलेल्या धरणीला तृप्त करतात, तसेच या काळात केलेले हरिनाम भक्ताच्या व्याकुळ मनाला आत्मिक शांततेने तृप्त करते.

आषाढ महिन्यातील हीच अंतर्मुखता आणि विठ्ठल भेटीची सात्विक ओढ जेव्हा प्रत्यक्ष कृतीत उतरते, तेव्हा त्याचे रूपांतर पंढरीच्या अथांग वारीमध्ये होते. वारी म्हणजे केवळ पायी प्रवास नसून, प्रत्येक पाऊलासोबत 'मी - तू' पणाचा अहंभाव गाळून प्रपंचाकडून परमार्थाकडे जाण्याची ती एक जिवंत आणि प्रवाही साधना आहे. संत तुकाराम महाराज आणि संत नामदेव महाराज यांच्या अभंगांचा गाभाही हाच आहे की, एकादशीच्या दिवशी सर्व इंद्रिये विठ्ठलचरणी अर्पण करून नामात रंगून जाणे म्हणजेच खरा उपवास आहे. केवळ शारीरिक पातळीवर अन्न न घेणे म्हणजे उपवास नव्हे, तर चित्त एकाग्र करून मनाला भगवंताच्या समीप नेणे आणि नामस्मरणाने मुक्तीचा मार्ग सुकर करणे हाच संतांच्या शिकवणीचा मूळ हेतू आहे.

हा संपूर्ण काळ स्वतःचे अस्तित्व विसरून ब्रह्मैक्यभावाने भगवंताशी एकरूप होण्याचा आहे. या आषाढी एकादशीच्या मंगल समयी आपणही आपल्या मनातल्या 'मी'पणाचा आणि अहंभावाचा त्याग करूया. डोळे उघडले की समोर विठूमाऊली दिसावी आणि मिटले की मनात तिचेच अखंड चिंतन व्हावे, हाच खरा परमार्थ आहे. चला, या पवित्र दिवशी नामस्मरणाच्या गजरात स्वतःला संपूर्णपणे हरवून टाकूया आणि विठ्ठलमय होऊया.

बोला पुंडलिक वरदे हरी विठ्ठल, श्री ज्ञानदेव तुकाराम, पंढरीनाथ महाराज की जय!

**- मृणाल बुजोणे**



## दिवाळी अंक आवाहन २०२६

नमस्कार मंडळी,

बीएमएम वृत्तातर्फे प्रकाशित होणाऱ्या दिवाळी अंकाचे हे गौरवशाली ४३ वे वर्ष आम्ही पुन्हा एकदा दिमाखात साजरे करत आहोत. या निमित्ताने, उत्तर अमेरिका तसेच भारतातील सर्व मराठी लेखक, कवी, चित्रकार, व्यंगचित्रकार आणि साहित्यप्रेमींना ‘बीएमएम वृत्त दिवाळी अंक २०२६’ साठी दर्जेदार आणि वैविध्यपूर्ण साहित्य पाठविण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

आपले लेख, कथा, कविता, लघुनिबंध, नर्म विनोद, चुटके, प्रवासवर्णन, पाककृती तसेच कलात्मक रेखाचित्रे आम्हाला अवश्य पाठवावीत. या अंकाला अधिक समृद्ध, वैविध्यपूर्ण आणि बहुरंगी बनविण्यासाठी आपले मौलिक योगदान अत्यंत मोलाचे आहे. त्यामुळे आपली सर्जनशील अभिव्यक्ती व कल्पकता जगभरातील वाचकांसमोर सादर करण्याची ही एक अनमोल संधी आम्ही आपणांस उपलब्ध करून देत आहोत.

**साहित्य पाठवण्याची अंतिम तारीख: ३० ऑगस्ट २०२६**

**अपेक्षित साहित्य व मर्यादा:**

- कथा / लेख / निबंध: १००० शब्द (फोटोशिवाय)
- कथा / लेख / निबंध: ८०० शब्द (फोटोसह)
- चुटके: १५० शब्द
- पाककृती / संकीर्ण माहिती: ३०० शब्द
- कविता: २० ओळी
- चित्रे / व्यंगचित्रे: उच्च प्रतीची डिजिटल प्रत

**मार्गदर्शक सूचना:**

- साहित्य स्वतःचे, मूळ मराठी भाषेत असावे आणि पूर्वप्रकाशित नसावे.
- अनुवादित किंवा रूपांतरित साहित्य असल्यास मूळ लेखकाचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे.
- निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.
- आवश्यकतेनुसार संपादकीय बदल करण्याचा अधिकार संपादकांकडे राखीव आहे.
- निवड न झालेले साहित्य परत पाठवले जाणार नाही.
- लेखकांनी नाव, संपूर्ण पत्ता, फोन नंबर आणि ई-मेल पत्ता नमूद करणे आवश्यक आहे.

**साहित्य पाठवण्याची ई-मेल:** vrutta@bmmonline.org

**ई-मेल विषय:** “Diwali Ank 2026”

**सूचना:**

1. मराठीत टायपिंग करण्यासाठी www.google.com/transliterate वापरता येईल व नंतर ते Word मध्ये सेव्ह करून ई-मेलद्वारे पाठवावे.

2. जर कृत्रिम बुद्धिमत्तेची साधने वापरली जात असतील, तर ती अत्यंत सावधगिरीने वापरली जावीत; जेणेकरून मजकुराचा ओघ, मौलिकता आणि अस्सलपणा अबाधित राहील आणि त्यामध्ये कोणतीही तडजोड होणार नाही.

3. बहुतांश लेख हे लेखकाच्या स्वतःच्याच आवाजात रेकॉर्ड केले जातात. तुमचा लेख निवडल्यास, तुम्हाला एक रोमांचक संधी - ‘व्हॉईस-ओव्हर आर्टिस्ट’प्रमाणे तुमचा स्वतःचा ऑडिओ रेकॉर्ड करा. यासाठी आवश्यक असलेली सर्व माहिती तुम्हाला पुरवली जाईल.

आपल्या उत्तम आणि वैविध्यपूर्ण साहित्याच्या प्रतीक्षेत,
आभारी आहोत,

**- बीएमएम वृत्त टीम**




BMM
बृहन्महाराष्ट्र मंडळ
आरोग्य संपदा
MEDICAL INTERNSHIP / SHADOW PROGRAM IN INDIA
July – August 2026
1-4 Week Internship / Shadowing Opportunities
Placement Based on Student Preferences
Accommodation Assistance Available if Needed
Safe Learning Experience, Gain Hands-On Insight!
Limited Spots – Apply Now!
Nominal Admission Fee | Students Arrange Own Travel
If interested – please fill out the form at
https://bmmonline.org/arogyasampada/

# BMM REAL ESTATE CONFERENCE 2026

## EMPOWERING GLOBAL BUSINESS LEADERS

BMM2026

BMM बृहन्महाराष्ट्र मंडळ

We're excited to share a few positive updates from this week as momentum continues to build around our upcoming Real Estate Conference:

## GROWING INTEREST

Interest in the conference remains strong, with 80 participants having registered their interest so far. Thank you for the encouraging response from the community!

## GENEROUS SUPPORT

We are grateful to **Mr. Balajee for his generous $10,000 donation** received this week. His support significantly strengthens our efforts and vision for the conference.

## NEW INDUSTRY ENGAGEMENT

We have initiated discussions with MSR Communities, a Seattle-based builder of Indian origin, to explore potential collaboration and participation opportunities.

## EXPANDING COMMUNITY OUTREACH

Outreach efforts are underway to onboard additional realtors from the Marathi community, further strengthening our network and collective journey.

We look forward to sharing more updates as preparations continue. Thank you for your continued support and enthusiasm!

**CONTACT:**
Santosh Salvi: +1 603 438 9279
Kailas Bhoite: +1 314 397 0989

**EMAIL:**
santosh.salvi@bmmonline.org
kailasb@bmmseattle2026.org

**FRIDAY**
7th Aug 2026

**START AT**
12:00 PM – 5:30 PM

**REGISTER / VOLUNTEER**



AUGUST 6th, 2026 | SEATTLE, WA
BMM BConnect
AI SUMMIT 2026
AI for All: People | Planet | Progress
Keynote Sessions
Industry Deep Dives
Sustainability Panel
Women in AI Leadership
AI + Cybersecurity Shark Tank
Startup Pitches & Innovation Awards
Hands-On Worksnops
Hands-On Workshops
Generative AI & Agentic AI
Launching
BMM AI INNOVATION NETWORK (BAIN)
Connecting Global Minds
Join us to Shape the Future of AI!
Responsible AI & Governance
Cross-Border Innovation
The Future of Work
https://bmmonline.org/bconnect | Anand.Chouthai@bmmonline.org
732-425-7591


VOLUNTEERS SIGN UP!
for
BMM Bconnect Initiative
& Convention
August 2026
Seattle
https://bmmseattle2026.org/volunteering
BMM VOLUNTEER
Sign Up Today!
Event Support
Registration
Hospitality Team
VOLUNTEER
Join the Team!

समाजरंग
Samajrang
A BMM Initiative

# दिव्यत्वाची जेथे प्रचिती

दिव्यत्वाची जेथे प्रचिती
BMM Samajrang - US Tour 2026

## ५ प्रेरणादायी समाजसेवक

भारतमधून प्रवास करत आपल्या भेटीला येत आहेत

## 'समाजसेवेच्या खऱ्या कथा'



### डॉ. विनोद शाह

| Day | Date | City |
|---|---|---|
| Fri | 6/12/2026 | Chatham, NJ |
| Sat | 6/13/2026 | New York & Connecticut |
| Sun | 6/14/2026 | New Jersey |
| Sat | 6/27/2026 | Washington DC / Virginia / Maryland / Baltimore |
| Sun | 6/28/2026 | Philadelphia |
| Sat | 7/11/2026 | Chicago |
| Sat | 7/18/2026 | Detroit |
| Sat | 7/25/2026 | Cleveland |
| Sun | 7/26/2026 | Pittsburg |
| Sat | 8/1/2026 | Portland |
| Sun | 8/2/2026 | Seattle |
| Fri | 8/7/2026 | Seattle (BMM Convention) |

### यजुर्वेंद्र महाजन

| Day | Date | City |
|---|---|---|
| Fri | 7/17/2026 | NY |
| Sat | 7/18/2026 | Washington DC |
| Wed | 7/22/2026 | Richmond |
| Thu | 7/23/2026 | Raleigh |
| Fri | 7/24/2026 | Charlotte |
| Sat | 7/25/2026 | Atlanta |
| Sun | 7/26/2026 | Chicago |
| Fri | 7/31/2026 | Cleveland |
| Sat | 8/1/2026 | Detroit |
| Sun | 8/2/2026 | San Francisco |
| Fri | 8/7/2026 | Seattle (BMM Convention) |

### अशोक देशमाने

| Day | Date | City |
|---|---|---|
| Fri | 8/7/2026 | Seattle (BMM Convention) |
| Sat | 8/15/2026 | San Francisco |
| Sun | 8/16/2026 | San Francisco |
| Tue | 8/18/2026 | Kansas City |
| Thu | 8/20/2026 | Austin |
| Sat | 8/20/2026 | Dallas |
| Sun | 8/23/2026 | Houston |
| Fri | 8/28/2026 | Atlanta |
| Sat | 8/29/2026 | Charlotte |
| Sun | 8/30/2026 | Raleigh |
| Fri | 9/4/2026 | Pittsburg |
| Sat | 9/5/2026 | Detroit |
| Sun | 9/6/2026 | Chicago |
| Fri | 9/11/2026 | Boston |
| Sat | 9/12/2026 | New Jersey |
| Sun | 9/13/2026 | Philadelphia |
| Fri | 9/18/2026 | Baltimore |
| Sat | 9/19/2026 | Washington DC |

### डॉ. गिरीश कुलकर्णी

| Day | Date | City |
|---|---|---|
| Sat | 7/25/2026 | New Jersey |
| Sun | 7/26/2026 | Boston |
| Sat | 8/1/2026 | Richmond, VA |
| Sun | 8/2/2026 | Richmond, VA |
| Tue | 8/4/2026 | Dallas, TX |
| Fri | 8/7/2026 | Seattle (BMM Convention) |
| Sat | 8/15/2026 | SF Bay Area |
| Sun | 8/16/2026 | Los Angeles |
| Tue | 8/18/2026 | Chicago, IL |
| Wed | 8/19/2026 | Cleveland, OH |
| Thu | 8/20/2026 | Columbus, OH |
| Fri | 8/21/2026 | Indianapolis, IN |
| Sat | 8/22/2026 | Cincinnati, OH |
| Sun | 8/23/2026 | New York City |

### अनुराधा भोसले


| Day | Date | City |
|---|---|---|
| Fri | 8/7/2026 | Seattle (BMM Convention) |
| Tue | 8/11/2026 | Cincinnati (Tentative) |
| Wed | 8/12/2026 | Columbus (Tentative) |
| Sat | 8/15/2026 | Toronto (Tentative) |
| Sun | 8/16/2026 | Toronto (Tentative) |
| Sat | 8/22/2026 | San Antonio (Tentative) |
| Sun | 8/23/2026 | Houston (Tentative) |
| Sat | 8/29/2026 | Dallas (Tentative) |
| Sun | 8/30/2026 | Austin (Tentative) |

**समाजसेवेचा प्रेरणादायी अनुभव घ्या, आपल्या शहरात नक्की सहभागी व्हा!**

### या प्रवासाचा उद्देश

- प्रेरणादायी अनुभव
- समाजसेवेच्या खऱ्या कथा
- नवीन विचार, नवी दिशा
- एकत्र येऊया, परिवर्तन घडवूया
- चला, समाजासाठी काहीतरी करूया!

अधिक माहितीसाठी भेट द्या:
www.bmmonline.org/samajrang


BMM
बृहन्महाराष्ट्र मंडळ
HIGH SCHOOL STUDENTS & PARENTS!
DID YOU KNOW?
You can earn up to 4 Language Other Than English (LOTE) Credits toward your High School graduation by demonstrating proficiency in the Marathi language!
avant
Take the
AVANT STAMP
Assessment
(STAndards-based Measurement of Proficiency)
The AVANT STAMP assessment is a nationally recognized language proficiency test that can help students receive academic credit for their Marathi language skills.
आपली भाषा,
आपला अभिमान,
आपले भविष्य!
EARN UP TO 4 LOTE CREDITS
STRENGTHEN YOUR HIGH SCHOOL TRANSCRIPT
RECEIVE RECOGNITION FOR YOUR MARATHI LANGUAGE PROFICIENCY
TURN YOUR HERITAGE LANGUAGE INTO AN ACADEMIC ADVANTAGE
Whether you learned Marathi at home, through Marathi Shala, or within your community, this is an excellent opportunity to earn credit for a language you already know.
For details about eligibility, testing, and participating school districts, please visit:
www.bmmonline.org/marathishala
मराठी शिका, मराठी जपा, मराठी अभिमान वाढवा! | BMM Marathi Shala Initiative | Preserving Our Language • Empowering Our Youth • Building Our Future


शिवछत्रपती
अभ्यास वर्ग
More information:
https://bmmonline.org/marathishala/


पेशवाई
अभ्यास वर्ग
More information:
https://bmmonline.org/marathishala/


AVANA
SENIOR CARE
Pune, India
PEACE OF MIND FOR YOU & YOUR LOVED ONES
Professional senior care with a personal touch.
Co-Founded by Ms Niharika
MHA- Mount Sinai Hospital, NY
Senior Living Mgt - Cornell University, NY
SERVICES WE OFFER
Independent Living
Assisted Living
Day Care
Wellness & Rehabilitation
Medical Support & Emergency Management
Pet Therapy & Companionship
TRY BEFORE YOU DECIDE
BOOK A TRIAL STAY TODAY!
+91 9090070782
avanaseniorcare.com




For more details visit: https://bmmonline.org/bvg/



बृहन्महाराष्ट्र मंडळ
BMM SUMMER
PROGRAMS FOR STUDENTS
Learn
Explore
Lead
Serve
Yuwa Summer Mentorship
Mandal Yuwa Summer Program
Summer Volunteering in India
Medical Internship in India
Maharashtra Cultural Tour
Summer Cricket Camp
Cultural Study Program
To find more information, please visit:
https://bmmonline.org/summer-programs/
★ Discover New Opportunities | ★ Build Leadership | ★ Connect with Your Roots | ★ Create Lifelong Memories




BMM2026
B-CONNECT 2026
बृहन्महाराष्ट्र मंडळ
EMPOWERING GLOBAL BUSINESS LEADERS
CHIEF GUEST
DR. ANAND DESHPANDE
FOUNDER, CHAIRMAN & MD, PERSISTENT SYSTEMS
A Distinguished Academic Leader And Philanthropist, He Serves As Chairman Of The Board Of Governors At IIT Patna And Founded The DeAsra Foundation To Empower Over 300,000 Nano Entrepreneurs.
THURSDAY, 06 AUGUST 2026
Seattle Convention Center, Seattle
8:30AM TO 4:00PM
Scan For Register
Title Sponsor Persistent


B-CONNECT 2026
BMM2026
BMM
बृहन्महाराष्ट्र मंडळ
Empowering Global Business Leaders
KEYNOTE SPEAKERS
ASEEM
DATAR
CHIEF PRODUCT OFFICER & CORPORATE VICE PRESIDENT
NEXT GENERATION COMPUTING, AI & QUANTUM, MICROSOFT
A visionary tech leader at Microsoft driving innovation in AI, Quantum, and Next Generation Computing.
THURSDAY, 06 AUGUST 2026
Seattle Convention Center, Seattle
8:30AM TO 4:00PM
Scan For Register
Title Sponsor
Persistent systems


BMM2026
B-CONNECT 2026
BMM
बृहन्महाराष्ट्र मंडळ
Empowering Global Business Leaders
KEYNOTE SPEAKERS
RAJASHREE VARMA
SERIAL ENTREPRENEUR | BOARD OF ADVISOR | CO-SELL STRATEGIST | EX-MICROSOFT
A visionary leader empowering businesses through innovation, strategic partnerships, and digital transformation.
THURSDAY, 06 AUGUST 2026
Seattle Convention Center, Seattle
8:30AM TO 4:00PM
Scan For Register
Title Sponsor
Persistent systems

We cater to Maharashtrian Artists in North America.
Providing a platform to share their artwork including Paintings, Sketches, Photographs & Digital art.

Collaborating with BMM, we publish artist's paintings for Marathi mandal members, showcasing their work & generating revenue. The sale of artwork benefits both BMM & Mandals financially.



***Snowbound***

**Artist: Alka Vaidya**
Dimensions:
Medium:Watercolor
Price:$300
Mandal: EBMM



***Twilight's Pallet***

**Artist: Alpana Dhond**
Dimensions:8" x 8" framed in 12" x 12" frame with glass
Medium:Soft Pastels
Price:$110



***Bright Open Skies***

**Artist: Anil Sawe**
Dimensions:48”x24”  Medium: Oil on Canvas
Price:$ 1,400
Mandal: (SF) Bay Area MM



***Custom portrait of your loved one***

**Artist: Yogini Dahiwadkar**
Dimensions: Various sizes available
Medium:Watercolor
Price:depends on size and no of people/pets
Mandal: Baltimore MM



***Ruins in Guatemala***

**Artist: Shubhangi Mantri**
Dimensions:8"x12" framed 16"x20"
Medium:Watercolor
Price:$350
Mandal:Dallas Ft. Worth MM



***Budding Bunch***

**Artist: Radha Kirtane**
Dimensions:12”x12”
Medium:wax, ink and oil paint (on wood panel)
Price:
Mandal: NFS

Pay: zelle@bmmonline.org or paypal@bmmonline.org | Contact: artists@bmmonline.org
Buyers & Sellers Pl fill out forms at https://bmm2.page.link/artists
*The buyer is responsible for shipping and handling.